# सुंद

# प

४३७ ...
दा. नों. ७०...
मि.
१२३...

भाग पहिला

卐

साने गुरुजी

卐

कृतज्ञा-पत्र
ना. ग. गोरे

साधना प्रकाशन
४३०-४३१ शनिवार, पुणे २

सातवी आवृत्ती
जुलै १९६८
प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-४३१ शनिवार पेठ, पुणे २
मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-४३१ शनिवार पेठ, पुणे २
© साधना ट्रस्ट
किंमत रु. २·००

# कृतज्ञा–पत्र

92345

ेय सुधाताई,

गेले दोन दिवस मी बडोद्यास होतो. काल सकाळी रेडिओवर बातमी ऐकली की 'गुरुजी गेले!' आणि आज बडोद्याहून मी मुंबईस जात आहे. या मनात विचार येतो आहे की गुरुजी नसलेल्या त्या मेघा भुवनात पाऊल ा कसे ठेवू? अ ची गाडी या क्षणी वसईच्या खाडीवरच्या पुलावरून जात ाहे. खाली विस्तीर्ण खाडी पसरलेली आहे. वर ढगांनी भरलेले आकाश ोयपूर्ण गेलेले नि कसे उदासवाणे दिसत आहे! तितक्यात सूर्योदयाचा वरूस कोठून तरी त्या ढगांवर पडला आणि तेवढा भाग क्षणभर उजळून ाघाल. ते दृश्य पाहून मला गुरुजींची आठवण झाली. गुरुजी असेच दिसत; ेहाने भारावलेले आणि चिंतेने म्लान झालेले. मग त्यांना काही तरी ारणाने हसू येई आणि त्यांचा सारा चेहरा उजळून निघे. आणि गुरुजींच्या ाठोपाठ मला तुझी आठवण झाली. गेले वर्षभर दर शनिवारी तुला उद्देशून ानेमध्ये त्यांचे एक सुंदर पत्र असायचे.

पण आता तशी पत्रे साधनेतून येणार नाहीत. शेवटच्या पत्रात अण्णांनी ्हिले होते की 'अधूनमधून लिहीत जाईन, पण बंधन नको!' त्या वेळी

तुला कल्पनासुद्धा नसेल की त्या वाक्यात केवढा अर्थ लपून राहिलेला होता ! कशी येणार कल्पना ? गेल्या शुक्रवारी ज्या वेळी गुरुजी अंथरुणावर जाऊन पडले त्या वेळी मी त्यांच्या जवळच होतो. त्यांचा हात हातांत घेऊन त्यांच्याशी बोललोदेखील. पण मला जरादेखील शंका नाही आली. आता मात्र वाटते की, त्या दिवशीचे त्यांचे बोलणे सारेच द्व्यर्थी होते. त्यांचा हात हातांत घेऊन मी म्हटले : " गुरुजी, येता ना जेवायला ? " तेव्हा पडल्या पडल्याच हळूच हसुन ते म्हणाले : " नको. मला भूक नाही." मी म्हटले : " दोन घास तरी खा. " तर म्हणाले : " मी जेवणार नाही असं गणेशाला सकाळीच सांगितलं आहे. झोपून उठल्यावर भूक लागली तर पाहू. " आम्ही आतल्या खोलीत जेवायला बसलो आणि ते तिकडे हाताची उशी करून नेहमीप्रमाणे झोपले. त्या वेळी आम्हांला काय कल्पना की आईचे बोल ऐकवणारी ही वाणी आता कायमची बंद होणार आहे ! अमृतासारखे शब्द झरझर लिहिणारे त्यांचे हात कायमची विश्रान्ती घेणार आहेत ! आणि सदैव झेपावणारे त्यांचे पंख मिटून घेऊन मृत्यूच्या घरट्यात कायमचे शिरणार आहेत !

सुधा, तुला अण्णांनी लिहिली तशी पत्रे मराठीत पूर्वी कोणी लिहिली नव्हती आणि पुढेही कोणी लिहील असे वाटत नाही. काचेच्या पात्रात ठेवलेल्या सोनेरी माशांची प्रत्येक हालचाल ज्याप्रमाणे बाहेरून दिसते त्याप्रमाणे तुला लिहिलेल्या प्रत्येक पत्रातून गुरुजींचे– तुझ्या अण्णांचे– मन स्पष्ट दिसून येत असे. त्यांच्या मनाचे सारे भाव त्या पत्रांतून उमटलेले आहेत. त्यांचे आभाळाएवढे विशाल मन, शिरीषासारखे कोमल मन, धरित्रीसारखे उदार मन, द्राक्षासारखे रसाळ मन, विजेसारखे सचेत मन, गंगेसारखे पावन मन त्या पत्रांतून व्यक्त झालेले आहे. चि. शुभाला लिहिलेली पत्रे दोनतीन वेळा मी मध्येच घुसडली नसती तर गुरुजींची आणखी दोन तीन पत्रे वाचावयास मिळाली असती. पण मला काय ठाऊक की पुढे ही घटना होणार म्हणून ! गुरुजींचा विनयही एवढा थोर की मी साधनेकडे पत्र पाठवले की तुला लिहिलेले पत्र ते बाजूला सारीत आणि मला जागा करून देत !

सुधाताई, तू मोठी भाग्याची. तुझ्या अण्णांचा थोरल्या भावावर जसा जीव होता तसाच तुझ्यावरही. देवाघरी जातानासुद्धा त्याचा फोटो

त्यांनी आपल्या उजव्या खिशात ठेवला होता ! गुरुजी नाना ठिकाणी हिंडत. नाना देश, नाना वेष, सृष्टीचे नाना प्रकार ते पाहात. त्यांची दृष्टी जरी सदैव भूमीकडे वळलेली दिसे तरी त्यांच्या नजरेतून बारीकसारीक गोष्टदेखील निसटत नसे. त्यांची नजर जशी रत्नपारख्याची होती. ती चांगले तेवढे टिपून घेई आणि ज्यात आयब असेल, दोष असेल ते सोडून देई. साऱ्या देशभर हिंडून आणि शेकडो ग्रंथ चाळून साक्षेपाने गोळा केलेल्या सुमधुर, सरस, सुगंधी नि टपोर स्मृतींचे द्रोणच्या द्रोण भरून ते तुला दर शनिवारी पाठवीत. मग तू भाग्याची नाहीस का ?

आणि तुला पाठवलेल्या या भेटीचा स्वाद उभ्या महाराष्ट्रातल्या शेकडो, हजारो मुलांना गेले वर्षभर चाखावयास मिळाला हे त्यांचे भाग्य ! तुला लिहिलेली पत्रे महाराष्ट्रातील सर्व बाळगोपाळांचा वारसा होणार आहे, हे तुझ्या अण्णांना ठाऊक होते. त्यांच्यापाशी आपपर भावच नव्हता. श्यामची आई साऱ्या महाराष्ट्राची आई झाली, तशी अण्णांची तू सुधाताई साऱ्या महाराष्ट्राची सुधाताई झाली आहेस. ' अयं निजः परो वेत्ति गणना लघुचेतसाम् । उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥ ' हा श्लोक तू वाचला आहेस ना ? अशा उदारचरितांपैकी होते तुझे अण्णा. वासराची आठवण झाली की गाईची कास जशी तटाटू लागते तशी मुलांची आठवण झाली, त्यांचे दर्शन झाले की गुरुजींचे मन बहरून येई, ते तटाटू लागे. त्यामुळे दर शनिवारचे पत्र रात्री-बेरात्री भल्या पहाटे बसून ते लिहून काढावयाचे. सहसा अंतराय होऊ द्यावयाचेच नाहीत. आणि तुला डोळ्यांसमोर ठेवून ते अवघ्या बालमहाराष्ट्राशी गुजगोष्टी करावयाचे.

आणि गुरुजी एकदा लिहू लागले की काय विचारता ! ते लिहिताना पाहण्यातसुद्धा मजा होती. कोठे अडणे माहीत नाही, कोठे खोडाखोड सापडायची नाही. मशिनीची जशी टीप पडत जाते तसे त्यांच्या लेखणीतून टपटप शब्द पडत जात. अक्षर बारीक अन् स्वच्छ. जिरग्याच्या तांदुळासारखे. गुरुजींनी चीनच्या इतिहासावर केलेल्या टिपणांची वही माझ्याकडे कित्येक र्षे होती. तीनशे चारशे पानांची ती वही पहिल्या पानापासून अखेरच्या पानापर्यंत एकटाकी लिहून काढल्यासारखी दिसे. पंचवीस पन्नास पाने

उलटल्यावर एखादा शब्द खोडलेला सापडला तर सापडला. लिहू लागले की त्यांना कसले तरी अवसान चढत असे. जगाचे त्यांना भान उरत नसे. त्यांना कसलाही कागद चाले. दोन बोटांएवढ्या चांदोऱ्यासुद्धा चालत. टेबल नको, एकान्त नको. संदर्भासाठी आजूबाजूला ग्रंथ नकोत. उखाणे, म्हणी, ओव्या, अभंग, आर्या, श्लोक, ऋचा, आठवणी,— सारे त्यांच्यासमोर हात जोडून उभे असे.

१९४४ मधली गोष्ट. नाशिक तुरुंगात मला वाटते अप्पा गुरुजींना भेटायला आले होते. गुरुजी भेटीहून परत आल्यावर ते संध्याकाळी जेवायचे नाही असे सांगून खोलीचे दार लावून जे लिहायला बसले ते सारी रात्र लिहीतच होते. मी मुद्दाम रात्रीतून तीनदा उठलो. पाहिले तो गुरुजींच्या खोलीत दिवा जळतो आहे आणि गुरुजी लिहीतच आहेत! दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता १२५-१५० पानांचा गांधीजींच्या जीवनाबद्दल मजकूर लिहून त्यांनी ते हस्तलिखित ( गोष्टीरूप गांधीजी ) अप्पांच्या स्वाधीन केले.

लिहू लागले म्हणजे जशी गुरुजींची लेखणी चाले त्याप्रमाणे बोलू लागले की त्यांची वाणी चाले. जशा श्रावणातल्या सरीच. इमर्सनच्या निबंधांतले वाक्य, शेक्सपिअरची एखादी उक्ती, वेदातील ऋचा, भर्तृहरी राजाचा श्लोक, ज्ञानेश्वरांची ओवी, तुकोबारायांच्या अभंगातला चरण, टागोरांची भव्य भरारी,– काय काय त्यांना आठवे. आमची डोकी म्हणजे काळ-काम-वेगाच्या उदाहरणातले हौद; आत येणाऱ्या तोटीपेक्षा बाहेर जाणाऱ्या तोटीचे तोंड मोठे! गुरुजींचे तसे नसे. त्यांच्या डोक्यात एखादी कल्पना, एखादी घटना, एखादी रचना शिरली की ती विसरण्याचे नाव नाही. त्यामुळे सुधा, ही बेचाळीस पत्रे म्हणजे स्मृतिरत्नांनी भरलेले बेचाळीस रांजण आहेत. पक्षिणी रानावनात दूर दूर भटकते आणि वेचक चाऱ्याचे घास आपल्या पिलासाठी घेऊन येते, त्याचप्रमाणे गुरुजींनी हे बेचाळीस घास तुझ्यासाठी आणलेले आहेत.

म्हणून मी म्हटले की, तू भाग्यवान; आणि तुझ्या निमित्ताने महाराष्ट्रातल्या हजारो मुलांमुलींना ते घास मिळाले म्हणून तीही भाग्यवान. भास्कराचार्यांनी आपल्या मुलीला गणित शिकविण्यासाठी ग्रंथ लिहिला. पण साऱ्या जगाचा त्यामुळे फायदा झाला. महाराष्ट्रातील मुलांमुलींनी पारायणे करावीत अशी या

पत्रांची योग्यता आहे. गवताच्या पातीपासून मनुष्यापर्यंत साऱ्या सृष्टीवर प्रेम करायला ही पत्रे मुलांना शिकवीत आहेत. आपल्या समाजातून जात चाललेले मंगळागौरीसारखे सण, आपल्या समाजातून दिसेनाशी होत चाललेली बाळतात्यांच्यासारखी साधी नि सालस माणसे, मागे पडत चाललेले दहीहंडीसारखे उत्सव, याची किती हृदयंगम वर्णने या पत्रांतून आलेली आहेत ! महाराष्ट्रावरचे तुमचे आमचे प्रेम वाढो, पण त्याचबरोबर इतर प्रान्तांतील आपल्या देशबांधवांबद्दलचे प्रेम वाढो, हीच शिकवण तुझ्या अण्णांनी सगळ्यांना दिली आहे.

पण सुधाताई, मुंगीपासून मनुष्यांपर्यंत सर्व जीवांवर प्रेम करण्यास शिकवणारे तुझे अण्णा जसे प्रेमळ तसेच झुंजारही होते. कोठे अन्याय दिसला की, आपल्या पिलांवर झडप घालणाऱ्या घारीशी सामना करण्यासाठी कोंबडी ज्याप्रमाणे पिलांना पंखांखाली घेऊन उभी ठाकते तसे ते उभे ठाकत. मग त्यात प्राण खर्ची पडले तरी त्याची पर्वा कोणाला ? त्या वेळी गुरुजींच्या डोळ्यांतील अश्रुबिंदूंच्या ठिणग्या बनत, लोण्यासारखे त्यांचे हृदय वज्रासारखे होई. अमळनेरच्या कामगारांवर अन्याय झाला, पांडुरंगाच्या देवळात चोखोबाच्या लेकरांना मज्जाव झाला, गांधीजींचा खून एका महाराष्ट्रीयाने केल्यामुळे महाराष्ट्राची नाचक्की झाली, की उठलेच गुरुजी. धावलेच अन्याय निवारण करण्यासाठी, प्रतिष्ठा रक्षण करण्यासाठी. मला नेहमी विस्मय वाटे की, मृदू आणि कठोर, शीतल आणि दाहक, नम्र आणि उग्र अशी दोन्ही रूपे त्यांच्या मनाच्या कोशीत एकत्र नांदतात तरी कशी ! पण —

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदू ऐसे
भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे काठी हाणू माथां

हे तुकारामांचे शब्द अशी गुरुजींसारखी माणसे प्रत्यक्ष पाहिली की खरे वाटू लागतात. गुरुजींचा प्रेमळपणा म्हणजे बावळेपणा नव्हता. ते सहसा रागावत नसत. याचा अर्थ इतकाच करावयाचा की, त्यांची माया फार मोठी होती; आईच्या मायेएवढी मोठी होती; म्हणून तुझ्यामाझ्यासारख्यांचे शंभर अपराध ते सहज पोटात घालीत.

तुझे अण्णा किती थोर होते याची तुला नीटशी कल्पना येणार नाही; आणि येऊ नये तेच ठीक आहे. नाही तर तू बावरून जाशील. एवढेच लक्षात

ठेव की, फुलाची एक एक पाकळी उमलावी त्याप्रमाणे आपल्या मनाची त्यांनी एक एक पाकळी उमलवली. आपल्याला आपल्या कपड्यांवर डाग पडलेला खपत नाही तसा त्यांना आपल्या मनावर डाग पडलेला खपत नसे. जन्मतः त्यांच्या मनाची भूमी सकसच असली पाहिजे. पण जमीन जरी सकस असली तरी मशागत केली पाहिजेच ना? मशागत न केली तर तण वाढून ती फुकट जाईल, तिच्यात विषारी जीव–जिवाणू माजतील. तसे गुरुजींनी केले नाही. आपल्या मनाला त्यांनी संयमाचे बांध घातले. सुंदर भावनांचे पाणी त्यात खेळवले. सद्विचारांचे बी पेरले. आणि मग त्यात पिकलेल्या भरघोस पिकाची वानगी उदार शेतकऱ्याप्रमाणे बरोबर पोचवली! तुला त्यांनी लिहिलेल्या शेवटच्या पत्रात 'पेरते व्हा' असे ओरडणाऱ्या पक्ष्याचा उल्लेख केलेला आहे, खरे ना? गुरुजींनी तुला–मला शेवटी जणू सांगितले आहे की, 'पेरते व्हा! पेरते व्हा!' पेरा, मुबलक पेरा, सर्वत्र पेरा, निवडक पेरा,–म्हणजे सगळीकडे सुगीच सुगी होईल!


सुधाताई, पाहू या प्रयत्न करून. गुरुजींची पत्रे वाचणाऱ्यांमध्ये भाऊ-बहिणीचे नाते तयार झाले आहे. इतकी आपण भावंडे जर महाराष्ट्राची मशागत करू लागलो तर महाराष्ट्राचे पुन्हा 'आनंदभुवन' बनण्यास, 'गोकुळ' बनण्यास किती उशीर?

महाराष्ट्रातील सर्व भावंडांच्या वतीने

तुझा

**नाना**

ता. १२ जून १९५०



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद

दर आठवड्यास पत्र पाठव म्हणून तुझा लकडा होता. शेवटी मी ठरविले की तुझा हट्ट पुरवायचा. तू पास झालीस. फार अभ्यास न करताही पास झालीस, मग आणखी थोडा करशील तर परीक्षेचा बाऊ तुला कधी वाटणार नाही. तू सुटीत म्हणे सायकलवर बसायला शिकलीस. बंड्याजवळ शिकली असशील. आणि छोट्या अरुणाला घेऊन जातेस की काय ? जपून हो.

गोदावरी बाळंत झाली. ती आता कामाला येत नसेल. तू तिच्याकडे गेली होतीस का ? तिला हवे– नको विचारा. गोदावरीचे काम किती निर्मळ ! आणि तिची आता धांदल असेल. पाऊस दूर आहे अशी होती कल्पना. परंतु यंदा जवळजवळ पंधरा दिवस आधीच पाऊस सुरू झाला.

आमच्याकडे सारी फजिती. शेतकऱ्यांची अजून घरे शिवायची होती. कोणी नुसती उस्तरुन ठेवली होती. राब शेतात नेऊन जाळायचा होता.

कोणाकोणाची भाजवण अजून व्हायची होती, तो डोकीवर पाऊस आला. प्रथम वाटले की अभ्रट असेल. इतक्यात कोठला पाऊस? सात तारखेस मृग लागायचे. अजून रोहिणी नाही आल्या. उद्या रोहिणी निघतील. तुम्हा बायकांच्या ओव्यांत अशा पावसाचे मुद्दाम वर्णन आहे :

"पाऊस पडतो
मृगाआधी रोहिणीचा"

रोहिणीत पाऊस म्हणजे नवलाचा! सर्वांची धांदल उडाली. लाकूडफाटे चार महिन्यांचे अजून साठवायचे होते. शेण्यागोवऱ्या भरून ठेवायच्या; तो आकाश भरून आले. लोक भराभर घरे शिवू लागले. शिगवण, म्हापदे, सारे एकमेकांना मदत करायला गेले. गवळवाडची घरे दिवसरात काम करून शिवून काढण्यात आली. खेड्यापाड्यांतून त्या त्या जातीपुरते अजून ऐक्य आहे. ती ती वाडी, तो तो कोंड,—तेथले लोक एकत्र होतात. ही भावना वाढायला हवी.

मी परवा उजाडत फिरायला गेलो होतो. पावसाचे चिन्ह नव्हते. नवीन पालवी फुटलेली झाडे सुंदर दिसत होती. पाने अजून जून नव्हती झाली. पोपटी रंग होता पानांचा. कोकिळा ओरडतच होती. आणि दूर 'पेरते व्हा, पेरते व्हा' करणारा पक्षीही ओरडत होता. एके ठिकाणी रस्त्यावरून साप गेल्याच्या खुणा होत्या. त्याच्या शरीराचे ठसे उठलेले होते. उन्हाळ्याच्या दिवसांत साप रस्त्यावर येऊन पडतात. थंडगार धुळीत त्यांना बरे वाटते. उन्हाळ्या दिवसांत रात्री पायांत घातल्याशिवाय आजोबा मला लहानपणी बाहेर पडू देत नसत. हातात काठी घेऊन जा; दगडावर आपटीत, आवाज करीत जा असे म्हणायचे. आता पाऊस आला म्हणजे यांचे विहार बंद होतील. सापांची घरे पाण्याने भरून जातात. रस्त्यात चिखल, मग घरांच्या वळचणीस येऊन राहतात. लाकडाच्या खोपटीत येऊन बसतात.

मला फिरताना पांढरे चाफे फुललेले दिसत होते. उन्हाळ्यात यांना काय बहर असतो! झाडावर पान एकही दिसत नाही. परंतु सर्वत्र फुले. या झाडाला पाणी लागत नाही. कुंपणात लावा, कोठेही लावा. दगडाधोंड्यांमध्ये, कातळाच्या मध्ये पांढरा चाफा आपला उभा! हळदीकुंकवाच्या वेळेस गौरी-

समोर याच फुलांच्या माळा करून सोडतात. चाळणीच्या भोकातून हीच फुले घालून चाळणी सजवतो. याच फुलांच्या कळ्या एकमेकांत अडकवून घोडे करतो. याच फुलांच्या पाकळ्यांत भोके पाडून त्या डेखांत अडकवून मधला पिवळा भाग वर करून त्याची जणू राखडी करतो. अपार फुले. आता पावसाळा आला म्हणजे ही फुले जातील. आणि लांब हिरव्यागार पानांनी हे चाफे भरून जातील. पावसाळ्यात सोनचाफ्यांना बहर येतो. उन्हाळ्यात या गरीब पांढऱ्या चाफ्यांना. आणि सुधा, बकुळी काय फुलत होत्या! तुला गजरे आवडतात. येथे असतीस तर बकुळीची फुले केसांत घालतीस. मोटर स्टँडवरून बकुळीचे हार घेऊन लहान मुली विकायला उभ्या असतात. बकुळीचे बारीकसे फूल. किती सुवास! आणि त्याच्या त्या हृदयात मध असतो. फूल उचलावे तो त्यातून दोनचार तरी मुंग्या निघायच्या. येथे कुमी, विमली यांना फुलांचा तिटकारा. परंतु सुंदरच्या दोन छोट्या चिमण्या मुली, त्यांना काय हौस! दिल्लीच्या उन्हाळ्यातून त्या आल्या आहेत. सकाळ होताच बकुळीखाली जातात आणि परड्या भरून आणतात! सायंकाळी गुलबाक्षीची फुले. परंतु गुलबाक्षीचा खरा बहर पुढेच. सध्या उन्हाळ्यात फुले कमीच. परंतु मोगरे फुलत आहेत. पुढे पावसाळ्यातही बहर येईल. जाईजुईही फुलल्या आहेत. आणि रस्त्यावर ती लाल फुले असलेली झाडे. इकडे ती आहेत. मे फ्लॉवर मुंबईस म्हणतात. बंगालकडे त्याला कृष्णचूडा म्हणतात वाटते. झाडावर पान नाही. फुलेच फुले. या लाल फुलांप्रमाणेच पिवळी, निळी फुले असणारेही याच जातीचे वृक्ष असतात. शिरीष वृक्षावरही फुले होती. मला ती फार आवडतात. किती नाजूक ते शतकेसर. भर्तृहरीच्या नीतिशतकात आहे की, हिरा शिरीषाच्या फुलाने कापता येणे शक्य होईल, परंतु मूर्खाची समजूत घालणे कठीण!

सुधामाई, फुले हे सृष्टीचे वैभव आहे. त्या त्या ऋतूंत निराळे. आता पावसाळा आला म्हणजे रानात फुले फुलतील. या वसंत ऋतूतही किती लतावेलींना फुले. कुड्याच्या झाडांना फुले आली आहेत. त्याच्या लांब कोवळ्या शेंगा किती सुंदर दिसतात! निळसर शेंगा. भाजणी घालून त्यांची भाजी आई करायची. ही कुड्याची झाडे उद्या पाऊस आला की हिरव्यागार पानांनी भरून जातील. मग ती पाने पत्रावळीसाठी आणायची. पळसही उन्हाळ्यात फुलतात,

लाल दिसतात. अर्जुनाला भीष्मांनी बाण मारून रक्तबंबाळ केले त्याचे वर्णन करताना वामन पंडित म्हणतात :

" पुष्पवर्ण नटला पळसाचा
पार्थ सावध नसे पळ साचा "

पळसाच्या फुलांचा रंग अर्जुनाने घेतला. क्षणभर तो सावध नव्हता. पळसाच्या फुलांचा कुसुंबी रंग होतो. मी हे वैभव बघत जात होतो. ऊन पडले होते. रानात सोडलेली गाईगुरे,–त्यांना चरायला काय होते? तरी ती जमिनीला तोंड लावीत. वाळलेली तृणाची काडी कोठे मिळेल ही इच्छा. ती पहा एक गाय विहिरीवर उभी आहे. उन्हाळ्याचे दिवस, पाण्याचा दुष्काळ. काठेवाडात एका कुटुंबाला एक गॅलन पाणी रोज देण्यात येते. कसे करीत असतील लोक! काठेवाडात मोठी नदी नाही. जैनांनी मोठी मंदिरे बांधली, परंतु पाणी मिळेल अशी का नाही योजना? काही जुने प्रचंड तलाव आहेत, परंतु नाना संस्थाने. एकमेकांच्या हद्दी आड येत. त्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य. आणि दुष्काळ आले की एका थेंबासाठी जीव हपापे.

ती गाय उभी आहे. दगडाला पडलेल्या लहानशा खळग्यात साठलेले पाणी पीत आहे. परंतु ती पहा एक मुलगी विहिरीवर आली. लांब असेल तिचे घर. सासुरवाशीण असेल. गरिबाची दिसते. लुगडे ढोपरावर नीट आवरलेले. तिने कळशी ओढून आधी गाईला पाणी ओतले. गाय पाणी पीत होती. ती मुलगी त्या गाईच्या समाधानाकडे बघत होती! " पी, शान्त हो " असे का ती म्हणत होती? मुकी दुवा देऊन गाय गेली. त्या मुलीने ते पाणी दगडी खळग्यात ओतून ठेवले. पुन्हा कळशी काढून ती घेऊन गेली.

मी बघत जात होतो; तो गार वारा आला. आकाशात ढग जमले. कोठे तरी पाऊस पडला असावा. सुगंध आला. इतक्यात पाऊस? येऊ दे. गुरांना पाणी होईल. परंतु पुढे दगा नाही ना देणार? पाऊसच सुरू झाला समजून शेतकरी बी पेरतील. रोप वाढेल. आणि पाऊस न आला तर? सारे प्रभूच्या हाती. सुधा, टपटप पाऊस आला.

“ पाऊस पडे टापूर टुपूर
नदीला आला पूर
घर माझे आहे दूर ”

हे चरण आठवले. तुझे आवडते चरण. मी टोपी काढली. डोक्यावर देवाची अमृतवृष्टी पडो म्हटले. मी गावाकडे पावले वळवली. लोकांची धावपळ दिसली.

आणि दोन दिवस पाऊस पडत आहे. लोकांनी पेरे केले. दर वर्षी रोहिणीचे पेरे करतात. परंतु उन्हात बी तापते. मग पाऊस पडताच रोप छान येते. या वर्षी तापायला सवड नाही. पेरलेले बी पाखरे खातात. या वर्षी त्यांना खायला सवड झाली नाही. पेरे लौकर झाले. आठा दिवशी रोप दिसू लागल.

बाजारातून छत्र्यांची विक्री सुरू झाली. गोवे, कारवार इकडे ताडाच्या गोल छत्र्या. तिकडे नारळाच्या झापाच्या घोंगडीची खोळ डोक्यावर घ्यावी तशा कुंच्या करतात. त्या डोक्यावर घेऊन मग पावसात कामाला जातात. रत्नागिरी, कुलाबा जिल्ह्यांत इरली. लहानपणी आजोबांबरोबर मीही इरली विणीत असे. बांबूचा सांगाडा करून मिळाला की, पळसाची, धामणीची वगैरे पाने घालून इरले शिवायचे. काही काही लोक किती नक्षीदार करतात! सुधा, लहान लहान वस्तूही कलात्मक करायला आम्हांला शिकायचे आहे. जपानी लोक साधे मडके, साधी कपबशी, साधी चटई, साधा पंखा,– या साध्या साध्या वस्तूही सुंदर आणि सुबक करतील. आपली कला श्रीमंती वस्तूत आहे. मोठी मंदिरे, ताजमहाल, हिऱ्यासोन्याचे दागिने यात कला आहे. परंतु लहानशी झोपडी तीही कलात्मक बांधीन. लहानसे मडके तेही सुंदर असेल, बांबूचा पंखा परंतु तोही कलात्मक करीन. ही दृष्टी घेऊन सर्वत्र उभे राहिले पाहिजे. तुझे घर कुडाचे का असेना, तेथेही प्रमाण असू दे, उजेड असू दे, आकाररम्यता असू दे.

हे पत्र लांबले. आता पुरे, नाही? बाहेर सर पडत आहे. अक्का विचारते : “ अण्णा, घोटभर तरतरी घेशील का? ” तरतरी म्हणजे चहा.


घेईन तिच्याबरोबर थोडा. अक्काची मांजरी चुलीपाठीमागे आहे. भिजून आली की काय कोठे? तसा काही गारवा अजून नाही. पंधरा दिवस पाऊस सारखा पडेल तर उकाडा कमी होईल, हवेत गारवा येईल.

खरेच, परवा कापा फणस आणला होता. परंतु गऱ्यांच्या अंगावर मांस नाही! अक्का म्हणाली: "सव्वा रुपयाच्या आठळ्या तरी झाल्या!" आषाढी एकादशीला त्याचीच भाजी. ते मागे वादळ झाले ना–त्यामुळे आंबे फणस यांची झाडे निर्जीव झाली. आंबे आलेच नाहीत. फणस थोडे आले. परंतु गरा भरला नाही. तू आंब्याच्या कोयी पावसाळ्यात भाजायला जमवून ठेवल्या आहेस की नाहीस? तिकडेही आंबे असतीलच. मी एका मित्राला तुम्हांला पाठवायला लिहिले आहे. आले म्हणजे कळव. माझीही आठवण आंबा खाताना काढा. तुझी मैत्रीण प्रभा सावे पास झाली का? तिचे पत्र येते का? मैत्री कायम ठेवा. एकमेकींना पत्रे पाठवीत जा. पुरे हो आता. म्हणशील अण्णाचे पत्र म्हणजे मारुतीचे शेपूट! मधा पुरे म्हणाला तर पुन्हा आंबे–फणस निघाले. आता मात्र जय हिंद.

चि. प्रिय अरुणाला पापा. तिला जपा. सर्वांस स. प्र.

तुझा

साधना, ११ जून १९४९ अण्णा



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद

मागचे पत्र तुला आवडले. अशीच मोठमोठी पत्रे लिहीत जा म्हणतेस. तुला त्याने आनंद होत असेल तर लिहीत जाईन. दुसरा काही आनंद नसेल देता येत तर निदान एवढा तरी द्यावा.

या आठवड्यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे शालान्त परीक्षेचा निकाल. विमली पास झाली. परंतु लिली, बंड्या यांना अपयश आले. परीक्षेचा केवढा बोजा आपल्या शिरावर असतो. परीक्षा घेणे हे मला रानटी वाटू लागले आहे. तीन मुलांनी तीन प्रकारे आत्महत्या केल्या. काय वाटले असेल आईबापांना! मुलांची वृत्ती-प्रवृत्ती पाहून आम्ही शिकवीत नाही. सारे विषय सर्वांच्या डोक्यावर. परवा महर्षी सेनापती आले होते. ते म्हणाले : "परीक्षेचा निकाल लावताना 'येथे बोल नाही शिष्यासी, हे तो अवघे गुरुपाशी' असे समर्थांचे चरण आधी वर घालावेत! मुलगा नापास होतो याचा दोष गुरुकडे, आई-

बापांकडे. मुलगा रोज शाळेत जातो तरी नापास कसा होतो? काही विषय याला येतच नसतील तर त्यांतही त्याने पास झाले पाहिजे असे म्हणणे हा गुरूचा व पालकांचा दोष नाही का? मुलांना शे-दोनशे प्रश्न विचारावे. त्यांतून त्यांनी पन्नास एक प्रश्नांची उत्तरे दिली की पास करावे." सेनापती पुढे म्हणाले: "आमच्या नातलगाचा एक मुलगा होता. त्याला शाळेत काही यायचे नाही. तो शाळेत म्हणून जायचा परंतु दुसरीकडेच कोठे बसायचा. शेवटी मी त्याला शाळेतून काढले. शिंप्याकडे ठेवले. तेथे जमेना. असे करता करता बालोद्यान प्रेसमध्ये ठेवले. त्याचे अक्षर चांगले होते. ड्रॉइंग येईल वाटे. आणि तो पुढे तेथे हुशार झाला. नागपूरला आज तो दीडशे रुपये मिळवतो. त्या मुलाला दगड म्हणत. तो मुलगा दगड की जे त्याला येत नव्हते, येणे शक्य नव्हते ते त्याच्यावर लादू पाहणारे आम्ही पालक नि शिक्षक दगड?"

सुधामाई, या परीक्षेच्या निमित्ताने किती तरी विचार मनात येतात. मुलांचा कोंडमारा कधी थांबेल? आईबापही परीक्षेचा बाऊ करतात. गंभीर वातावरण करतात. मुलगी नापास झाली तर आईबापांनी म्हणावे: "ये. लीले, अग नापास तर नापास. पुढील वर्षी पास हो. ये, आपण खेळू ये. परीक्षा म्हणजे का आयुष्य? अग असे प्रसंग हसत खेळत घ्यायला शिकणे ही खरी परीक्षा. जीवन ही निराळी वस्तू आहे. ये बाळ. या परीक्षा कृत्रिम असतात. जेथे पद्धतीच सदोष तेथे तुझा काय दोष! ये, वाईट नको वाटून घेऊ, हस बघू." असे आईबापांनी मोकळे वातावरण निर्माण करावे. परंतु तेही गंभीर चेहरे करून बसतात. म्हणून परीक्षा या शब्दाचा मला तिटकारा आला आहे. परवा माझा एक तरुण मित्र नारायण इंटरमध्ये नापास झाला. तो म्हणाला: "मी नापास झालो म्हणून पेढे वाटतो.' त्याला थोडे वाईट वाटले असेल, परंतु किती आनंदाने त्याने स्वतःचा नापास निकाल ऐकला. कारण तो जीवनाच्या परीक्षेत पास होता. किती काम करी, अनेकांच्या उपयोगी पडे.

तुला सोपानदेव माहीत आहेत ना? काव्यगायन करणारे. त्यांचा मुलगा मधू नाशिकला नापास झाला तर घरी हसत आला व म्हणाला: "नापास झालो. पुढील वर्षी नवीन पुस्तके घ्यायला नकोत. आणि शरद यंदा सातवीला बसला नाही. मी पास झालो असतो तर आम्ही एकाच वर्गात झालो असतो.

मोठ्या भावाला ते लाजिरवाणे. मी नापास झालो बरे झाले की नाही?" सोपानदेव ती हकीकत सांगून मला म्हणाले: "त्याचे नापास होणे दूरच राहिले. आम्हांला त्याच्या बोलण्याने इतके हसू आले की आवरेना." अशी खेळाडू वृत्ती हवी. याचा अर्थ अभ्यास करू नये असा नव्हे. परंतु परीक्षा मुलांच्या मानगुटीस बसवू नये. मुलींना तर काही सर्वांना नोकऱ्या करायच्या नसतात. रेशनिंगमध्ये किती जणांना नोकऱ्या मिळणार! परंतु मुलीही परीक्षेच्या भयाने निःसत्त्व नि अशक्त होत असतात. जे त्यांचे वाढण्याचे वय तेच त्यांना खुरटवणारे होते! किती चमत्कारिक नि कृत्रिम आहे हे सारे. ज्या मुलांमुलींना जे येईल तेच त्यांना शिकविले जाईल असे कधी बरे होईल?

सुधा, परवा मी पावसातूनच जात होतो. ज्येष्ठाचा हा महिना. मृग लागले होते. दशाहराचे दिवस संपले होते. ज्येष्ठाच्या पहिल्या दहा दिवसांना दशाहराचे दिवस म्हणतात. गंगापूरचे हे दिवस. वाईला ह्या दहा दिवसांत गंगेचा उत्सव असतो. दशाहरातील दहा दिवस गंगेच्या महिम्यावर प्रवचने होतात. आपण सर्वच नद्यांना गंगा म्हणतो. परंतु हिमालयातून जन्मलेली; हरिद्वार, प्रयाग, काशी करीत चाललेली ती खरी गंगा भगीरथाने आणलेली; जिच्या तीरी ऋषिमुनी तप करिते झाले, राजे राज्ये भिरकावून रहाते झाले ती गंगा! अनेकांनी तिच्यावर स्तोत्रे लिहिली,– वाल्मिकीने लिहिले, शंकराचार्यांनी लिहिले, बंगालमधील मुसलमान कवींनीही गंगेवर स्तोत्रे लिहिलेली आहेत. परंतु सर्वांत प्रसिद्ध स्तोत्र म्हणजे जगन्नाथ पंडिताने लिहिलेले 'गंगालहरी' किंवा 'पीयूषलहरी' हे स्तोत्र. लहानपणी हे स्तोत्र मी पाठ केले होते. किती सुंदर शब्दरचना. मी सुटीत आलो तर तुला शिकवीन. संस्कृत मोठी सुंदर भाषा आहे. हे जगन्नाथपंडित अकबर-शहाजहान यांच्या काळातील. जरा लहरी होते. एकदा अकबराजवळ ते बुद्धिबळे खेळत होते. अकबराच्या रजपूत पत्नीपासून झालेली मुलगी पाणी घेऊन आली; अकबर म्हणाला: "हिच्यावर कविता करा." लगेच जगन्नाथाने केली. अकबर म्हणाला: "मागणे मागा." जगन्नाथ म्हणाला: "ही मुलगी मला द्या." आणि जगन्ना-

थाने त्या मुलीशी विवाह केला! एकदा वादविवादात त्याने इस्लामी मौलवींचा पराजय केला होता. परंतु असा हा थोर कवी, पंडित भ्रष्ट ठरला. मुसलमानाच्या मुलीजवळ लग्न करतो म्हणून त्याच्यावर बहिष्कार पडला. एकट्या जगन्नाथाला प्रायश्चित्त देऊन पुन्हा हिंदुधर्मात घ्यायला धर्ममार्तंड तयार होते. तो म्हणायचा : " आम्हां दोघांना घ्या! " आणि शेवटी जगन्नाथ पत्नीसह गंगेच्या तीरावर तंबू ठोकून राहता झाला. काशीक्षेत्री धर्ममार्तंडांच्या नाकावर टिच्चून राहिला. याच सुमारास दक्षिणेकडचे एक पंडित काशीला आले होते. अप्पया दीक्षित त्यांचे नाव. त्यांच्या व्याकरणग्रंथावर जगन्नाथाने कठोर टीका केलेली. " महिषीपुत्रः अयं ग्रंथकारः लंबकर्णः -हा ग्रंथकार हेला आहे, गाढव आहे. " असे जगन्नाथांनी म्हटलेले. अप्पया दीक्षित पहाटे गंगेचे स्नान करून जात होते. तंबूत जगन्नाथ राहतात कोणी म्हटले. तेव्हा तंबूच्या दारात उभे राहून अप्पयांनी पुढील चरण म्हटला :

" किं निःशंकं शेषे शेषे वयसः समागतो मृत्युः – अरे, मृत्यू जवळ आला. निःशंकपणे झोपतोस काय? " चरण ऐकून जगन्नाथांनी पडल्या पडल्या पाहिले. तेव्हा अप्पया पुढच्या चरणात म्हणाले :

" अथवा सुखं शयीथाः निकटे जागर्ति जान्हवीजननी – झोप बेटा, झोप. जवळ गंगामाता जागी असल्यावर तुला कसली चिंता! "

असे म्हणतात की, या चरणाचा जगन्नाथांवर अपार परिणाम झाला. त्यांना हिंदुधर्मीयांनी बहिष्कृत केले होते. मुसलमानांत मान नव्हता. जगन्नाथ गंगेच्या घाटावर बसून गंगालहरी स्तोत्र म्हणू लागले. गंगा एकेक श्लोक ऐकून एकेक पायरी वर येई. स्तोत्र पुरे झाले! गंगा जगन्नाथांना घ्यायला आली. जगन्नाथ म्हणाला : " आई, तूही आम्हा दोघांना नाही का घेत? " गंगेने शेवटी दोघांना जवळ घेतले. अशी ही दंतकथा. जगन्नाथ व त्यांची पत्नी लवंगिका यांनी का गंगेत जीव दिले? प्रभू जाणे. परंतु ते गंगालहरी स्तोत्र अनुपम आहे. एकेक श्लोक वाचून हृदयातील भावगंगेला खरेच भरते येते.

सुधामाई, तू संस्कृतचा अभ्यास कर. गांधीजी म्हणायचे : " संस्कृत यायला हवे. " जगन्नाथ पंडित संस्कृत भाषेचे प्रभू होते. ते एके ठिकाणी म्हणतात :

" वाचामाचार्यतायाः पदमनुभवितुम् कोऽस्ति धन्यो मदन्यः "

वाणीचे आचार्यपद मिरवायला माझ्याहून श्रेष्ठ पुरुष कोण आहे? त्यांनी रसगंगाधर म्हणून साहित्यशास्त्रावर मोठा ग्रंथ लिहिला. त्यात उपमा, रूपक वगैरेंची उदाहरणे देताना दुसऱ्यांचे श्लोक त्यांनी घेतले नाहीत. ते अभिमानाने म्हणत :

" किं सेव्यते सुमनसां मनसाऽपि गंधः
कस्तूरिकाजननशक्तिभृता मृगेण ॥ "

" कस्तुरी प्रसवण्याची ज्याची शक्ती तो कस्तुरीमृग फुलांच्या गंधाची मनात तरी कशाला इच्छा करील ? " असे हे जगन्नाथ ! त्यांचे चरित्र मला फार आवडते. त्यांच्या कवितांचे एके काळी मला वेड असे. या ज्येष्ठ महिन्याच्या दशाहरात जगन्नाथाच्या गंगालहरीवर दहा दिवस कोठे प्रवचन करतात. भारतीय संस्कृती म्हणजे गंगासंस्कृती. गंगेसारखी वाणी, गंगेसारखे निर्मळ जीवन. तुकाराम महाराज म्हणतात : "चित्त जैसें गंगाजळ." भारतीय संस्कृतीत गंगेचा अपार महिमा. गंगेने हिंदी हृदय जोडले आहे. मनुष्य कोठेही असो, मरताना तोंडात गंगा घालतात. घरोघर गंगेची लोटी लावून ठेवलेली. असे हे प्रेम अन्यत्र आढळणार नाही.

सुधामाई, दशाहर संपला आणि वटपौर्णिमा आली. सावित्रीचा दिवस. सत्यवान–सावित्रीची कथा तुला माहीतच आहे. मृत्युदेवाजवळही चर्चा करणारी सावित्री ! ज्याला वरायचे तो पती अल्पायुषी आहे असे कळले तरीही त्यालाच वरणारी ! पती वनात राहणारा, त्याच्याबरोबर वनात राहणारी ! सावित्रीचा अपार महिमा ! आणि पतीचे प्राण परत घेऊन ती येते. पतीचे प्राण मागण्याच्या आधीही सासऱ्याचे डोळे मागते, त्याला राज्य मागते, आणि मग स्वतःचे सौभाग्य ! केवढी उदात्तता ! आणि महाभारतात वर्णन आहे, पौर्णिमा होती तरी रानात नीट उजेड पडला नव्हता. परंतु रानात वणवे पेटले होते. त्याच्या उजेडात ती पतीचा हात धरून येत आहे. त्या सावित्रीच्या व्रताचा दिवस. तू श्यामच्या आईत पहिल्याच प्रसंगात वटपौर्णिमेचा प्रसंग वाचला असशील.

वटपौर्णिमेला परवा पाऊस होता तरी सुवासिनी वडावर जात होत्या. आंबे, गरे वडाला ठेवायला जात होत्या. ज्यांना वडावर जाववत नव्हते त्यांनी घरीच वडाची डहाळी आणून पूजा केली. एक मित्र म्हणाला : "मुंबईस बायका वडावर जातानाही पायात चपला घालून जातात." मी म्हटले : "त्या चपलाही सोवळ्यातील असतील. पुण्याला भटजी कद नेसून, हातात दर्भ घेऊन सायकलवरून नाही जात ? आणि बाह्य गोष्टींना महत्त्व नको. मनात भाव असो म्हणजे झाले."

सुधामाई, मृगाचा पाऊस चांगलाच पडत आहे. भाताचे रोप उगवले आहे. हिरवे हिरवे तरवे सर्वत्र दिसत आहेत. आणि ते हिरवे गवतही सर्वत्र उगवले आहे. गायी–म्हशींना चरायला झाले. पाऊस पडत असला म्हणजे गाय मान वाकडी करते. पाऊस लागू नये तिला वाटते. परंतु म्हशीला अपार आनंद होतो. मोराला खूप आनंद होतो म्हणतात. आकाशात मेघांचे मृदंग वाजत असावेत, पाऊस पडत असावा, आणि मोर पिसारा उभारून नाचू लागतो. उज्जयिनीच्या क्षिप्रा नदीच्या तीरावर पावसात मोराला नाचताना मी पाहिले आहे. ते दृश्य मी कधी विसरणार नाही. रोमांचकारी दृश्य !

जांभळे, करवंदे, अळू यांना आता कोणी हात लावणार नाही. पाणी आत मुरले तर ही फळे बाधतात. शेजारी सर्वांनी मळ्यातून भाज्यांचे बी घातले आहे. आपल्या शेजारच्या मोरूने अंगणात भेंडी लावल्या आहेत. गुरांच्या गोठ्याजवळ भोपळीचे बी घातले आहे. काकडी, पडवळ, दोडके, सहस्रफळ,– सर्वांचे बी घातले आहे. उगवले अंकुर की वेल जायला शिरी लावावी लागतील. मग मांडव हवा. या सर्वांना शेणखत घालायला हवे. खटपट हवी. खटपटीशिवाय सारे फुकट.

मी चार दिवसांपूर्वी बाबूकडे गेलो होतो. तुळशीच्या अंगणात आजी होती. तुळशीवर मडके होते. उन्हाळ्यात तुळशीला गार वाटावे म्हणून मडक्याला बारीक भोक पाडून सतत धार ठेवतात. त्याला गळती म्हणतात.

"आजी, पाऊस सुरू झाला. आता हे मडके कशाला ?" मी म्हटले.

"अरे काढायचे राहिले. हसायला काय झाले ?"

" मी काढू ? "

" काढ. "

मी गेलो मडके काढायला तर ते फुटले. मला वाईट वाटले.

" फुटू दे हो. मडकेच ते. " आजी म्हणाली. प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक करायला हवी. धसमुसळेपणाने कामे बिघडतात. परंतु उन्हाळ्यात तुळसादेवीला गार वाटावे म्हणून गळती लावण्यात केवढी थोर भावना !

आता रात्र झाली. आकाश ढगांनी भरून गेले आहे. गारगार वाटत आहे. शेजारच्या घरी गणा चिलीम ओढीत आहे. आणि मी येथे ओटीवर घोंगडी पांघरून बसलो आहे. पाऊस पडू लागला म्हणजे माझे हृदय उचंबळते. मी येथे आहे परंतु तुम्हा सर्वांच्या आठवणी करीत आहे. शेकडो मित्रांच्या आठवणी करीत आहे. तिकडे श्री पाटण्याला आहे. तिकडे पाऊस असेल का ? त्याचीही आठवण येत आहे. कितीकांच्या सांगू ?


तुला खोकला झाला होता. गरम बंडी घाल. आणि तेथे समोर समुद्र, वारा असेल. अरुणासही जपा. तिला गोडसा पापा. इतर सर्वांस सप्रेम प्रणाम. माधवही पास झाला. असो. पुरे आता. गुरंगुटी करून झोपतो.

तुझा

**अण्णा**

ता. क. सुधा, तुला हव्यात फुलांच्या कथा. तगरीला खूप फुले येतात. तगरीचे फूल मोगऱ्याहून मोठे. परंतु वास नाही. तगरीचे फूल मला फारसे आवडत नाही. परंतु हिरव्या हिरव्या पानांमध्ये दिसते किती सुंदर ! तगर, मोगरा,– किती स्वच्छ पांढरी शुभ्र असतात नाही ही फुले ? काळ्या, तांबड्या मातीतून एवढे हे धवलत्व कोठून आणतात ? सृष्टीची गंमत. आणि रस्त्याच्या कडेला असणाऱ्या चिंचा, त्यांनाही लौकरच फुले येतील आता. बिट्टीकर्णाला तर बाराही महिने फुले असतात. मला बिट्टीकर्णाचे फूल आवडते. मंदमधुर वास असतो, नाही ? आणि त्या झाडांवर नेहमी मुंग्या. तू फुलांची प्रेमी, तुला सारे माहीतच आहे. तू आपल्या ड्रॉइंगच्या वहीत एकदा बिट्टीकर्णाचेच फूल रंगवले होतेस. मला आठवण आहे. पुरे आता.

साधना, १८ जून १९४९



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद

तुझी शाळा मागील आठवड्यात सुरू झाली असेल. मैत्रिणीमैत्रिणी सुटीनंतर पुन्हा भेटला असाल, सुटीतील गंमतीजमती सांगितल्या असाल. आणि पहिल्या दिवशी शाळाचालकांनी तुमचे सुस्वागतम् करून सुटीच दिली असेल. आता अभ्यास सुरू झाले असतील. तू ड्रॉइंगच्या दुसऱ्या परीक्षेस यंदा बसून घे. तुला आवड आहे. पुढील वर्षी तू शालान्त परीक्षेच्या वर्गात जाणार, मग जमणार नाही. याच वर्षी बसून घे.

मृग नक्षत्र संपले. परंतु पाऊस फारसा पडला नाही. लोकांनी पेरण्या केलेल्या. रोप वर आले आहे. एखादी सर येते. परंतु रोप जिवंत राहिले तरी त्याला जोर नाही. पावसाकडे ऐन्हापासून डोळे. खरे म्हणजे पावसाची झड हवी. कोणी म्हणतात, पुढचे आर्द्रा नक्षत्रही कोरडे जाणार. खरोखरच तसे होणार असेल तर तोंडचे पाणीच पळेल. हा आपला देश आधीच अनेक दुःखसंकटांतून जात आहे. परदेशांतून धान्य आणावे लागत आहे. मागील

वर्षी गुजरात काठेवाडकडे दुष्काळ! एक बादलीभर पाणी दिवसाकाठी मिळे. तेवढे कसे तरी पुरवायचे. यंदाही जर पाऊस न आला तर कसे व्हायचे? तिकडे चीनमध्ये नद्यांना पूर येऊन हजारो माणसे वाहून गेली. आणि आपल्याकडे पाणी नाही! परंतु या काही हातच्या गोष्टी नाहीत. कृत्रिम पाऊस पाडण्याचे प्रयोग शास्त्रज्ञांनी केले म्हणतात. परंतु अंगणभर जागेत पाऊस पाडण्याचा प्रयोग करणे निराळे आणि साऱ्या धरणीवर पाऊस पाडणे निराळे!

परंतु आकाश कालपासून ढगांनी भरलेले आहे. दोनचार दिवस चांगलेच ऊन पडले. परंतु ऊन खूप पडल्यावर पाऊस येतो म्हणतात. येऊ दे. लहान मुले जरा झिमझिम पाऊस येताच--

"येरे येरे पावसा
तुला देईन पैसा"

वगैरे गाणी म्हणत अंगणात नाचू लागतात. परंतु येत नाही अजून जोराने. आरंभी जोराने पडला. रोहिणीतच खळखळ पऱ्हे वाहू लागले. परंतु ते पऱ्हे, ते ओढेनाले पुन्हा सुकले, वाळले. थोडे थोडे कोठे पाणी आहे, इतकेच. सुधा, एक पूर येऊन गेला. साकवावर पाणी आले होते. सोंडेघरच्या पऱ्ह्यातून एक मुलगा वाहून जाताना वाचला. त्याच्या पाण्याला ओढ फार. आपल्या गावात पऱ्हे तरी किती! सोनार आळीचा, खोंड्यातला, खेरांच्या आळीचा; आणि तो शिरखलचा, हा सोंडेघरचा! सुधामाई, प्रत्येक ओढ्याची निराळी गुणगुण, निराळा नाद! एवढेच नव्हे तर तोच ओढा सर्वत्र तीच भाषा बोलत नाही. आपला खोंड्यातला पऱ्हा आहे ना, तो तिकडे मळीच्या शेताजवळ आला की निराळीच त्याची गुणगुण. दगडावरून उड्या घेत येताना तो खो खो हसतो, तर मग पुढे अगदी गंभीर होतो. जणू त्याची समाधी लागते. मघाचा तो अवखळ, खो खो हसणारा, उड्या मारणारा, गडबड करणारा तोच का हा प्रवाह? परंतु मोठा लबाड हो. केळकरांच्या साकवाजवळ शान्तपणा धारण करणारा हा प्रवाह पुढे ओकांच्या शेताजवळ गेला की पुन्हा गाणे म्हणू लागतो. निरनिराळ्या प्रवाहांचे हे विविध संगीत ऐकणे मोठे मजेचे असते. परंतु सृष्टीकडे इतके लक्ष द्यायला वेळ कोणाला नि हौस तरी कोणाला?

परंतु हे ओढे पाऊस थांबताच पुन्हा दीन झाले आहेत. कधी येणार बरे पाऊस? गणपतीच्या देवळाजवळील तळे थोडेफार भरले. त्याच्या काठाने आता बेडूक दिसतात. पावसाळा बेडकांना फार आवडतो. पावसात त्यांना बाळसे चढते. हळूहळू सारे पिवळे पिवळे होतील. पाऊस पडू लागताच बेडूक वृंद-गान करू लागतात. रातकिडे ज्याप्रमाणे एकदम ओरडतात, तसेच बेडूक. रात्रीच्या शान्त वेळेस त्यांच्या ओरडण्याचा केवढा आवाज होतो! सुधामाई, फ्रान्स देशात अठराव्या शतकात जमीनदारांची बेडकांच्या ओरडण्यामुळे झोप मोडू नये म्हणून तळ्यांच्या व डबक्यांच्या पाण्यावर गरीब कुळांना काठ्या मारीत बसावे लागत असे!

हे मृग नक्षत्र संपत आले, संपले. परंतु ते मृगाचे किडे फारसे दिसले नाहीत. एकदा मला दोनचार दिसले. क्षणभर एक हातावर घेऊन मी खाली सोडला. किती सुंदर दिसतात हे किडे! लाल मखमलीसारखे मऊ मऊ अंग. संस्कृतमध्ये या किड्याला 'इन्द्रगोप' असा शब्द आहे. बायकांच्या कुंकवाच्या करंड्यात सौभाग्यवर्धक म्हणून हे किडे ठेवण्याची पद्धत असे. परंतु ती पद्धत दुष्टच नाही का? पिंजरेत ते किडे मरून जातात. तू एकच प्याला हे गडकऱ्यांचे अमर नाटक वाचले आहेस का? वाच. त्यात मरताना सिंधू आपल्या भावाला म्हणते: "तू त्यांच्यावर नको रागावू. अरे तू मृगाची पिलं माझं सौभाग्य राहावं म्हणून माझ्या पिंजरेच्या करंड्यात ठेवायचास." मला त्या वाक्याची परवा आठवण झाली. परंतु तू हसशील. आता कुंकूसुद्धा काळे निघाले आहे. कुंकू म्हणजे लाल ही भाषा आता गेली. तूही काळे कुंकू कदाचित लावीत असशील. कपाळाला शोभेल ते लावावे, नाही का?

हे लहानसे मृगाचे किडे! आठ दिवस दिसतात नि पुन्हा नाहीसे होतात. कोठे असतात त्यांची बारीक अंडी? मातीतील ती अंडी उन्हात-थंडीत मरत कशी नाहीत? का एकदम हे किडे कोठून जन्म घेतात? काय आहे हा प्रकार? साध्या क्षुद्र मातीतून हे नयनमनोहर किडे कोठून आले? आणि हे सौंदर्य, हे रंग,– सारे क्षणात पुन्हा नष्ट होणार! एकीकडे हे सुंदर मृगाचे किडे तर दुसरीकडे ते काळे, लवलव करणारी गांडुळे. या सर्वांचे या सृष्टीच्या जीवनात काय कार्य? आपणांस काय कळे!

आळ्यातील बी उगवले आहे. पडवळीचे, काकडीचे वेल थोडेथोडे आता वर जातील. परंतु पाऊस हवा. पाऊस जोराने येत नाही म्हणून सारे हवालदिल झाले आहेत. मी परवा काही गुजराती कविता वाचीत होतो. पावसावरच्या कविता वाचीत होतो. पाऊस येत नाही म्हणून कवी मोराला म्हणतो : " मोरा मोरा, तू तरी टाहो फोड. पृथ्वीची तगमग त्या दूर गेलेल्या मेघांच्या कानांवर घाल. मोरा, ओरड मोठ्याने, ओरड. "

आणि मग पाऊस येतो. जणू श्यामल कृष्णच ! इंद्रधनुष्याने सजून येतो. आकाशात वाद्ये वाजू लागतात. आला, मेघराज आला. धरित्रीला भेटायला भाऊ आला. प्रेमाने ओथंबून आला. आणि कवी म्हणतो : " हा भाऊ रिकाम्या हाताने नाही आला. त्याने हिरवे पातळ आणले आहे. आणि निर्झरांच्या संगीताच्या तोरड्या आणल्या आहेत." सुधा, छान आहे कल्पना, नाही ? आणि एका कवितेत पुढील प्रसंग आहे. शेतकऱ्याची एक मुलगी पाऊस येणार नाही म्हणून निघते, तो वाटेत तिला पाऊस गाठतो. ती ओलीचिंब होते. " मला भिजवायला आलास लबाडा; परंतु मला राग नाही तुझा. तुझ्या येण्यामुळे पृथ्वी नवरंगाने नटते तसे माझे हृदयही भावनांनी उचंबळते. मी शेतकऱ्याची मुलगी. मी का पावसाला कंटाळेन ? " असे ती म्हणते.

आपल्याकडे पावसावर फारशी गीते नाहीत. सृष्टीकडे आमच्या कवींचे लक्षच कमी. कोकणातील अपार सौंदर्याचे वर्णन करणारा कवी अजून जन्मायचा आहे.

आणि कोकिळेचे कुऊकुऊ आता ऐकू येत नाही. चिमण्याही अंगणात फार येत नाहीत. पावसात पाखरांची दुर्दशा. कोठे तरी वळचणीला, पाख्याखाली चिमण्या राहतात. पाऊस थांबताच भुर्रकन येतात, परंतु पटकन जातात. आता कोवळी पडवळे तोडायला बोलाडी येईल. मोठा दुष्ट पक्षी. तो स्वतः ते कोवळे बोटाएवढे बारीक पडवळ खात नाही– तर तोडून टाकतो ! त्यातच त्याचा आनंद ! त्याला भिवविण्यासाठी पेंढ्याचे भूत करून मांडवावर लावू. परंतु अजून अवकाश आहे.

मी परवा सुफी साधूंच्या काही गोष्टी वाचीत होतो. सुफी साधू म्हणजे मुसलमानांतील साधू. त्यांचा एक विशिष्ट पंथ असतो. ते प्रेमधर्मी असतात. ते धर्मान्ध नसतात. त्यातील एक गंमतीची गोष्ट तुला सांगू?

एक होता राजा. तो चैनी, विलासी होता; तरी स्वतःला देवभक्त समजे. एकदा तो राजवाड्यात बसला असता छपरावर कोणी चालत आहे असा आवाज आला. राजा म्हणाला : "बघा, कोण आहे?" एक नोकर गेला. तो छपरावर एक फकीर होता. नोकराने विचारले : "काय करतोस?" फकीर म्हणाला : "माझा हरवलेला उंट शोधतो." नोकराने राजाला येऊन सांगितले. राजाला आश्चर्य वाटले. तो स्वतः जाऊन फकिराला म्हणाला : "वेडपटा, उंट का कधी छपरावर चढतो नि तेथे राहू शकतो?" तो फकीर म्हणाला : "चैनीत राहून जर देव मिळणे शक्य असेल तर हे का अशक्य?" राजा उमगला. त्याने राज्य सोडले. तो गरिबीचे व्रत घेऊन राहू लागला. मला ही गोष्ट फार आवडली. ज्याचा आपण दावा करतो त्याप्रमाणे वर्तन हवे. तुम्ही विद्यार्थी. विद्या मिळविण्यात तुमचा बराचसा वेळ न जाईल तर तुम्ही कसचे विद्यार्थी? जे ध्येय, तदनुरूप जीवन हवे.


सुधा, आपल्या शेजारचे वासुकाका आहेत ना, त्यांची म्हैस व्यायली आणि मी खर्वस खाल्ला. तुझीही आठवण केली होती. आता पावसाळ्यात गायी-गुरे वितील. दूध जरा भरपूर होईल. पाऊस पडला तर चारा छान होईल. तेवढाच आनंद. कोकणात पावसाळ्यातच थोडेफार दूध. कोकणातील गुरे अधिक दूध देणारी कशी होतील, त्याचे प्रयोग व्हायला हवेत. तिकडे त्यागमूर्ती अप्पासाहेब पटवर्धनांच्या कणकवलीजवळील गोपुरीत प्रयोग होतील असे ऐकतो. पुरे आता.

मला की नाही पडसे झाले आहे. पत्र लिहिताना कितीदा सू सू करीत आहे. आज रात्री लंघन केले आहे. पडसे कमी व्हायला तोच उपाय. तुम्ही सारी सुखी असा. अरुणाला गोड पापा. इतरांस स. प्र.

तुझा

अण्णा

साधना, २९ जून १९४९



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद

मागचे पत्र मिळालेच असेल. पाऊस अजून नाही. हे आर्द्रा नक्षत्र. परंतु कोरडे जाणार की काय अशी भीती वाटत आहे. काल रात्री ढग जमले होते. परंतु पुन्हा त्यांचे एकमत झाले नाही असे दिसते. चारी दिशांना निघून गेले. विहिरीत अजून ढोपरभरच पाणी आहे. एव्हांना विहिरी भरू लागतात, परंतु यंदा कशालाच पत्ता नाही. कठीण दिवस येत आहेत. हिंदुस्थानची सत्त्वपरीक्षा आहे.

सुधा, तुला आश्चर्य वाटेल, परंतु आम्ही विहिरीतून पाणी काढून वेलांना घालीत आहोत. काकडीचे, पडवळींचे वेल जरा वाढले आहेत. भेंडीचे माडेही बोटाएवढे झाले आहेत. पाऊस पडेपर्यंत या सर्वांना जगवले तर पाहिजे. अलीकडे वृक्षारोपणाचा दिन सर्वत्र पाळतात. मागील वर्षी १५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिवशी लाखो झाडे लोकांनी देशात सर्वत्र लावली. १५ ऑगस्ट म्हणजे जरा उशीर होतो, नाही ? निम्मे पावसाळा तोवर संपलेला असतो. आताच नवीन झाडे लावायला हवीत. परंतु यंदा अजून पाऊसच नाही. फणसाचे माडे शेजारचा रामू लावणार आहे. खरे म्हणजे लावलेला रोपा जगवणे हे

मोठे कठीण काम असते. देवाचा पाऊस आहे तोवर ठीक. परंतु पुढे हिवाळा संपून उन्हाळा आला की या लहान माड्यांना दोनदा पाणी घालावे लागते. तुला एक आठवण सांगू ? १९३० मधील प्रसंग. प्रचार करायला मी एका खेडेगावात गेलो होतो. देशात सत्याग्रह सुरू झाला होता. गावोगाव उत्सुकता होती. त्या गावी मी उजाडत गेलो. दवंडी मीच दिली. आणि नंतर एका झाडाखाली गाणी गात उभा राहिलो. हळूहळू लोक आले. सभा झाली. मी जायला निघालो. तेव्हा एक म्हातारा शेतकरी माझ्याजवळ येऊन म्हणाला : "तुम्ही या गावात येण्याचे पाप कशाला केलेत ? कशाला सभा नि हे भाषण ?" मी त्यांना नम्रपणे म्हटले : "बाप्पा, मी का वाईट गोष्टी सांगितल्या ? मी कोणते पाप केले ?" तर ते म्हातारेदादा म्हणाले, "आमच्या गावात कधी सभा झाली नाही. आजची ही पहिली सभा. आता पुन्हा कधी होईल हरि जाणे. आम्ही शेतकरी लोक. आम्ही बी पेरले, झाड लावले तर ते मरू देत नाही. ते पेरलेले फुकट जाऊ नये, लावलेले मरू नये म्हणून आम्ही जपतो. तुम्ही आज आमच्या मनात काही विचार पेरलेत. त्याला पाणी घालायला कोण येणार आहे का ? नाही तर नुसती पेरणी करून गेलात नि त्याची काळजी नाही घेतलीत तर ते पाप नाही का ?" त्या वृद्ध शेतकऱ्याचे म्हणणे किती यथार्थ, नाही ?

सुधा, मागील वर्षी तू नारळाचे माडे लावले होतेस. ते जगले का ? उन्हाळ्यात त्यांना पाणी घातलेस का ? ते एक कर्तव्यकर्म असते. आणि थोडेफार शारीरिक श्रमाचे काम करण्यात आनंद असतो. तू नेम कर की, तासभर तरी शारीरिक श्रम करावयाचे. स्वतःचे कपडे शक्य तो स्वतः धुवावे. केर काढावा. अंगण झाडावे. आता पावसाळ्यात अंगणात गवत वाढेल ते गवत वेणून अंगण साफ करावे. लहानपणी शनिवार-रविवारी वडील आम्हांला अंगण साफ करायला सांगायचे. शरीरश्रम आनंदकारक वाटायला हवा. निदान तास दोन तास तरी अशा कामात जावेत. चहाचा आपला कप आपण विसळावा. मी पुण्यात एके ठिकाणी राहात होतो. ज्यांच्याकडे राहात असे त्यांच्याकडे एक नियम, की आपले ताट ज्याने त्याने घासून आणावे. केवळ पोषाखीपणा काय कामाचा ? कोणतेही उपयोगी काम तुच्छ नाही, समजलीस ना ?

अजून इकडे आंबे आहेत. थोडेफार फणसही आहेत. आंबे यंदा मागस होते. मुंबईला पाठवायला साधनही नाही. माणसाची ने–आण करायला मोटरी नाहीत तर फळांसाठी कोठल्या ? आंब्याचा रस आटवून लोक ठेवतात. त्यात साखर घालून डबे भरतात. परंतु इकडे साखरही मिळेना. काय करायचे ! कोकणात पाऊस सुरू झाला की जांभळे, अळू, करवंदे वगैरे फळे कोणी खात नाहीत. लहानपणी आम्ही गोष्टी ऐकायचे की पाणारलेली जांभळे खाऊन वाटेतच शौचास होऊन व वांती होऊन वाटसरू मेले. ही फळे पाणी आत शिरले की बाधा करतात. अग एका गावी अननसाची खूप लागवड. परंतु पाऊस आला. मुंबईस पाठवता येत ना. साधन नाही. कोकणात कोणी खाईना. ते अननस कापून त्यांच्याच बुंध्यांखाली पुरण्यात आले ! किती नुकसान !

मी दोनतीन आंब्याच्या कोयी भाजून खाण्यासाठी जमवून ठेवल्या आहेत. मागे गांधीजींनी ‘ आंब्याच्या कोयींचा उपयोग करा ’ म्हणून लिहिले होते. कोकणात आपण फार पूर्वीपासून या कोयी भाजून खातो. दुपारचा स्वयंपाक झाला म्हणजे मंद निखाऱ्यात ( मुमरात ) त्या भाजत टाकायच्या. कशा रुचकर खमंग लागतात ! आपल्या नानांच्या काळांब्याची बाठ फारच सुरेख. तुझे आजोबा होते, त्यांना ती फार आवडे. मी त्यांना भाजून द्यायचा.

परवा एक वाईट गोष्ट झाली. आपल्या अंगणातील नारळीच्या झाडावर कावळ्याने घरटे केले होते. मागील वर्षीही त्यांनी तेथे घरटे केले होते. नर आणि मादी काटक्याकुटक्या गोळा करून घरटे बांधण्यासाठी श्रमत. आणि मृग नक्षत्राच्या आरंभी अंड्यातून पिलू बाहेर आले. आम्ही बघत असू. ते घरट्यातून चोच बाहेर काढी. चोचीच्या आतला भाग लाल लाल दिसे. परंतु परवा तिसरे प्रहरी केव्हा तरी ते पिलू खाली पडले ! आणि मांजर किंवा कुत्रा कोणी तरी ते मारले, खाल्ले. मी सायंकाळी अंगणात हिंडत होतो तो कोवळ्या पिसांचा नुसता बुडखा तेथे होता. अरेरे ! मी ती कोवळी पिसे हातात घेऊन बसलो. दुसऱ्या दिवशी सकाळी नर–मादी टाहो फोडीत होती. काय करणार आपण ? दिवसातून तीनचार वेळा ते मायबाप आले. एकदोनदा आले. काल आज नाही आले. पुन्हा संसारात रमली दोघे. दोन दिवस त्यांना स्मृती होती. मनुष्याला अधिक स्मृती राहते. दुःख आपणही विसरतो. परंतु पशुपक्ष्यांना

स्मृती राहात नसावी. पक्षी घरटी बांधण्यात कुशल असतात. कावळ्याचे, चिमणीचे घरटे तितके सुंदर नसते. साळुंकीचे त्या मानाने जरा बरे असते. परंतु काही काही पक्षी फारच सुंदर बांधतात. तू झाडांना लोंबणारी घरटी बघितली असशील. लांब येऊन मग ती वर वळवलेली असतात. काही काही घरट्यांतून मुळीच पाणी जात नाही. सुधा, एक पक्षी आहे तो झाडांच्या मोठ्या पानांना शिवतो, टाके घालतो. चोचीने टोचून त्यातून काडी अडकवतो. जणू दोन पानांचा द्रोण करतो. आणि दोन पानांचे पूट करून त्यात मग काड्या, कापूस जे मिळेल ते आणून सुरेखसे घर करतो. हे सारे निसर्गनिरीक्षण बोधप्रद असते.

कधी कधी मुले पक्ष्यांच्या पिलांची ही घरटी पळवतात. महंमद पैगंबरांना याचे फार वाईट वाटे. एकदा मुलांनी एका घरट्यातून पिलाला पळवून आणले. पैगंबर म्हणाले : " तुमच्या आईजवळून तुम्हांला पळवले तर ? चला त्या झाडाजवळ. " मुलांना घेऊन पैगंबर त्या झाडाजवळ गेले. मादी ची ची करीत होती. त्या घरट्यात ते पिलू ठेवले गेले. मादीला बघताच त्या पिलाची कोवळी किलबिल सुरू झाली. पैगंबराच्या मुखावर प्रेम फुलले !

मनुष्याला सर्वांविषयी अशी सहानुभूती असावी. चिमण्या, कावळे, साळुंक्या आपल्या आसपास असतात. त्यामुळे जीवनात गोडी येते. सुधा, कधी कधी हजारो मैलांवरचे पक्षी ठरलेल्या काळात आपणाकडे येतात. आम्ही मागे तुरुंगात होतो. तेथे के. के. मेनन आणि वाय. के. मेनन असे दोन राजबंदी होते. ते माझे मित्र बनले. वाय्. के. भाकरीचे तुकडे चिमण्यांना टाकायचे. या चिमण्या पुढे पुढे त्यांच्या खांद्यावरही येऊन बसत. दुसरे जे के. के. मेनन होते ते पक्ष्यांचे अभ्यासी. एकदा एक काळसर, लांबट शेपटीचा पक्षी दिसला. थोडे ठिपके होते अंगावर असे आठवते. भीतभीत तो पक्षी दूर बसे. के. के. म्हणाले : " हा तुर्कस्तानकडचा पक्षी आहे ! " परवा कोठे तरी वाचले की उत्तर ध्रुवाकडचे पक्षी तिकडे फार थंडी आली की उष्णता मिळावी म्हणून सिसिली बेटात येत. लाखोंनी येत. त्यांची पिसे फार सुंदर असत. त्या पाखरांना पकडण्यासाठी जाळी पसरली जात. आणि त्यांची पिसे मग पॅरिसच्या श्रीमंत बायकांच्या

टोप्यांसाठी जात. धर्मगुरू पोपला या व्यापारावरील कराचे अपार उत्पन्न मिळे! मनुष्य हा सर्वसंहारक आहे असे एखादे वेळेस वाटते! परंतु तो विश्वावर प्रेम करणाराही आहे. तुझी एक चुलत आजी होती. मी पुष्कळ वर्षांपूर्वी एकदा तिच्याकडे गेलो होतो. ती एकटी होती. मूल ना बाळ. म्हातारी झालेली. त्या मोठ्या घरात एकटी भुतासारखी वावरे. परंतु त्या घरात तिची मांजरी होती. मी गेलो तर म्हणाली : "बस हो. हिला आधी काढा पाजते. पडसे झाले आहे रे हिला. दोन बोंडली काढा पाजला म्हणजे तिला बरे वाटेल." आणि तिने त्या मांजरीला काढा पाजला. मनुष्याला प्रेम करायला, वात्सल्य दाखवायला कोणी तरी हवे असते. गाय व तिची वासरे यांवर प्रेम करणारी सीताआते तुला माहीत आहेच.

फुलांचा अजून खरा बहर सुरू झाला नाही. पावसाळी फुले आणखी आठपंधरा दिवसांनी पखरण पाडू लागतील. निशिगंधाचे ताटवे फुलवतात. सायंकाळी पाऊस नसला म्हणजे कसा मंद सुगंध सुटतो! मला निशिगंधाचा मंदमधुर वास फार आवडतो. अंगणात बाजूला धुपारती आहे. आता तिला फुले नाहीत. परंतु उन्हाळ्यात यायची. आणि धुपारतीची फुले दुपारी फुलतात. बहुतेक फुले सकाळी किंवा सायंकाळी फुलणारी. भर दुपारी प्रखर सूर्याला बघण्यासाठी आपले चिमणे डोळे उघडणारी ही धुपारतीची फुले खरोखरच धन्य होत. त्यांच्या पिवळ्या रंगात जरा लालसर छटा असते. साध्या पाकळ्या, मध्ये तो परागपुंज! ही दुपारी फुलणारी फुले सायंकाळच्या धुपारतीलाच उपयोगी पडतात. म्हणून का धुपारती नाव? रास्तुऱ्यावर थोडी थोडी फुले दिसतात. गोडबोल्यांच्या बागेतील पिवळ्या रास्तुऱ्यावर थोडी फुले आहेत. आता अंगणाच्या कडेला अडुळसे नुसते पानांनी गजबजले आहेत. उन्हाळ्यात ती पांढरी फुले त्यांना यायची. दोन पाकळ्यांचे फूल. देखाला तो गोड मध. मुले शाळेतून बाहेर जातात व ती मध चुंफतात. एकदा माझ्या लहानपणी मास्तरांनी एका मुलाला काठी आणायला सांगितले. तो गेला अडुळशाची काठी आणायला. परंतु काठी मोडून आणण्याऐवजी तो मधच चुंफीत बसला. आणि त्यालाही मार मिळाला! अडुळशाची पाने कडू कडू जहर! परंतु याच्या फुलात हा अमृतप्राय मध! सृष्टीत मौज आहे. अडुळशाच्या पानांचा

मधयुक्त रस खोकल्यावर देतात. मर्क नावाची प्रसिद्ध जर्मन औषध कंपनी अडुळशाच्या पानांपासून खोकल्याचे औषध करून जगभर पाठवी. मर्क कंपनीने किती तरी हिंदी वनस्पतींची शास्त्रीय औषधे तयार केली !

सुधामाई, माझे पडसे आता बरे आहे. तू बरी आहेस ना ? सायकलवर आता येऊ लागले का बसायला ? पाऊस नसेल तेव्हा शिकावे. आणि अरुणा काय म्हणते ? ती पपीच्या पाठीवर बसून तिचा घोडा घोडा करते की नाही ? अता खूप बोलते, होय ना ? " थांब हो, खरेच. " हे शब्द मोठ्या ठसक्यात बोलते म्हणून तू लिहिलेस. परंतु तिला भीती नका शिकवू. बाऊ येईल—नीज, असे नका म्हणू. दुसरे काही म्हणा. लहान मुलांना भीती घालू नये. तसेच त्यांना रागे भरू नये. थोडे रडू दिले तर चालेल. लहान मूल या अफाट जगात येऊन उभे राहते. ते प्रेम, माया, सहानुभूती यांचे भुकेलेले असते. लहान मुलाला कोणी बोलले, कोणी मारले तर त्याला काय बरे वाटत असेल ? एवढासा मी लहान जीव ! या जगात आलो. का हे मला बोलतात, मारतात ?


अरुणा तर तुमची सर्वांची करमणूक. तुम्ही सारी कुशल असाल अशी आशा आहे. तुझ्या चारूला म्हणावे, ' नापास झालीस म्हणून नाउमेद नको होऊ. ' अजून लहान आहेस. पुढील वर्षी उत्तीर्ण हो. सर्वांस स. प्र. लहानांस स. आ.

साधना, १६ जुलै १९४९

तुझा

अण्णा

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों. १०९९९



चि. प्रिय सुधास
सप्रेम आशीर्वाद

मागले पत्र तुला वेळेवर मिळाले नाही. पावसाच्या दिवसांत असे कधी कधी होते. कोकणातून जाणाऱ्या नि कोकणात येणाऱ्या टपालाची पावसाळ्यात गंमत असते. आधीचे पत्र कधी नंतर मिळते. माझे मागचे नि हे दोन्ही पत्रे तुला एकदम मिळतील. तुला वाचायला कंटाळा येणार नाही, अशी आशा तर करतो. सुधा, पत्रे आवडतनाशी झाली तर कळव. मी मग वरचेवर लिहिणार नाही.

मागील पत्राच्या वेळेस पाऊस नसल्यामुळे लिहिताना मी सचिन्त होतो. शेतकरी व इतर सारेच लोक हवालदिल झाले होते. रोपे सुकून चालली होती. वारली वगैरे लोकांच्या जमिनी भारी नसतात. माळजमिनी त्या. तेथील रोप कसे टिकाव धरणार ? पुन्हा ते हळव्याचे बी पेरतात. कारण ते भात लौकर तयार होते. गौरीगणपतीला खायला होते. परंतु यंदा आता काय करतील हे लोक ? पहिले रोप सुकले. पुन्हा पेरायला बी कोठून आणतील ? सहकारी संस्थांनी, जिल्हा सुधार मंडळांनी, अधिक धान्य पिकवा प्रचार-खात्यांनी बी दिले तर पेरतील पुन्हा.

पाऊस पडल्यामुळे शेतीची कामे थांबली. मजुरी नाही. घरात खायला नाही. गरीब बाया ओल्या लाकडाच्या मोळ्या विकायला आणू लागल्या. या दिवसांत सुके लाकूड कोठून? परंतु त्यांच्या ओल्या मोळ्या कोण घेणार? गावभर वणवण करीत, 'घ्या दादा, द्या दोनचार आणे' म्हणत आणि कमी किमतीत त्या देत. अशा वेळेस ग्रामोद्योग हवा असतो. मी खानदेशात हिंडताना, पावसाळ्यात तीन तीन दिवस ज्यांच्या घरात चूल पेटली नाही अशी गरीब कुटुंबे खेडेगावातून पाहिली आहेत! मुसळधार पाऊस असला म्हणजे देशावर शेतात कामाला जाता येत नाही. मग खायचे काय? घरात साठा कसलाच नसतो. अशा वेळेस सर्वांनी घरात चरका चालवला, सूत काढले तर आधार होईल. ते सूत ताबडतोब विकत घेणाऱ्या संस्था हव्यात. चरकेही बरेच सूत देणारे हवेत. जपानात आपल्याकडच्यापेक्षा दुप्पटतिप्पट सूत देणारे चरके निघाले आहेत असे कळते. ग्रामोद्योग जपान्यांनीच चालवावेत. त्यांनी ग्रामोद्योग व यंत्रोद्योग यांचा सुंदर समन्वय केला होता. पुन्हा ग्रामोद्योगातही कला, सुंदरता.

परंतु हे पत्र लिहिताना आनंद होत आहे. ज्येष्ठ महिना संपला आहे. आषाढ सुरू झाला. आर्द्रा नक्षत्र निम्मे होऊन गेले, तरी आर्द्रता कोठे नव्हती. कसे होईल वाटत होते. तो चार दिशांनी ढग आले. पश्चिमेचे वारे येऊ लागले. आकाश मेघांनी भरले. जो तो अंगणात येऊन पाहू लागला. आपली सोनार-आळीची बयाआते म्हणाली: "देव भरून आला आहे." ढग म्हणजे देव! किती यथार्थ! जो आधार देईल तो आपला देव होतो. महात्माजी एकदा म्हणाले: "चरका माझा देव. कारण तो अन्न देतो, स्वाभिमानाची भाकर देतो, स्पर्धातीत धंदा देतो." बयाआते पावसाला देव म्हणाली. आपले धर्म-ग्रंथ वेद. त्यांत पर्जन्यदेवाची सुंदर स्तोत्रे आहेत. सुधा, आकाशात देव भरून आला. कारुण्याच्या अमृताने ओथंबून आला. आणि गडगडाट होऊ लागला. वीजही चमकली. मेघांना फाडून ती बाहेर येऊ पाही. पाऊस आला,–आला! किती आनंद झाला सर्वांना! मला संस्कृतमधील महाकवी कालिदास याच्या मेघदूतातील त्या सुप्रसिद्ध चरणांची आठवण झाली. कालिदास मोठा निसर्ग-प्रेमी. तू मोठी झालीस म्हणजे वाच. त्याने लिहिलेल्या शाकुन्तल नाटकातील शकुंतला फूलपल्लवही तोडीत नाही. इतके तिचे झाडांवर प्रेम. "वृक्षांनो,

पल्लवांवर प्रेम असूनही जी तोडीत नसे ती ही शकुंतला आज सासरी जात आहे. तिला आशीर्वाद द्या." असे शकुन्तलेला पाळणारा कण्वऋषी म्हणतो. कालिदासाचे कोमल, प्रेमळ, निसर्गप्रेमी हृदयच येथे प्रकट होत आहे असे वाटते. पावसाळ्यात हा कवी आकाशाकडे बघत असावा. आणि तो म्हणतो :

" आषाढस्य प्रथमदिवसे
मेघमाश्लिष्ट सानुं
वप्रक्रीडापरिणतगज-
प्रेक्षणीयं ददर्श "

" आषाढाचा पहिलाच दिवस, आणि डोंगरावर ढग उतरले. मत्त हत्तीप्रमाणे जणू ते दिसत होते." सुधा, परवा खरोखरच असे ढगांवर ढग आले. आणि पाऊस, वारा, गडगडाट, चमचमाट सारे प्रकार सुरू झाले. मी ओटीवर बसलो होतो. शेजारच्या सुंदराताईची छोटी विभा आपल्याकडे आली होती. तिची आईही होती. विभा रडू लागली. मी तिला म्हटले : " ये, पाण्यात होडी टाकू." आणि मी कागदाची होडी केली. विभाने पाण्यात टाकली. तिने टाळ्या वाजवल्या. पागोळ्या मोत्यांच्या सरांप्रमाणे गळत होत्या. विभाने आपले चिमुकले हात पागोळ्यांसमोर केले. हातांवर पडलेले पाणी ती प्यायली ! मौज. अंगावरचे घामोळे जावे म्हणून गोविंदभटजींचा वामन अंगणात नाचत होता.

" पुरे. पडसे होईल." त्याची आई म्हणत होती. असा पाऊस दोनतीन दिवस पडला. ओढे खळबळ करू लागले. मी खेरांच्या उतरंडीकडून जात होतो. पाण्यातून केवढा एक साप सळसळ करीत गेला ! तो बहुधा विषारी नसावा. तो अधेला असेल. अधेला रविवारी विषारी असतो असे म्हणतात. मी त्या सापाकडे बघत होतो. गेला शेतात. साप पाहिला म्हणजे रामकृष्ण-काकांकडची गोष्ट आठवते. तुला आहे माहीत ? अशाच पावसाळ्यातील गोष्ट. विहिरी भरल्या होत्या. आणि काकांचा मुलगा कसा केव्हा विहिरीजवळ गेला नि पडला कळले नाही. मागून हाकाहाक, शोधाशोध झाली. विहिरीची शंका आली. काका पट्टीचे पोहणारे. बुड्या मारणारे ! आणि बाळ सापडला. परंतु तो देवाघरी गेला.

दुसरा दिवस होता. जरा ऊन पडले होते. आणि आपली अंबू मागील दाराने शेताडीतून काकांकडे समाचाराला आली. ती राहणार होती दोन दिवस. दिवस मावळला. रात्रीची वेळ. माजघरात रामकृष्णकाका, काकू, अंबू वगैरे बोलत होती. मृत बाळाच्या आठवणी निघत होत्या. सारी दुःखी होती. काकूंच्या डोळ्यांतून टचकन पाणी येई. धीरगंभीर काकांनाही हुंदका येई. तो काका एकदम चपापले.

" अरे बाप रे ! " ते म्हणाले.

माजघरातून ओटीवर जायला दार होते. तेथे जिनाही होता. दाराच्यावर उतरला होता. उतरल्यात नाना वस्तू असायच्या. तेथे कोयती असायची. चुन्याचे मडके असायचे. परंतु त्या उतरल्यावरून एक जातिवंत सर्प खाली येत होता. खाली दिवा असल्यामुळे तो जरा दिपावला होता. फणा खाली आली होती. दहाचा आकडा दिसत होता. काकांनी दिवा मोठा केला. अंबू दुपारी शेताडीतून आली. जरा ऊन पडलेले. हे सर्पराज बिळातून बाहेर येऊन गवतातून जात असावेत वा पडून राहिले असावेत. अंबूचा पाय लागला असेल. धक्का लागला असेल. अपमान वाटून तो पाठोपाठ आला असावा. केव्हा तरी घरात शिरून उतरल्यावर लपला असावा. आणि रात्री फणा करून निघाला दंश करायला. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. दुसरी लहान मुले तेथे निजलेली. कोकणात पुष्कळांच्या घरी कांवेरू असते. बांबूच्या लांब काठीला त्रिशूळ बसवलेला असतो. त्रिशूळ दुरून सापात रोवायचा, त्याला जखडून डांबून ठेवायचे नि दुसऱ्याने मग काठीने मारायचे. असे केल्याशिय गत्यंतर नसते. काकांकडे कांवेरू होते. परंतु ते ओटीवरच्या खुंट्यावर होते. जायचे कसे ? मागील दार उघडून घराला वळसा घालून ओटीवर जाऊन ते घेऊन येईपर्यंत तो खाली यायचा, दंश घ्यायचा ! बरे, दारातून ओटीवर जावे तर दाराच्या डोक्यावरच त्याची फणा खाली आलेली. सुधा, काका छातीचे. त्यांनी डोळे मिटले, देवाचे नाव घेतले आणि त्या दारातून वाकून सापाच्या फणेखालून विजेसारखे ओटीवर गेले नि तसेच परत कावेरू घेऊन माजघरात आले. दिवा मोठा केला होता. काकांनी नेम धरला. आणि त्यांनी सारी शक्ती एकवटून उतरल्याचे लाकूड जेथे होते तेथे त्या सर्पाला त्रिशूळाने डांबले. खाली हातभर

तो आलेला. फो फो करीत होता. काकांनी त्याला खिळवून धरले होते. परंतु मारणार कोण? शेजारचे बापुराया आले. परंतु ते काकांना म्हणाले, "माझ्या हातात कांवेरू द्या. तुम्ही मारा." काका म्हणाले: नाही. तुमच्या हातात देताना जरा कांवेरू सैल झाले तर तो निसटलाच. मग कडकडून चावे घेतल्याशिवाय तो राहणार नाही. आरडाओरडा झाला. बाळशेटीचा शांताराम आला. त्याने काठी आणली. फणेवर मारली. फो फो करणारी ती फणा. दोनचार काठ्या मारल्या नि फो फो संपले. तो जातिवंत सर्प मेला!

काका जेव्हा जेव्हा ती गोष्ट सांगतात तेव्हा अंगावर काटा उभा राहतो. कोकणात असे प्रसंग येतात. पावसाळ्यात घराजवळ बेडूक वगैरे खायला साप येतात. त्या वेळेस तो बेडकाचा, बेडकीचा केविलवाणा आवाज येत असतो. पावसाळ्यात कोकणात हे असे प्रकार. जाऊ देत या गोष्टी. त्या संपायच्या नाहीत.

अनंताच्या फुलांना आता चांगलाच बहर आला आहे. अनंताला तितकासा वास नसतो. परंतु कसे घवघवीत दिसते फूल! बटमोगऱ्यासही फुले लागू लागली. फणसांच्या झाडावरून बटमोगरीचे वेल गेलेले. सबनिसांच्या सीताकाकू लाखोली वाहणार आहेत. आणि रंगूनानांकडे एक मोगरा आहे. केवढे त्याचे फूल! पांढऱ्या गुलाबासारखे दिसते. वासही मधुर. तेरडे आता चांगलेच फुलू लागले आहेत. लहान मुले तेरडे मोडून त्याच्या काड्या पाठीवर कुस्करतात. त्यांतले पाणी पाटीवर पडते. पाटी स्वच्छ होते. अजून कचेळ्यांची फुले दिसू लागली नाहीत. कुंपणातून ठायी ठायी असलेल्या चवयींना आता चांगलीच पाने फुटली आहेत. खंडाळ्याच्या घाटात किती तरी चवयी दिसतात. चवयी म्हणजे रानकेळी. त्यांनाही केळफूल येते. बारीक केळी लागतात. परंतु हे केळफूल अधिक कडवट असते.

येत्या बुधवारी आता आषाढी एकादशी. पंढरपूरला मोठा सोहळा. लाखो लोकांची यात्रा. अनेक संतांच्या पालख्या तेथे येतात. आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्र्यंबकेश्वराहून निवृत्तिनाथांची– अनेक पालख्या पंढरपूरला जातात. यंदा सज्जनगडावरून समर्थांचीही पालखी जाणार आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी जो पंथ सुरू केला त्याला

वारकरी पंथ म्हणतात. समर्थांच्या संप्रदायाला धारकरी म्हणत. परंतु हे दोन्ही पंथ परस्परांस पूरकच होते. वारकरी पंथाने महाराष्ट्रात एकता निर्मायला अपार मदत केली. पंढरपूरच्या वाळवंटात तरी भेदभाव दूर केला. महाराष्ट्रातून लाखो लोक एकत्र यायचे, पायी यायचे, नामघोष करीत यायचे. आपण सारे एक, एका राष्ट्राचे- ही भावना बळावे. न्यायमूर्ती रानडे तुला माहीत आहेत ना ? पुण्याहून या पालख्या जातात. केवढा सोहळा ! लोक आंबे, केळी यांचा पालख्यांवर वर्षाव करतात. लहान मुले छोट्या पालख्या करून ग्यानबा तुकाराम करीत या मिरवणुकीत सामील होतात. पुण्याच्या सार्वजनिक ग्रंथालयाच्या इमारतीतून न्यायमूर्ती ती श्रद्धा, तो त्याग, भक्तिप्रेम पाहून सद्गदित झाले. त्यांचे डोळे भरून आले. ज्यांनी ही निष्ठा दिली ते किती थोर !

नवीन निष्ठा द्यायची असेल तर ती त्यागानेच देता येईल. पंढरपूरला एकदा एक वेश्याकन्या आली. बादशहाचे तिच्यावर प्रेम. ती म्हणाली, "पांडुरंगाला भेटून येते." आणि देवाच्या चरणावर डोके ठेवले ते ठेवले! असा त्याग पंढरपूरला ओतला गेला आहे. परंपरा उगीच नाही सुरू होत. कुत्र्यासही तूप देऊ पाहणारे नामदेव, कोठारे लुटवणारे दामाजी, विष्णुमय जगत् पाहणारे तुकाराम, ते शान्तिसागर एकनाथ, आणि ती ज्ञानवैराग्याची मूर्ती ज्ञानदेव,- सर्वांची पुण्याई पंढरपूरला ओतलेली. लाखो लोक तेथे जातात. त्यांच्या श्रद्धेला हसू नका. तुम्ही त्यांच्यात मिसळा. नवीन विचार द्या. परंतु ते मानवधर्माचे द्या. मारामारीचे, कत्तलीचे नका देऊ. संतांनी मानवधर्म दिला. म्हणून ग्यानबा तुकाराम हीच महाराष्ट्राची दैवते राहिली. हेच राष्ट्रपुरुष म्हणून महाराष्ट्र ओळखतो. कारण, त्यांचा संदेश सकल मानवांना सुखी करण्यासाठी होता. भेदांना दूर करून सर्वांमधली दिव्यता दाखविणारा त्यांचा संदेश होता. सुधामाई, संतांची शिकवण आज अधिकच आवश्यक आहे.

पंढरपूरचा विठोबा म्हणजे महाराष्ट्रीय जनसंघटनेचा मुका अध्यक्ष. तेथे सर्वांनी यायचे, भेटायचे. आणि तेथील गोष्टी ऐकल्या म्हणजे अश्रू येतात. बडवे, पुजारी पांडुरंगासमोर टाकलेले मोजतात, तेव्हा त्यांना त्यात कधी कधी कागद आढळतात, लिफाफे आढळतात. आशेने लिफाफे फोडावेत तो त्यात "देवा पांडुरंगा, सासू छळते, नणंदा त्रास देतात; त्यांचेही प्रेम नाही. तुला

द्या. कोणाजवळ दुःख सांगावे ? तू मायबाप म्हणून तुला सांगते.'' असे मजकूर आढळतात. तर एखाद्या पत्रात " भाऊबंदांनी नाडले. का रे असे देवा व्हावे ? मी काय पूर्वजन्मी पाप केले,– की मी अन्नाला मोताद व्हावे, नि माझ्या भाऊ-बंदांनी माड्यांतून राहावे. माझी अब्रू तू राख. तुला चाड.'' असे दिसते. दुसऱ्यांजवळ आपली दुःखे उगाळीत बसण्यापेक्षा कोणी तरी विश्वशक्ती आहे तिच्याजवळ दुःख सांगावे, ही वृत्ती का क्षुद्र ?

सुधा, तू पंढरपूरला केव्हा तरी जा. सेवा दलात जाणाऱ्या तेथे सुमती, पुष्पा, उषा वगैरे मुली आहेत. त्यांची तुझी ओळख होईल. भीमा आणि चंद्रभागा दोन्ही नद्या बघशील. जा एकदा.

आता चातुर्मास सुरू होईल. परवा कांदेनवमी. मग चार महिने कांदा नाही खायचा. परंतु गरिबांना तर कांदाच खावा लागतो. नवीन भाज्या झालेल्या नसतात. कांदाच भाकरीबरोबर. मागे आम्ही एकदा तुरुंगात होतो. चातुर्मास आला. जेलमध्ये कांद्याची भाजी. काही सत्याग्रही म्हणाले : " चातुर्मासात कशी खायची ? '' जेलचे सुपरिन्टेंडेंट म्हणाले : " कांदा तर खावा. त्यात फॉस्फरस आहे. '' महात्माजींच्या आश्रमातही म्हणे कांदा खात. एकदा नाशिक जिल्ह्यात चांदवडला युवक परिषद होती. देशभक्त शंकरराव देव अध्यक्ष होते. रात्री जेवायला मंडळी बसली. शंकरराव म्हणाले : " कांदा आणा बोवा आधी. '' आम्ही एकदा खानदेशातील एका खेड्यात गांधीजयंतीस सफाईला गेलो. खूप काम झाले. एका शेतकऱ्याने सर्वांना भाकरी दिली. तेथे कांदे होते. फोडायचा बुक्की मारून नि घ्यायचा. काही मुले कर्मठ आईबापांची. ती कांदा घेत ना. शेतकरी दुसरे कालवण आयत्या वेळेस काय देणार ? मी त्या मुलांना म्हटले : " कांदा खा. कांदाभाकर हे आपले राष्ट्रीय अन्न. खा. पाप नाही.'' त्यांनी मग खाल्ला.


चातुर्मासात पूर्वी स्त्री-पुरुष नाना नेम धरीत. जीवनात त्यामुळे संयम येतो, निश्चयीपणा येतो. माणसाच्या जीवनात व्रत नसेल तर काय अर्थ ? तुकारामांनी व्रतहीन माणसास गाढव म्हटले आहे ! नेम अमूकच असावा असे नाही. काळाप्रमाणे व्रत बदलते. तू विद्यार्थिनी आहेस. रोज एक श्लोक पाठ करायचा ठरविलेस तर चातुर्मासात १२० श्लोक पाठ होतील. मी लहानपणी

रोज गंगालहरी वाचीत असे. पाठ होऊन गेली. विष्णुसहस्रनाम म्हणत असे. पाठ झाले. असा काही नेम कर. रोज दहा ओळींचा अनुवाद करायचा, रोज काही तरी करायचे असे ठरव.

तू तुझ्या पत्रात अरुणाची गंमत लिहिलीस. वाचून हसू आले. लहान मुलांना जे जे नवीन ते हवे हवे वाटते. अरुणाने तारीख हा शब्द ऐकला तर सारखी तारीख म्हणत राहिली. तू लिहिलेस. दोन वर्षांचीही ती नाही तो " अभ्यास कर " तुला म्हणाली. मुले जे ऐकतात ते बोलतात. पुण्याला माझे मित्र नारायणराव गोरे आहेत ना ? त्यांची शुभा आता मोठी झाली आहे. परंतु लहान होती तेव्हा एकदा म्हणाली : " नाना, वातावरण चांगले नाही. " त्यांनी विचारले : " शुभा, वातावरण म्हणजे काय ? " तर ती म्हणाली : " मला काय माहीत ? तुम्हीच वातावरण, वातावरण म्हणता ! " अशी मुलांची गंमत असते. नवीन शब्द, नवीन फूल, नवीन प्राणी. नवीनांची ती उपासक. परंतु मनुष्य वाढत जातो तसतसा तो नवयुगधर्माचा कमी उपासक होतो. त्याला नवीन आवडेनासे होते. ज्याला नवीन नवीन घ्यावे, मिळवावे असे वाटत नाही तो मृतवतच नाही का ? असो. सर्वांस स. प्र. अरुणास स. आ.

तुझा

साधना, ९ जुलै १९४९ अण्णा



चि. प्रिय सुधास
सप्रेम आशीर्वाद

आशा करतो की माझे दोन आटवड्यांपूर्वीचे पत्र आता तरी मिळाले असेल. तुझे सुंदर अक्षरातील पत्र वाचून आनंद झाला. अक्षर सुंदर असावे. सारेच सुंदर असावे. काही काही लोकांचे अक्षर वाचता येत नाही. सही तर अशी ठोकून देतात की, ब्रह्मदेव आला तरी त्याचा उलगडा व्हायचा नाही ! समजू नये म्हणूनच जणू ती असते. सुधा, छापखान्यात खिळे जुळणारे असतात ना, त्यांना अक्षर लावता लावता किती कष्ट पडतात. अशांच्या लेखांच्या पुन्हा प्रती लिहून काढाव्या लागतात. मनुष्य दुसऱ्याचा विचार करील तर स्वच्छ लिहील. आणि दुसऱ्याचा विचार करायला जो शिकला त्याच्या जीवनात धर्म येऊ लागला. धर्म म्हणजे समुद्रात आंघोळ करणे नव्हे, वडावर जाणे नव्हे. धर्म म्हणजे दुसऱ्यांच्या भावना ओळखायला शिकणे, इतरांचे सुखदुःख पाहणे. त्यांच्याशी एकरूप होणे. तुम्ही सुटीत पत्ते खेळत असा. सारी कामे आटोपल्या-वर थोडा विरंगुळा म्हणून पत्ते खेळायला हरकत नाही. एका अमेरिकन लेखकाने लिहिले आहे, "पत्ते खेळणे धर्ममय आहे. कारण आपण आपल्या भिडूचा विचार करतो. उगीच हातात पाने नसता वाटेल तसे बोलू तर आपला

भिडू रागावेल. आपण एकटे नाही. दोघे आहोत. एकमेकांचा विचार केला पाहिजे.'' पत्र लिहिताना, काही करताना असाच दुसऱ्याचा विचार करावा.

तुमच्या शाळेचे गटवार खेळ सुरू झाले. छान. आणि वाचनाचाही कार्यक्रम झाला म्हणून लिहिलेस. तुझ्या गटाला पहिला नंबर मिळाला. तू आनंदली असशील. तू वाचताना मधून जरा घुटमळतेस. खरे ना ? सवयीचा परिणाम असतो. वाचनसुद्धा एक कला आहे. लेखकाच्या भावनांशी एकरूप होऊन वाचले पाहिजे. त्या त्या विचाराप्रमाणे आवाज गंभीर, खेळकर, करुण असा व्हायला हवा. वाचनात तुमचा गट पहिला आला. आता इतर बाबतींत बघू. खेळातही पुढे या. परंतु ही सारी गंमत आहे. त्या त्या वेळेस सारे जीव ओतून करावे. परंतु कोणासही पहिला नंबर मिळाला तरी खट्टू होऊ नये. हे तर शिकायचे आहे. खेळात हीच गंमत. खेळ ही पवित्र वस्तू आहे. आपल्याकडे खेळ म्हणताच गोपाळकृष्ण आणि त्याचे सवंगडी आठवतात. कृष्ण परमात्म्याला यमुनेच्या तीरावर सोबत्यांबरोबर खेळताना किती धन्यता वाटे ! गोपाळकृष्णाने खेळांना दिव्यता दिली आहे.

आषाढ महिना थोड्या दिवसांनी संपेल, पुढे श्रावण आला की सुट्याच सुट्या ! पाऊस भरपूर आहे. आणि सर्वत्र आहे. मध्यंतरी लोकांच्या तोंडचे पाणी पळाले होते. परंतु आता आनंद आहे. शेतीची कामे जोरात सुरू आहेत. यंदा 'अधिक धान्य पिकवा' मोहीम. सुधा, आज सर्वच बाबतींत भारत दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहणारा झाला आहे. आपण अन्न आणि वस्त्र या बाबतींत स्वावलंबी झालेच पाहिजे. जेथे जेथे शक्य तेथे तेथे काही तरी लावू या. भाजी लावा, रताळी लावा, कणगरे लावा, मक्याची कणसे लावा. आपण खाण्याच्या सवयीही बदलू या. रताळी, आठिळया, आंब्याच्या कोयी, कणगरे, करिंदे, नाना प्रकारचे पाले; सारे उपयोगात आणू या, अन्न म्हणून समजू या. तुमच्याचजवळ कोसबाड आहे. तेथे 'आदर्श शेती विद्यालय' आहे. उन्हाळ्यात तेथे भरपूर रताळी म्हणे लावली होती. आणि शेकडो वारली बंधू तेथून विकत नेत. पुन्हा स्वस्त ठेवली होती. असे कळते की, पावसानंतर तेथे टमाटो वगैरे शहरी पिके न घेता भरपूर रताळीं करणार आहेत. हजारो गोरगरिबांना उपयोग होईल. इतके आंबे, फणस, काजू यांवर राहतातच लोक. आपल्या

गावात पुष्कळ वर्षांपूर्वी आजोबांनी प्रथम रताळयाची लागवड केली होती. मला आठवते ती गोष्ट. मी लहान होतो. मातीचे उंच बांध करून त्यावर त्यांनी वेल लावले. केवढाली रताळी खाली लागली होती ! आणि आई रताळयाच्या पाल्याची डाळ-कण्या घालून भाजीही करायची. भोपळीच्या पाल्याची, फुलांचीही भाजी होते. भोपळी म्हणजे दुधभोपळी नव्हे. लाल भोपळा. त्याचे ते धोत्र्याच्या फुलासारखे परंतु भगवे फूल किती सुंदर दिसते. लढाईच्या काळात रशियात साखर भरपूर मिळेना; साखर तर आहारात हवी. हाडे बळकट व्हायला साखर उपयोगी पडते. रशियात हे तांबडे भोपळे सर्वत्र लावण्यात आले. या भोपळयात साखर असते. काही काही इतके गोड असतात की भाजीत गूळ घालावा लागत नाही. पोपयासारखी फोड लागते. भोपळयाची भाजी खावी. ती आपण उपासालाही योग्य ठरवली आहे.

काल जानकीकाकू इतक्या म्हातारपणीही शेतावर गेली होती. बंगालमध्ये पूर्वी तरी ब्राह्मणाने काम करणे कमी मानीत. तो घरदार विकील, शिकेल, कारकून होईल. परंतु नांगर हाती धरणे निषिद्ध मानील. प्रफुल्लचंद्र राय तुला माहीत आहेत ? प्रसिद्ध शास्त्रज्ञ. हिंदी विज्ञानाचा त्यांनी पाया घातला. तू दंतमंजन किंवा दंतमल्म वापरतेस ते बंगाल केमिकलचे, म्हणजे प्रफुल्लचंद्रांनी सुरू केलेल्या कारखान्यातले. बंगाली तरुणांना स्फूर्ती यावी म्हणून प्रफुल्लबाबूंनी एकदा नांगर हाती धरला. परंतु आपल्याकडे कोकणात ब्राह्मण असला तरी तो श्रमजीवीच असतो. माझी आई शेतावर जाई. आजीही जाई. ज्या वेळेस लावणी करायची असते, भात रोवायचे असते, तेव्हा सर्वांनी कामाला जावे लागते. शेतात चिखल आहे, पाणी आहे तोच सारे झाले पाहिजे. डोक्यावर इरले घेऊन जानकीबयनी भात रोवीत होती. मथी बायतीण, सीता कदमीण त्याही बरोबर. भेदाभेद नष्ट झाले होते. सारी श्रमजीवी. पावसात काम करून सायंकाळी घरी येऊन कोरडे नेसून चुलीजवळ जरा शेकत बसणे, यात केवढी कृतार्थता असते !

मध्ये पाऊस पडत नव्हता तर ब्राह्मण देवावर अभिषेक करीत होते. त्यांनी शंकराला कोंडले. इतर जातीजमातींनी भजन मांडले. कोणी उपवास केले. कोणी देवळात येऊन देवाला प्रार्थीत. संकटाच्या वेळेस सर्वांची एकभावना

होते. मोठी गोष्ट डोळ्यांसमोर असली म्हणजे क्षुद्रता दूर राहते. आपण सारे मानव, आपले एक हृदय हे अशा वेळेस अनुभवते.

पाऊस आला. मुसळधार पाऊस. खळखळ ओढे वाहत आहेत. चांगला पूर येऊन गेला. नदीचे पाणी लाल दिसत होते. नदीचा पूर बघायला पावसातून आम्ही गेलो होतो. क्षणभर सृष्टीशी एकरूप झालो. आम्ही घरी परत येत होतो, तो कानठळ्या बसवणारा कडकडाट झाला. आणि डोळे दिपवणारी वीज लखलखली. आम्ही थबकलो. कोठे तरी वीज पडली असेल असे वाटले. आणि दुसऱ्या दिवशी कळले की, एक गुराखी वीज पडून मेला ! इतर मुले पटकन पळाली. त्यांना का विजेचा लोळ येताना दिसला ? त्या गुराख्याच्या घरी सारी दुःखात असतील. काय करायचे ? तुझे आजोबा एकदा असे पावसात सापडले होते. ते गावाला जात होते. एका झाडाखाली उभे राहिले. परंतु त्यांना वाटले वीजबीज पडायची. म्हणून निघाले. दूर गेले नि त्याच झाडावर वीज पडली. योगायोग की काही प्रेरणा असते ? प्रभू जाणे.

फुलांना आता बहर येत आहे. बटमोगऱ्याला भरपूर फुले. परड्या भरभरून काढली तरी संपत नाहीत. अनंतालाही बहर आहे. गावातील काही बायकांनी दूर्वांचा लक्ष वाहायचा संकल्प केला आहे. किती तरी बायका शेताच्या बांधावर जातील, हिरव्यागार झुपकेदार दूर्वा वेचतील. एकमेकींचा लक्ष पुरा करतील. अशा निमित्ताने आपण सृष्टीत जातो. वृक्ष—वनस्पतींची ओळख होते. दूर्वा, तुळस, वेल यांना आपण का महत्त्व दिले माहीत आहे ? एकदा आयुर्वेदाच्या तोंडी परीक्षेच्या वेळेस देवाला दूर्वा, तुळशी का वाहतात, असा प्रश्न परीक्षकांनी विचारला. मुले चिडली. असले काय प्रश्न विचारता, म्हणाली. परीक्षक म्हणाले, " चिडू नका. पूजेसाठी रोज दूर्वा, तुळस, वेल, हवा म्हणून घराभोवती यांची लागवड हवी. आयुर्वेदात यांच्या रसाचे महत्त्व आहे. वाटेल तेव्हा रात्रंदिवस तुळस मिळायला हवी. " असा हा महिमा आहे. तुझे आजोबा रोज २१ दूर्वांची जुडी गणपतीला वाहायचे. त्यांना वाळलेल्या दूर्वा आवडत नसत. लांब जातील परंतु छानदार दूर्वा आणतील. मला त्यांची दूर्वा पाहताच आठवण येते.

काल रात्री मी अंगणात एकटाच फिरत होतो. किती वाजले होते कळेना. थोड्या वेळाने कोंबडा आरवला. म्हणजे प्रहरभर रात्र असावी. पाऊस


थांबला होता. केळांच्याच्या डोक्यावर चंद्र होता. ढगाबरोबर तो लढत होता. क्षणात ढगांच्या लाटांत तो बुडे, गुदमरे. त्याच्या धडपडीचा प्रकाश ढगांतूनही थोडा थोडा दिसे. परंतु क्षणात अजीबात दिसेनासा होई. तो पुन्हा तोंड वर करी आणि हसे! मी बघत होतो. सुधामाई, आपले मन असेच आहे. अंधाराशी, निराशेशी ते झगडत असते. क्षणात निरुत्साही विचार त्याला बुडवतात तर पुन्हा उत्साहाचे त्याला भरते येते. मोठी गंमत आहे. जीवन म्हणजे ओढाताण, परंतु आपण विजयी होऊ या श्रद्धेनेच धडपडत राहिले पाहिजे. आत्मविश्वास हवा. ज्याचा स्वतःवर विश्वास नाही, त्याच्या जीवनाला काय अर्थ ?

तू स्वतःवर विश्वास ठेव. गणित येईल. शास्त्र येईल. सारे मला येईल असे म्हण. मुलींना गणित, विज्ञान म्हणजे बाऊ वाटतो. तुम्हांला असे नाही वाटता कामा. आपल्या प्रिय बाबूकाकांची मंदी यंदा बी. ए. ला गणितात ७० टक्के मार्क मिळवून पास झाली. मुलींना सारे येईल. मादाम क्यूरीने शोध नाही लावले? सुधा, तुला डॉक्टर व्हायचे ना? मग सायन्सकडे लक्ष दे. उत्साहाने अभ्यास कर. एक क्षण वाया दवडणे म्हणजे गुन्हा वाटू दे. मुंबईला यंदा पहिला आलेला तो वसंता! लहानशा खोलीत त्याच्या घरी दहाबारा माणसे. तेथे तो अभ्यास करी. त्या मानाने इतरांना किती सुखसोयी असतात. इच्छा हवी, उत्कटता हवी, महत्त्वाकांक्षा हवी. मी काही तरी करून दाखवीन, पुढे येईन, अशी महत्त्वाकांक्षा धर. ज्या जीवनात महत्त्वाकांक्षा नाही ते काय कामाचे? प्रयत्न करीत राहावे. खरे ना?

सारी आनंदी असा. विहिरी भरल्या असल्या तर पोहायला जा. उड्या मार. सर्वांस स. प्र. अरुणाला बे बे! (म्हणजे बेदाणा, तिला तो आवडतो, होय ना?)

तुझा
अण्णा

साधना, २३ जुलै १९४९



चि. प्रिय सुधास
सप्रेम आशीर्वाद

मध्यंतरी गहाळ झालेले पत्र तुला मिळाले हे वाचून आनंद झाला. तुला पडसे झाले होते. का बरे ? पोहायला गेली होतीस म्हणून की काय ? पोहून आल्यावर कधी निजू नये. त्या दिवशी रविवार असेल. झोपली असशील दुपारी. म्हणून पडसे आले असेल. होय ना ? परंतु पडशाखोकल्याची आपण पर्वा थोडीच करतो. तूही करीत नसशील. विहिरी तुडुंब भरल्या आहेत तोवर पोहायला जा. मौज लुटा. सुधा, विहिरीत कासव आहे का ग ? मी लहान होतो तेव्हा आपल्या विहिरीत एक मोठे कासव होते. कासव दिसायला गरीब. देवळातून कासवाची दगडी मूर्ती असते. कासव सारे अवयव आत ओढून घेते, त्याप्रमाणे माणसाने संयम राखावा म्हणून देवासमोर कासवाची मूर्ती असते. परंतु हे कासव मोठे लबाड असते. अग सुधा, ते बेडकाला खाते मोठ्या युक्तीने. बेडूक पाण्यात असला की त्याच्या खालून कासव येते आणि त्या बेडकाचे तंगडे धरते. आणि पाय धरून त्याला फाडते आणि खाते. मी लहानपणी ते दृश्य पाहिले तेव्हा मला शिसारी आली. जगात असे प्रकार असतात. दिसायला गोगलगाय परंतु जगाला छळायलाही तयार.

पाऊस तर छान पडत आहे. आणि आता काही ठिकाणी पूर येत आहेत. सृष्टीत हे असे चालायचेच. या गोष्टी आपण स्वीकारायला हव्यात. शेतीची कामे जोरात चालू आहेत. बाळतात्यांकडचे लावणीचे काम संपले. काल रात्री त्यांच्याकडे मालवणी होती. सारे शेतमजूर आले होते. गडी गोविंदा होता. त्यांना आंघोळीला कढत पाणी देण्यात आले. डोकीला लावायला तेल देण्यात आले. घुगऱ्या करण्यात आल्या होत्या. बाळतात्या आग्रह करीत होते. मौज असते, कृतज्ञता असते. सुधा, चिखलात जेव्हा भात रोवतात, तेव्हा गाणी म्हणतात. जणू स्फूर्ती येते. "भलेभले दादा कोंबड्यावर वायदा" असे म्हणतात. लहानपणी मीसुद्धा जात असे. आईच्या हातात रोपाची मूठ लावायला देत असे. मूठ मूठ आवण घ्यायचे नि रोवायचे. नाचणीसुद्धा आता आवटायला झाली आहे. पिराच्या माळावर दोन दिवसांपूर्वी हरि कांबळे वगैरे नाचणी आवटीत होते. नाचणीची एकेक काडी टाकीत जायचे. आणि ती काडी मूळ धरते नि उभी राहते. किती सजीवता असते त्या लहानशा काडीत! सुधा, सर्वत्र अशी कामे चालली आहेत.

पडवळांच्या मांडवावर लहान लहान वाती पडल्या आहेत. भेंड्यावर फुले आली आहेत. अळू असे माजले आहे की काय सांगू? कुशाताईने परवा अळवाच्या पानाचे उंडे लावले होते, आणि दुसऱ्या दिवशी मलाही अळवड्या मिळाल्या. सुधामाई, खानदेशच्या बाजूला अळवाच्या पानांना पोथीची पाने म्हणतात. आणि हिंदीत आलू म्हणजे बटाटे.

श्रावण महिना आता सुरू झाला. श्रवण करण्याचा महिना म्हणून का श्रावण महिना? पावसाळ्यातील कामे बरीच झालेली असतात. लावणी संपलेली असते. आता पुराण ऐकायचे. श्रावण महिन्यात सप्ताह बसवतात. नामसप्ताह असतो. भागवताचा सप्ताह देवळात सुरू होतो. लहानपणी आजी, काकू देवळात सप्ताहाला जायच्या. सात दिवस उपवास म्हणजे फराळ करतात. भागवताच्या सप्ताहात सकाळी बारा वाजेपर्यंत संस्कृत भागवत वाचतात. दुपारी मराठीतील अर्थ वाचतात. श्रावण महिन्याचा श्रवण नक्षत्राशी काही संबंध आहे की काय? सुधा, परवा एक मित्र गंमत सांगत होते. ते आपल्या

लहान मुलाला श्रावणाची गोष्ट सांगत होते. आईबापांना तो श्रावण कावडीतून यात्रांना नेतो. तिकडे दशरथ राजा शिकारीला आलेला असतो. श्रावण, तहानलेल्या आईबापांना पाणी हवे होते म्हणून सरोवरावर घडा घेऊन जातो. बुडबुड आवाज होतो. दशरथाला वाटले, हरण आले. तो बाण सोडतो. श्रावण घायाळ होतो. आईबाप दशरथाला शाप देतात. अशी ती गोष्ट. तू वाचली असशीलच. मुलाला गोष्ट सांगून वडील म्हणाले : "श्रावण आईबापांची सेवा करी, तशी तू आमची करायला हवी." मुलगा एकदम म्हणाला : "पण तुम्ही का आंधळी आहांत ?" साऱ्यांना हसू आले. लहान मुले कधी कधी सहज बोलतात. परंतु केवढी गमत असते! अग, एकदा रमावैनींना त्यांची मुलगी म्हणाली, "आई, दुसऱ्यांच्या लग्नांना आपण जातो. तुझे लग्न कधी होईल ? सांग ना आई." आईची हसून मुरकुंडी वळली. लहान मुलांची उत्तरे, प्रश्न गोळा करू तर सुंदर पुस्तक होईल. तू अरुणाचे शब्द असेच लक्षात ठेव, गोळा करून ठेव.

आता नागपंचमी येईल. तू ड्रॉइंगची परीक्षा पास झाली आहेस. पाटावर लाल चंदनी गंधाचा नागोबा काढ. आघाडा वगैरे वहा. लाह्या वहा. आघाडा माहीत आहे ना ? पावसात उगवतो. पुण्याला नागनरसोबाची चित्रे मिळतात. तीच भिंतीवर लावतात. नागपंचमीची कहाणी वाचली आहेस का ? श्रावण महिना. श्रावणी सोमवारची कहाणी. तू कहाण्यांचे सारे भाग वाच. सोपी सोपी भाषा. लहान लहान वाक्ये. लहानपणी मी कहाण्या पाठ केल्या होत्या. १९३० मध्ये त्रिचनापल्लीच्या तुरुंगात असताना मी कहाण्या सांगत असे. नागोबाची कहाणी मला फार आवडते. 'आटपाट नगर होते' या शब्दांनी कहाणीस आरंभ होतो आणि 'ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण' असा शेवट असतो. कहाणी सांगायच्या आधी गणपतीची कहाणी असते. विघ्ननाशक सर्वत्र हवा.

गारुडी येतील. पेटारे उघडतील. गारुडी पुंगी वाजवील. आणि फणा करून नाग डोलू लागेल. त्याचे दात पाडलेले असतात. विषाचे वाकडे दात. अग, रावजी केळकरांकडे उन्हाळ्यात पुंगीवाला आला. पुंगी वाजवू लागला. आणि कोठल्या तरी बिळातून जातिवंत सर्प बाहेर आला. डोलू लागला. गारुडी

पुंगी वाजवीत होता. आणि एकदम सापाची मानगुटी त्याने पकडली. आणि त्याचा जबडा उघडला. चिमटयाने त्याच्या घशातील फेस तो बाहेर काढी. तो फेस बाहेर पडताच घट्ट होई. डामराच्या गोळीएवढी फेसाची टणक गोळी झाली. किती तेजस्वी ! हातावर ठेवली तर सूर्यकान्त मण्याचा उजेड पडतो, तसे दिसे. सापाचा मणी म्हणतात तो हाच की काय ? परंतु तो तर त्याच्या डोक्यावर असतो असे वर्णन आहे.

तू मुंबईला गेलीस तर हाफ्किन इन्स्टिटयूटमध्ये जा. तेथे शेकडो प्रकारचे साप आहेत. तेथे साप पकडून त्याला काचेच्या पेल्यात दंश करायला लावतात. विषाचे तेजस्वी बिंदू एकदोन गळतात. त्याची इन्जेक्शने तयार करतात. सर्पदंशावर हाच खरा उपाय. मंत्रतंत्र आहे, परंतु खरे नाही वाटत. आपल्या गावी सोमेश्वराच्या देवळात साप चावलेल्या माणसास नेतात; विष उतरते म्हणतात. ते सापच फार विषारी नसतील. या सोमेश्वराची कथा तुला माहीत आहे का ? पूर्वी साप-विंचू चावला तर सोमेश्वराला हाक मारीत. ‘ देवा, सोमेश्वरा, धाव ’ म्हणत. आणि पळीपंचपात्री घेऊन सोमेश्वर यायचा, विषबाधा दूर करायचा. परंतु कोणी तरी खोटीच हाक मारली. सापविंचू न डसता हाक मारली. भोळा सांब आला. परंतु फसला. त्या दिवसापासून तो येईनासा झाला. श्रावण सोमवारी सोमेश्वराच्या देवळात माझ्या लहानपणी कीर्तन व्हायचे. गावाबाहेर झाडीत देऊळ. नदी ओलांडून जायचे. एकदा आजी व मी जात होतो. आजी नदीत पडली. सोमेश्वराच्या देवळाजवळ फार जुने आंब्याचे झाड होते. त्याच्यात मोठी ढोली होती. त्या ढोलीत एक साप होता. तो साप कीर्तन ऐकायचा असे जुने लोक सांगत. आम्ही दुरून त्या ढोलीकडे बघत असू.

सुधा, श्रावणातल्या शनवाराला ‘ संपत् शनवार ’ म्हणतात. आम्ही लहानपणी पहाटे उठून मारुतीच्या पूजेला जात असू. आई रुईच्या फुलांची आणि भाजणीच्या वड्यांची माळ मारुतीला घालायला द्यायची. एक आठवण सांगू ? उजडता संपत् शनवार होता. चुल्यात विस्तव घालायला आई उठली होती. विहिरीजवळ खोपटी होती. तेथे पाणी तापवायचा चुला होता. आणि ते मोठे

मशेरे तपेले त्यावर तापत असायचे. आईबरोबर मीही गेलो. किती रात्र होती कोणास माहीत ! बाहेर काळाकुट्ट अंधार. आई विस्तव पेटवीत होती, एवढ्यात किंकाळी ऐकू आली ! मी आईला घट्ट मिठी मारली. परंतु आई धीट, ती म्हणाली : " मनी असेल. " पुष्कळ वर्षांपूर्वी मनताई म्हणून आपल्या घराण्यात होऊन गेली. श्रावणात मंगळागौर होती. दुसऱ्या दिवशी पूजा कवळसायला म्हणजे मंगळागौरीचे ते सारे निर्माल्य विहिरीत टाकायला ती गेली नि भरलेल्या विहिरीत पडली. तेथील केळांब्यावर ती भूत झाली म्हणतात ! कोणी माहेर-वाशीण आली, मूल आजारी पडले तर दहीपोहे रात्री केळांब्याखाली नेऊन ठेवायचे. ताप म्हणे जायचा. परंतु आपले विष्णुबाबा होते ना ? ते म्हणायचे, " मी पोहे नेऊन ठेवतो. पोह्यांवर दही बरेच ओता." आणि ते केळांब्याखाली दगडावर बसून पोहे खायचे. त्यांना मनी कधी बाधली नाही. आपले विष्णु-बाबा धीट. एका सोट्याने वाघ मारायचे. लाथ मारून खिडकीचा जाड गज वाकवायचे. गोठ्यात दूध काढायला गेले तर लोटाभर प्यायचे. मोठे धिप्पाड होते. आपल्या गावात पूर्वी धिप्पाड माणसे होती. तुला यादव भटजी माहीत आहेत ? ते वारले. त्यांचे वडील होते. ते कच्चे तांदूळ धुवून आणून खायचे. ते शिजवण्याच्या भानगडीत पडत नसत. रानात जायचे, चार माणसे डोक्यावर द्यायला लागतील अशी गवताची भली मोठी बरंड आणायचे. एकदा सोनार-आळीजवळ थकले म्हणून बरंड टाकून पाणी प्यायला गेले. " भटजी, नुसते नका पाणी पिऊ, गुळाचा खडा घ्या. " कोणी म्हटले. " भटजींना इतका कसा पुरेल ? " दुसरा म्हणाला. थट्टा होता होता " भटजींनी दहा शेर गूळ खावा, त्यांना दहा रुपये देऊ. " अशी पैज लागली. आणि भटजी एकेक गुळाचा मोठा खडा खात वर पाणी पीत. त्यांनी दहा शेर गूळ संपवला. दहा रुपये कनवटीला लावून निघाले.

'आता ही बरंड डोक्यावर द्या' ते म्हणाले. दोनचार जणांनी त्यांच्या डोक्यावर ती बरंड चढवली. ते घरी गेले. बरंड टाकून घरात जाऊन जरा पडले. परंतु त्यांच्या पोटात आग भडकली. ते बेचैन झाले. शेवटी नदीच्या पाण्यात जाऊन बसले. परंतु आतील आग शमेना. अखेर उठले. पहार हातात घेऊन पिराच्या माळावरील दगड काढू लागले. दिसेनासे होईपर्यंत काम करीत होते. घामाघूम झाले. आग थांबली. सारा गूळ पचला. मग घरी जाऊन

कढत पाण्याने स्नान करून झोपले. अशी ही माणसे! मला किती आठवणी येतात!

प्राजक्ताला आता बहर आहे. सायंकाळी प्राजक्ताच्या कळ्यांचा काय वास सुटतो. प्राजक्ताच्या झाडाचे दोर निघतात. त्यांना टोकही बारीक असते. त्यांत फुले ओवून गजरे करतात. प्राजक्ताच्या फुलांची डेखे कशी पोवळ्यासारखी दिसतात! ती अर्धवट तोडून हार करतात. नखे पिवळी होतात. एका कानडी कवितेत एक मुलगा आईला विचारतो : "आकाशात कोठली ही फुले? देवाच्या घरचा प्राजक्त का कोणी हालवला?" आकाशातील तारे म्हणजे जणू फुले, असे त्याला वाटते. तेरडेही खूप फुलले आहेत. आणि कचेळेही. कचेळ्याचे फूल म्हणजे बारीक फुलांचा एक मोठा गुच्छच जणू असतो.

जुलै महिना संपून आता ऑगस्ट येईल. आपल्या इतिहासात ऑगस्ट महिना अमर झाला आहे. लोकमान्य टिळक १ ऑगस्टला गेले. ९ ऑगस्टला चलेजाव लढा १९४२ मध्ये सुरू झाला. १५ ऑगस्ट ही आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीची तारीख! पुढील पत्रात मी यासंबंधी लिहीन.

काल विहिरीवर जाताना पायात काटा गेला. खोल गेला आहे. रात्री तेलघडी बांधली. सकाळी काढीत होतो. निघेना. आता धोंडू किंवा गोविंदा न्हावी यांच्याकडे जाईन. धोंडू आपल्या नराणीने पाय पोखरून पटकन काढील. असो. पत्र पाठव. अरुणाचा आता वाढदिवस येईल. मी तिला आशीर्वाद देण्यापलीकडे काय पाठवू?

उदंड आयुरारोग्य
अरुणास सदा मिळो ॥

हसो खेळो कुदो नाचो
खुशाल झबले मळो ॥

पृथ्वीचा आणि सूर्याचा
सुखद स्पर्श होउ दे ॥

वारा पाऊस लागून
अरुणा नीट वाढु दे ॥

ज्ञानाची लागु दे गोडी
प्रेम सर्वांवरी करी ॥

प्रार्थना प्रभुला माझी
दयासिंधु पुरी करो ॥

अच्छा. आशा, पपी यांना माझी आठवण म्हणून दोन दोन थपडा दे.

तुझा
अण्णा

साधना, ३० जुलै १९४९



चि. प्रिय सुधास
सप्रेम आशीर्वाद

श्रावण महिना लौकरच संपेल. श्रावण महिना म्हणजे पवित्र महिना, सप्ताह पाळण्याचा महिना. सापावरसुद्धा प्रेम करावे असे सांगणारा महिना. उचंबळणाऱ्या सागराची पूजा करण्याचा महिना. नवीन जानवे घालून पाऊस जरा कमी झाल्यामुळे अध्ययनास पुन्हा प्रारंभ करण्याचा महिना. आणि रक्षाबंधनाचा पवित्र असा हाच महिना. भारतीय जनतेच्या हृदयावर सत्ता चालवणारा, गीतोपदेशाचे अमृत देणारा भगवान गोपाळकृष्ण-जयंतीचा हाच महिना. आणि याच महिन्यात रवीन्द्रांची, लोकमान्यांची पुण्यतिथी आली. अरविंदांचा वाढदिवस आला. स्वातंत्र्यदिन आला. आणि नेताजींचे विमान कोसळले तीही १५ ऑगस्टच तारीख. श्रावण आणि ऑगस्ट दोन्ही महिने आपल्याला पवित्र. ऑगस्ट या शब्दाचा अर्थही ' महान, भव्य ' असा आहे.

आपल्या गावात श्रावणी झाली. मी काही गेलो नाही. जानवे, यज्ञोपवीत ही त्रैवर्णिकांची खूण होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य तिघांना ज्ञानाचा अधिकार. बाकीच्यांना ? पंडित मदन मोहन मालवीय यांनी नाशिकच्या गोदातीरावर हजारो हरिजनांना यज्ञोपवीत देण्याचा समारंभ केला होता. परंतु विशिष्ट श्रेष्ठ

वर्णाचे द्योतक म्हणून मी ते घालीतनासा झालो. जे श्रावणीचा समारंभ करून घालतात त्यांना घालू दे. परंतु सर्वांनाच एकत्र आणून समारंभ करू देत. आता ज्ञानाची दारे सर्वांना खुली आहेत. आता वतनदारी टिकणार नाही. म्हणून या खुणांचे महत्त्वही तादृश्य नाही. सुधामाई, काळ इतका झपाट्याने पुढे जात आहे, तरी आपला गाव मागासलेलाच! परवा एके ठिकाणी सत्यनारायण करायचा होता. तर एक भटजी म्हणाले : "मी तेथे पूजा पुराणोक्त सांगेन, वेदोक्त सांगणार नाही." या वेदोक्ताच्या प्रकरणानेच महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद वाढवला. आर्थिक वा इतर कारणांनी तो वाढलाच असता, परंतु वेदांचा अमक्यालाच अधिकार, असल्या अनुदार वृत्तीनेही तो वाढला. युरोपात वेदांवर भाष्ये झाली, वेदांवर कोश झाले. ते कोण होते? अग पाचसहा वर्षांपूर्वी बनारस हिंदू विद्यापीठात स्त्रियांना वेदांचा अधिकार आहे का नाही, यावर वाद झाला! आणि त्या वेदात प्रत्यक्ष स्त्रियांनी लिहिलेले मंत्र आहेत! आजचे युग निराळे. सर्वांना शिकू दे. सर्वांचा विकास होऊ दे.

काकांकडे मंगळागौर झाली. मधूचे यंदा लग्न झाले. नवी नवरी. मधूच्या पत्नीचे नाव पुष्पा आहे. मला लहानपणची आठवण झाली. अक्काची मंगळागौर होती. गावात अनेक ठिकाणी मंगळागौरी होत्या. आम्ही मोठ्या पहाटे उठून फुले गोळा करायला गेलो. पाटी पाटी भरून फुले आणली. पारिजातकांना बहर असतो. कोमल सुंदर फुले. पाऊस नसला म्हणजे किती सुरेख दिसते! जरा झाड हालवले म्हणजे फुलांचा खाली सडा पडतो. लहानपणी मी पारिजातकांचे हार करून देवांना घालायचा. मंगळागौरीच्या पूजेला फुले कोणाकडे जास्त याची चढाओढ लागायची. पायरे शेतावर जाऊन जास्वंदीची, कर्णाची किती तरी फुले आम्ही आणली. कचेळ्याची फुले जमवली. गौरीचे हात गोळा केले. त्या फुलाला गौरीचा हात म्हणतात. पाच बोटांप्रमाणे पाच जाडसर पाकळ्या असतात. भाद्रपदातील गौरींना ही फुले लागतात. श्रावणात तुरळक दिसतात. अनन्त बटमोगरा, तगर, कण्हेरी, सारी फुले जमविली. मी तेरड्याची फुले आणून त्यांचे तुरे करून अक्काला दिले होते. आणि मग भगीरथकाकूकडची ती नागद्रोणीची फुले! तू मुंबईस या दिवसांत फुलांचे गुच्छ बघशील तर ती पांढरी व ज्यांना लांब चारपाच हिरवट तंतू

पाकळ्यांनाच जोडलेले असतात व एक तंतू मधोमध असतो ती फुले पाहिली असशील. मधले ते पांढरे फूल द्रोणासारखे असते. आणि भोवतालचे ते पाच पुंकेसर जणू विळविळीत नाग. मधला स्त्री-केसर असतो तो तर अगदी फूल. मधोमध फाडले तर खाली खोल देठापर्यंत गेलेला दिसेल, आणि तो पोकळ असतो. मुंबईस त्याला कोणी लिलीही म्हणतात. परंतु आम्ही त्याला नाग द्रोणीची फुले म्हणत असू. सुधामाई, मंगळागौरीला, हरताळकांना, गणपतीला पत्री लागते. मंगळागौरीच्या आदल्या दिवशी ती पत्री गोळा करायची. माझ्या लहानपणी रंगूनानांकडे मोठी बाग होती. त्यांना फुलांचा नाद. सर्व प्रकारची पत्री त्यांच्या बागेत मिळायची. अशोकच्या फुलांचे झाड मारुती-जवळच्या देवधरांकडे होते. दत्तू देवधर माझा मित्र. त्याच्या घरी देवळ देवळ करून आम्ही खेळायचे. त्याच्या परसावात नीवाचे उंच झाड होते. वर केसर असलेले लहानशा चेंडूसारखे फळ. दत्तू आम्हांला नीव द्यायचा. अशोकाची फुले द्यायचा. या फुलांचे भगवे झुबके असतात. पत्रीमध्ये कळंबाचे पान हवे. आपल्या घरी ते झाड होते. आणि तुझे आजोबा केवडा घेऊन यायचे. अजून कमळे फार फुलू लागली नसली तरी शिरखळच्या तळपातून आपला गोविंदा थोडी तरी आणी. अक्काची मंगळागौर भरगच्च दिसे. किती तरी वसोळया होत्या. मला आठवते. तुला वसोळया शब्दाचा अर्थही नाही कळणार. मंगळागौर पुजायला ज्या नववधू जमतात त्यांना वसोळया म्हणतात. सायंकाळी पारिजातकाच्या कळया जमवून केळींच्या किंवा कासाळवाच्या टाटोळ्यात कमानदार रोवीत असू. अब्दागीर म्हणायचे त्याला. मगळा-गौरीच्या त्या पूजेत सायंकाळी तो खोवायचा. कळया रात्री फुलतात नि घम-घमाट सुटतो. फुगड्यांचे व इतर खेळ रात्रभर. फुगड्यांचे तरी किती प्रकार. मोठमोठ्या बायकाही मागे नाही रहायच्या. आणि आगीन पासोडीचे, जखीण होण्याचे नाना खेळ. तुझी एक चुलत आजी केस पिंजारून, मळवट भरून पेटलेल्या उदबत्त्या तोंडात धरून एकदम यायची. दिव्यांवर सुपे धरून अंधार करायचा. ती आजी मग किंकाळायची. आम्ही मुले घाबरत असू! सुधा, आम्ही मुलेही खोड्याळ; अळवाच्या देठाला किंवा कमळाच्या देठाला रंग लावून आम्ही मध्येच टाकीत असू. 'साप', 'साप' म्हणून मग आरडा-ओरडा व्हायचा. आणि साऱ्या लहानमोठ्या बायका मग नावे घ्यायच्या!

आपापल्या यजमानांचे ओखाणे घेऊन. न्हातान्या सवाष्ण बायाही जरा लाजायच्या. गंमत असे. परंतु ४० वर्षांपूर्वीची ती गंमत आज नाही. त्या वेळच्यासारखा गाव गजबजलेलाही नाही. सारे नोकरचाकरीला मुंबईस. मला लहानपणच्या आठवणी परवा येत होत्या. आता मंगळागौरीला फोनो असतो. आपोआपच गाणी ऐकायला मिळतात. नवी गाणी. गेला दर्यापार- वगैरे. तुला दर्यापार फार आवडते. होय ना ? दादांनाही फार आवडे. नानूच्या पत्नीला दादा आजारीपणात ते म्हणायला सांगायचे.

आपल्या गावात नारळी पौर्णिमेचा तसा उत्सव नाही. मुंबईसच तो पहावा. चौपाटीवर लाखो माणसे जमतात. समुद्र आता शान्त होतो. पुन्हा गलबते हाकारतात. तो अगस्तीचा तारा दक्षिणेकडे पुन्हा दिसू लागतो. तेजस्वी तारा. अप्पाला तो फार आवडतो. हा तारा अस्ताला गेला म्हणजे समुद्र खवळतो. पुन्हा दिसू लागला म्हणजे समुद्र शान्त होतो. अगस्ती सात समुद्र प्यायला, तो समुद्राचा शत्रू, अशा दंतकथा आहेत. पुराणातील अनेक कथा आकाशातील तारांगणांतून जन्मल्या आहेत.

पंढरपूरच्या सेवादलाची पुष्पा अमीन हिने मला नारळी पौर्णिमेस राखी पाठवली होती. हातात बांधा म्हणून मुद्दाम तिने लिहिले होते. ती मॅट्रिकच्या वर्गात आहे. हल्ली मी दूर आहे तरी तिने आठवणीने पाठवली.

गोकुळ अष्टमीला माझा उपवास असतो. लहानपणी आपल्या गावात खेळ व्हायचे. दांडपट्टा, मलखांब, कुस्त्या–सारे असे. मीही दहीहंडी खेळायचा. दह्याची हंडी फोडल्यावर खापऱ्या होतात. खापरीचा तुकडा घुसून घरी न्यायचा. गोविंदा गोविंदा करीत आम्हीही नाचत असू. परंतु ब्राह्मण मुले निराळी नाचायची. मग दुसरी मुले यायची. कृष्णाने तर गोकुळातील सर्वांना एकत्र हाक मारली. तो भेदभाव दूर करणारा. आम्हांला गोपाळकृष्णाचा संदेश कळता तर देशाची दुर्दशा होती ना. भेदांचा बुजबुजाट होता ना. गोपाळ- कृष्णाचे चरित्र महान. तो गाय चारी, घोडी हाकी, उष्टी काढी. कर्मयोगाचा उपदेश त्यानेच करावा. घोंगडी खांद्यावर. गळ्यात वनमाळा, ओठांत साधी बांबूची बासरी, परंतु विश्वाला मोहविणारी ! गोकुळात अशक्त असत त्यांना लोणी दूध देई. खेळातही अशक्त मुलांच्या, पेंद्याच्या बाजूला असायचा.

त्यांना विजय मिळवून द्यायचा. गरिबांची मान उंच करायचा. त्याने वणवे गिळले म्हणजे भांडणे मिटवली. कालिया मारला म्हणजे द्वेषमत्सराचा सर्प नाहीसा केला. सहकाराने संकटे दूर करायला शिकविले. इंद्राची कशाला पूजा ? ज्या पर्वतावर गायी चरतात त्या गोवर्धन पर्वताची करा, कृष्ण म्हणाला. इंद्र रागावला. मुसळधार पाऊस पडू लागला. गोपाळकृष्ण म्हणाला : " हा गोवर्धन वर उचलू. लावा काठ्या. " आणि गोवर्धनाची गगनचुंबी छत्री झाली. सुधामाई, कृष्णचरित्रात अपार गोडी. भारतीय संस्कृतीत राम आणि कृष्ण ओतप्रोत आहेत.

असा हा श्रावण महिना जात होता. आणि ९ ऑगस्ट, १५ ऑगस्ट दिवस आले. ९ ऑगस्ट म्हणजे चलेजाव चळवळीचा सारा इतिहास. तुझी इंदुताई तेव्हा ठाणे नि येरवडा तुरुंगात होती. तुझ्या बोर्डीला केवढी चळवळ. शाळेत मुले येत ना म्हणून शाळा बंद होती. तर एक अधिकारी येऊन म्हणाले, ' शाळा का बंद ? ' ' मुलेच नाहीत ', चालक म्हणाले. तेव्हा मुस्लिम होस्टेलमधील मुले अधिकाऱ्यांनी आणून बसविली ! मारून मुटकून शाळा चालू झाली. तुमच्या शारदाश्रमाजवळ गोळीबार होण्याची वेळ आली होती. सुधा, वर्ध्याला केसर नावाची मुलगी गोळीबारात मेली. आसामात तेजपूरला कनकलता पोलिसांसमोर आली व म्हणाली, ' मला गोळी घाला.' मुंबईस कुसुम मोकाशी चौपाटीवर लोकमान्यांच्या पुतळ्याशेजारी झेंडा लावताना लाठीमाराने बेशुद्ध होऊन पडली. मुलामुलींचा हा इतिहास. शिरीष, नारायण, हेमू, कमलाकर शंकर, वसंत- अनेक बालहुतात्मे ! ९ ऑगस्टच्या चळवळीत तो गांधीजींचा उपवास, महादेवभाईंचे देवाघरी जाणे, कस्तुरबाही तुरुंगात शिवरात्रीस वारल्या. मौलाना आझादांच्या पत्नीही वारल्या. अनेक वियोग नि दुःखे. परंतु स्वातंत्र्यासाठी केलेला त्याग मोजायचा नसतो. ९ ऑगस्टची स्मृती कोण विसरेल ? आणि १५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळाले. तिसरे वर्ष सुरू होत आहे. महात्माजींची पदोपदी आठवण होते. देशात आज नैतिक प्राण राहिला नाही. परंतु अमावास्या जवळ आली तर बीजेचा चंद्रही जवळ असतो. आजचा अप्रामाणिकपणा, लाचलुचपत जाईल. राष्ट्रभावना, सामाजिक भाव जनतेत येईल. अशी आशा तर वाटते. तुझ्या तेथे सुंदर समारंभ झाला असेल. तू

कशात भाग घेतलास का ? घरावर झेंडा उभारलास का ? अरुणा "झेंडा झेंडा, अप्पा झेंडा !" म्हणून नाचली असेल. ऐटीने तिने जयहिंद केला असेल.

पुष्कळ वर्षांपूर्वी मी अमळनेरला होतो. तेव्हा युरोपातील एका मुलीचे अमळनेरच्या एका मुलीला पत्र आले होते. अशी आन्तरराष्ट्रीय मैत्री मुले जोडतात. त्या मुलीने लिहिले होते : "उद्या आमच्या देशाचा स्वातंत्र्यदिन आहे. सुट्टी आहे. आम्ही मुलांनी रानावनातून फुलांच्या राशी आणल्या आहेत. फुलांची तोरणे, माळा रस्तोरस्ती लावून सौंदर्य निर्मू. मधून मधून झेंडे. सारा गाव सजवू." आपल्याकडे किती मुलांनी असे केले असेल ? त्या त्या गल्लीतील मुलांमुलींनी एकत्र येऊन रस्ते सजवले होते का ? अशा माळा रस्तोरस्ती बांधल्या होत्या का ? सुधामाई, स्वातंत्र्याचे आपल्या लोकांना महत्त्वच का वाटत नाही ? त्या दिवशी काही लोकांना सुतकीपणाच आठवतो. हिंदुस्थानचा काही भाग पाकिस्तान झाला म्हणून यांना दुःख होते. परंतु ती अपरिहार्य घटना होती. सुधा, हे पाकिस्तान आपल्या पापातून जन्मले. हे मुसलमान हिंदुधर्मातून गेले. परंतु अजूनही डोळे उघडत नाहीत. अजूनही हरिजनांना मंदिरे बंद ! विहिरीवर येऊ देणार नाहीत. आमचे डोळे उघडणार तरी कधी ?

परंतु काही असले तरी आज आपण ३५ कोटी एका ठिकाणी आहोत. आणि सर्व धर्मांचे लोक त्यांत आहेत. सर्वांना एकत्र नांदवण्याचा प्रयोग आपण अजून करू. त्यासाठी तर हा देश जगला आहे. भारतमातेला सर्व धर्म नि संस्कृती एकत्र नांदवून दाखवायच्या आहेत. हे ध्येय मला उचंबळते. भारतीय इतिहासातील हे सोनेरी सूत्र. हा अखंड धागा.

सुधामाई, स्वातंत्र्याच्या दिवशी रामू झाडूवाल्याला सकाळीं मी घरी बोलावले. त्याला चहा दिला. त्याच्याबरोबर मी घेतला. त्याची कपबशी विसळली. नंतर सूत कातून मी इतर मित्रांबरोबर सफाईसाठी गेलो. आज माझे मौन होते म्हणस ना. परंतु एके ठिकाणी थोडे बोललो. ते लहान मुलांमुलींचे झेंडावंदन होते. मी त्यांना म्हटले : "भारताची तुम्ही मुले. उद्योगी व्हा. खूप ज्ञान मिळावा. ज्ञान सेवेसाठी उद्या आणा. आज देशाला अन्न हवे आहे. तुम्हीही काही उत्पादन करा. लावा भाज्या. लावा रताळी. आळस नको. आणि सारे एकमेकांत मिसळा, गोपाळकृष्णाप्रमाणे 'या रे या अवघे जण'

अशी हाक मारा. कोणतेही कर्म करताना हे मानवतेला शोभेसे आहे ना, याचा विचार करा. वाईट भाषा ओठांवर नको, वाईट विचार मनात नको, वाईट काम हातून न होवो." मुलांनी झाडे लावली. तूही लावले असशील. ते जगव, काळजी घे त्याची. अर्धवट काम निरुपयोगी. इंद्रजिताचा यज्ञ पुरा झाला नाही म्हणून त्यातून निघालेला विजयरथ त्याला विजय देऊ शकला नाही. जे तडीला न्याल त्याला अर्थ आहे.

मी हल्ली खूप हिंडत असतो. परवा जरा ऊन पडलेले होते आणि एकदम कवडे पाहिले. ते ठिपक्या ठिपक्यांचे पक्षी. तिकडे देशावर कवडे दिसत नाहीत. आणि एके दिवशी मी उजाडत जात होतो तो कोकम कावळा दिसला. तो सूर्योदयाच्या आत दिसला तर त्याला पवित्र मानतात. त्याचे ते भगवे पंख शोभत होते! लहानपणी शाळेत जाताना दिसला तर आम्ही नमस्कार करायचे. परंतु परवा हात जोडले गेले नाहीत. तरीही प्रेमाने त्याच्याकडे मी पहात होतो.

गावात भाज्या भरपूर झाल्या आहेत. भेंड्यांना भर आला आहे. यंदा वेडे पीक आले आहे त्यांचे. आणि कोवळ्या लुसलुशीत काकड्या. मी बाबूकाकांच्या मंदीला ती लहान असताना काकडी म्हणायचा. कोकणातील काकड्या म्हणजे मेवा. विशेषतः गुलाबी गराच्या फारच मधुर. शेजारी राधाकाकूंनी काकड्या खारात टाकल्या आहेत.

कुंपणावर भोपळ्यांचे वेल फुलले आहेत. पुढे त्यांच्या भिंगऱ्या होतील. भिंगरीतील एकेक भाग जोडला तर आतून हिरवा पोपट निघतो! पोपटासारखा हिरवा गर! भिंगऱ्यांच्या डेखांची आई भाजी करायची. त्यात सहस्रफळ, दोडकी, भेंडी सारे घालायचे. पंचमेळ भाजी असे भाऊ म्हणायचे.

आता गावात गणेशोत्सव सुरू होईल. नाटक होईल. थोडे दिवस मजेत जातील. मला तुम्हा सर्वांची आठवण येते. परंतु एवढ्यात काही तुमच्याकडे येता येणार नाही.


आणि अग, भास्करभटजींच्या मांजरीचे पिलू घारीने चोचीने उंच नेले. परंतु तिच्या चोचीतून ते पडले. घार पुन्हा झडप घालायला आली. परंतु

पिटाळली धाकूने. धाकू त्यांचा गोवारी. पिलाची मान वाकडी झाली आहे. परंतु जिवंत आहे. देवाच्या इच्छेशिवाय कोण कोणाला मारणार ?

अरुणाच्या वाढदिवशी तू ते नवे जपानी दिसणारे पातळ नेसली होतीस का ? आणि अप्पाने व इतरांनी नऊ नऊ बुक्क्या मारल्या असतील. तुझा अभ्यास काय म्हणतो ? खेळांचे सामने संपले का ? सारे कळव. सर्वांस स. प्र. चि. प्रिय अरुणास स. आ.

तुझा

साधना, २७ ऑगस्ट १९४९ **अण्णा**



चि. प्रिय सुधास
सप्रेम आशीर्वाद

तुझे पत्र मिळाले. वाचून आनंद झाला. अरुणाचा पाण्याशी खेळत असलेला फोटो आवडला. ती उंच झाली आहे. तू लिहिलेस की, ती खूप बोलते; आणि नवीन शब्द कानांवर पडला की तोच वापरते. पिवळे फूल यातील 'पिवळे' शब्द तिला नवीन वाटला. आणि अप्पाने लिहिले आहे की एके दिवशी 'नंतर नंतर' करीत होती. मुलांची मोठी मौज असते. तुमच्या बोर्डीला मशालींची मिरवणूक वगैरे कार्यक्रम होता. तू सभेला, मिरवणुकीला गेली होतीस का?

दिवस तर भराभरा जात आहेत. श्रावण महिना संपून भाद्रपद सुरू झाला. श्रावण महिन्यात अनेक सण, अनेक व्रते. श्रावणे सोमवारी, श्रावणे शनिवारी अनेकांचे उपवास. जिवतीची पूजा. मागील पत्रात तुला श्रावण माहात्म्य लिहिले होते. आणि एक गोष्ट लिहायला विसरलो. श्रावणातच खानदेशात पोळ्याचा सण येतो. साताऱ्याकडे त्याला बेंदराचा सण म्हणतात. बैलांची शिंगे रंगवतात. अंगावर झुली घालतात. सायंकाळी गावातील बैलांची मिरवणूक निघते. कोणाचे बैल पुढे यावरून भांडणेही होतात. परंतु अलीकडे

ही भांडणे कमी होत आहेत. कोठे कोठे गावाच्या कामाला जो जास्त रक्कम देईल त्याचे बैल पुढे, अशी पद्धत पडत आहे. मिरवणूक मजेदार असते. बार वाजत असतात. नाना वाद्ये असतात. बैलांच्या गळ्यांतील घंटा वाजत असतात. सुधामाई, हा सण मला फार आवडतो. कृतज्ञता दाखवण्याचा हा सण. शेतीची कामे बरीचशी तात्पुरती संपलेली असतात. बैलांच्या जिवावर शेतकऱ्याचा संसार. आपल्या वेदग्रंथांत बैलाची स्तुती करणारी स्तोत्रे आहेत. काम करताना बैलाला मारतात. गाडीला जुंपून फटके मारतात. त्यांच्या मानेवर जू. तो मोट ओढतो. बैलाचे अनंत उपकार. एक दिवस तरी ही कृतज्ञता आपण प्रकट करतो. पोळ्याच्या दिवशी गरीब शेतकरी घरी पुरणपोळी करील. आज बैलाला पुरणपोळीचा नैवेद्य. आज त्याला काम नाही. आज त्याला विसावा. कढत पाण्याने त्याला आंघोळ घालतात. सायंकाळी मिरवत मिरवत बैल घरी आल्यावर यजमान म्हणतो : "बैलोबा, माझ्या राजा, माझ्या सरदारा, तू माझे दैवत. तुला मारले, टोचले; क्षमा कर. आज आधी तुला नैवेद्य. खा हो राजा. ही पोळी, ही वर तुपाची धार. आज तू आधी खा. आम्ही मागून." सुधा, गोड सण– नाही का ?

परंतु बैलाबद्दल कृतज्ञता दाखवणारे आम्ही आज माणसांना दूर लोटीत आहोत. श्रावण महिन्यात नागपंचमीला सापांचा महिमा. बैलांचा महिमा. सर्व सृष्टीवर प्रेम करायला शिकवणारी आपली संस्कृती आहे. परंतु आज द्वेषमत्सर माजवण्यात आम्हांला कृतार्थता वाटत आहे ! आणि सुधामाई, पोळ्याचा सण पाळणारे आम्ही पशुपक्ष्यांनाही नीट वागवीत नाही. बैलांची आपण कितीशी निगा घेतो ? खानदेशात पराणीने बैलांना टोचतात. बऱ्हाणपूरकडे तर चांगली रुंद आर असते ! वसईकडेसुद्धा हा प्रकार. बैलांच्या पाटीमागचा भाग टोचून टोचून चाळणीसारखा झालेला असतो. खरोखर असे टोचणे राक्षसी आहे. गुजरात, पंजाब, इकडे बैलांना अधिक माणुसकीने वागवतात. बैलाला शिवी दिलेलीही त्यांना खपत नाही. खरोखर, ज्या मुक्या प्राण्यांपासून आपण अपार सेवा घेतो, त्यांना सहानुभूतीने आपण वागवले पाहिजे. 'वामन भटजींची गाय' ही गोष्ट तू वाचली असशील. मुके प्राणीही प्रेम ओळखतात. त्यांचा तळतळाट आपण घेऊ नये.

काही काही बैल किती सुंदर दिसतात! कृष्णाकाठचे बैल एकरंगी, एकशिंगी. त्यांना बघत रहावे असे वाटते. ते मोठे कोहळे, शिंगांत बसवलेल्या शेंब्या, गळ्यात साखळ्या,– किती रुबाबदार, उमदा दिसतो बैल! त्यांच्या डोळ्यांकडे मी लहानपणी बघत रहायचा! ते निळेकाळे गंभीर डोळे! जणू डोहच! सुधा, तू गाईबैलांचे डोळे कधी पाहिले आहेस?

खानदेशात बैलांच्या अनेक गोष्टी. पोळ्याच्या सणाच्या दिवशी उपवास करणाऱ्या बैलांच्या दंतकथा आहेत. माझे एक मित्र श्री. कोलारकर मास्तर होते. ते सांगत की, त्या दिवशी त्यांचा बैल काडीसही स्पर्श करीत नसे. आज पोळा हे त्या बैलाला कसे कळे? का पोळ्याचा सण करता, परंतु नेहमी तर आम्हांला छळता– असे मनात येऊन एखादा स्वाभिमानी बैल उपवास करीत असे! खानदेशात नंदीचे खेडेगाव म्हणून पाचोरा तालुक्यात एक गाव आहे. त्या गावातील व्रती बैलाचे तेथे स्मारक आहे. या राष्ट्रातील बैलसुद्धा व्रती होते. आणि ती अमळनेरजवळच्या डांगरी गावच्या नाग्याची गोष्ट तुला माहीत आहे का?

एक बाई बाळंत झाली. तिला नागच झाला! तो घरात वावरे. भावावर त्या नाग्याचे फार प्रेम. भावाच्या पाठोपाठ शेतावर जाई. भावाजवळ पाटावर वेटोळे करून बसे, दूध पिई. एकदा भाऊ गावाला जात होता. नाग्याला म्हणाला, " नाग्या, मी येईन आठ दिशी. पोटभर दूध पीत जा. " आठ दिवस झाले. परंतु भाऊ आला नाही. नाग्या दारात बसून वाट पाही, तो दूध पिईना, पाणी पिईना. आई म्हणाली : " भावावर एवढं प्रेम, तर जा त्याला बोलावून आण. " नाग्या घरातून बाहेर पडला. सळसळ करीत रस्त्याने चालला. रात्र झाली. तरी नाग्या जातच होता. तिकडून भावाची गाडी येत होती. नाग्या आपल्याच विचारात दंग. भावाची गाडी त्याच्या अंगावरून गेली. नाग्या चिरडला गेला. भाऊ घरी गेला. नाग्या सामोरा आला नाही.

" आई, नाग्या कोठे आहे? " त्याने विचारले.

" अरे तुलाच शोधायला गेला. " ती म्हणाली.

हातात कंदील घेऊन भाऊ बाहेर पडला. नाग्या, नाग्या– हाका मारीत होता. तो वाटेत नाग्याचे तुकडे दिसले. भावाला अपार दुःख झाले. दगडी नाग करून रस्त्याच्या कडेला त्याने बसवला. रोज तो तेथे दूध नेऊन ठेवी. सुधामाई, अशा खानदेशातील गोष्टी. या भारतभूमीत व्रती बैल जन्मतात, माणसावर प्रेम करणारे नाग निपजतात. परंतु माणसावर प्रेम करणारी माणसे का निपजू नयेत ?

श्रावण महिना संपला. पावसाचा भर ओसरला आहे. परंतु पाऊस हवा आहे. शेते सुकली. भाते पसवायची ही वेळ. खाचरात पाणी नसेल तर कसे होणार ? जुन्नरकडे बाजऱ्या जळून गेल्या. खानदेशातही पाऊस नाही. कसे व्हायचे ? सारे जीवन पावसावर अवलंबून आहे. तुला बिरबल बादशहाची ती गोष्ट माहीत आहे ? अकबराच्या राणीचा एक आप्त होता. राणी म्हणाली : " त्याला मोठी जागा द्या. " अकबर म्हणाला : " त्याची परीक्षा घेईन. अक्कल असेल तर देईन जागा. " दरबार भरला. अकबराने त्या मेव्हण्याला विचारले, " नक्षत्रांतून पावसाची दहा नक्षत्रे वजा केली तर बाकी काय उरेल ? " मेव्हणे म्हणाले : " मी का लहान मूल आहे असे प्रश्न विचारता ते ? अहो १७ नक्षत्रे उरतील. " अकबर म्हणाला : चूक. " बिरबल, तुम्ही सांगा. " बिरबल म्हणाला : " शून्य ! " अकबर म्हणाला : " बरोबर ! " दरबारी लोक कुजबुजू लागले. तेव्हा अकबर बिरबल्ला म्हणाला : " त्यांना ही वजाबाकी समजून द्या. " बिरबल म्हणाला : " पावसाची नक्षत्रे वजा केली, दूर केली, तर जगात काय उरेल ? पाऊस पडणार नाही. शेते–भाते पिकणार नाहीत. सर्वत्र मरणकळा येईल. शून्याकार होईल, हाहाःकार होईल. पाऊस नाही म्हणजे काही नाह. " परंतु उकाडा होत आहे. काल रात्री विजा चमकत होत्या. जरा गडगडलेही. ' मघा, वरती बघा ' अशी म्हण. मघा नक्षत्राचा पाऊस पडायलाच हवा. देशात अन्नधान्याचा तुटवडा. पाऊस तरी पडो. परंतु हे आपल्या हाती थोडेच आहे ?

भाद्रपद महिना येणार, गौरी–गणपतीचे दिवस येणार म्हणून तयारी सुरू होती. गावात अनेकांकडे गणपतीच्या मूर्ती तयार होत होत्या. तो मुक्या पटवर्धन, तो किती सुंदर गणपती बनवतो ! लहानपणी आम्ही मुले गावाबाहेर

किल्ल्याकडे एका पऱ्ह्याच्या काठी जात असू. तेथे चिकणमाती असे. एकदा काठाची माती काढताना मी प्रवाहात पडलो. वाहूनच जायचा! आम्ही मुलांनी उत्सव केला. मारकुटे हेडमास्तरांची बदली व्हावी म्हणून. तो आमचा नवसाचा गणपती होता. मला ते लहानपणाचे दिवस परवा आठवले. गणपतीच्या देवळात सार्वजनिक उत्सव. सुंदर मखर घातले आहे. हंड्या झुंबरे आहेत. रात्री गणपतीला सजवतात. नयनमनोहर मूर्ती दिसते. आमच्या लहानपणी सीतारामनाना ओक गणपतीला सजवायचे. ते कलावान. मोठे व्यवस्थित. आपले हे लहानसे गाव. परंतु चित्रकार, गवयी गावात होते. वेदमूर्ती श्रीपतिबाबा सुंदर चित्रे काढायचे. ते आता थकले आहेत. तरी पूर्ववत स्नानसंध्या चालू आहे. वासूतात्या, कुशाअप्पा वगैरे शास्त्रीय गवयीही होते. उत्सवात गणपतीच्या देवळात ते गाणे म्हणायचे. परंतु आता शास्त्रीय गाणे फारसे कोणाला नाही येत. गणपतीच्या उत्सवातील कीर्तने सुरू झाली आहेत. नाटक कसे काय जमते पहावे.

गणेशोत्सव लो. टिळकांनी राष्ट्रीय केला. या दहा दिवसांत एकत्र यावे, ज्ञानाची उपासना व्हावी, राष्ट्रीय वृत्ती वाढावी, असा त्यांचा हेतू. आज राष्ट्र स्वतंत्र आहे. आपण आपल्या उत्सवाला सर्वांना बोलवावे. कुरुंदवाडला गणेशोत्सवात मुसलमानबंधूही पूर्वी येत. ती सुंदर प्रथा आज आहे की नाही मला माहीत नाही.

गणपतीच्या आधी हरतालकांचे तुमचे व्रत. पार्वतीच्या तपश्चर्येचा दिवस. आदल्या दिवशी आवरणे करून तुम्ही भरपूर खाता व मग दुसऱ्या दिवशी उपवास. होय ना? पुण्याला मटारची मौज असते. वाटाण्याच्या हिरव्या शेंगा! त्याचे पुरण भरून करंज्या करतात. कोकणात ही मौज नसते. हरतालकांचा तुम्ही सर्वांनी कडक उपवास केला असेल. पत्री आणली असेल. पूजा केली असेल. रात्री गाणी, भजन, खेळ यांनी हरतालका जागवल्या असाल. देवी पार्वती, शंकर हा वर मिळावा म्हणून तपश्चर्या करीत होती. तीही काही खात नसे. संस्कृतमध्ये कालिदासाने कुमारसंभव म्हणून काव्य लिहिले आहे. पार्वतीच्या तपाचे त्यात वर्णन आहे. आणि शंकर एका अतिथीच्या

वेषात तिच्याकडे येतात. तिची चौकशी करतात. ते म्हणतात : "तुझे शरीर किती कोमल, सुकुमार ! आणि व्रत किती कठीण ! शरीर नीट असेल तर सारे कर्मधर्म. शरीर खंगवून का धर्म मिळणार ?" तो अतिथी पुढे म्हणतो : "त्या शंकरासाठी का एवढा अट्टाहास ! तो तर भिकारी. भुजंग धारण करणारा. रानावनात राहणारा." पार्वती संतापते व म्हणते : "महात्म्यांची निंदा करू नकोस. मला ती ऐकवू नकोस. निंदा करणारा व ती ऐकणारा दोघे पापी ठरतात."

"न केवलं योमहतोऽपभाषते
शृणोति तस्मादपि यः स पापभाक् ॥"

जो मोठ्यांची निंदा करतो तोच पापी असे नाही. ऐकणाराही पापी. सुधा, देशबंधू दासांचे मराठीतील चरित्र तू वाचले आहेस का ? त्यात एक प्रसंग आहे. देशबंधूजवळ बोलताना कोणी तरी गांधीजींविषयी काढू नयेत असे उद्‌गार काढले. देशबंधू म्हणाले : "मतभेद असणे निराळे. परंतु त्या विश्ववंद्य विभूतीबद्दल असे तुम्हांला बोलवते तरी कसे ? तुम्ही येथून जा. मी पुन्हा तुमचे तोंड पाहणार नाही !" परवा मुंबईचे एक हिंदुसभावाले एका वृत्तपत्र कचेरीत बोलताना गांधीजींना 'Rascal' म्हणजे 'खलात्मा' असे म्हणाले. तेथील एका तेजस्वी तरुणाने त्यांच्या थोबाडीत मारली, असे वर्तमानपत्रात आले होते. महात्माजींची हत्या करण्यात आली म्हणून अजूनही या लोकांना कृतार्थता वाटते ! गोडसेचे पोवाडे गाल, दहा वर्षांनी त्याला देव म्हणून मानाल, असे काही हिंदुमहासभावाले व त्यांच्या विचारसरणीचे लोक बोलत असतात. मला या लोकांची वृत्तीच समजू शकत नाही. परवा पुण्याला एक बडे गृहस्थ म्हणाले : "देशाचा व धर्माचा बळी देऊन स्वातंत्र्य मिळविले आहे !" ज्या हिंदुमहासभेला हे गृहस्थ मिळाले त्या हिंदुमहासभेनेही फाळणी व्हायचीच असेल तर पंजाब–बंगालचीही करा असाच ठराव केला होता ! फाळणी आम्ही होऊ देणार नाही; हे आमचे दहा लाख लोक मरायला वा मारायला उभे आहेत अशी घोषणा त्यांनी नव्हती केली. घरच्या आईचे हे सारे काळ आहेत. आणि धर्माचा बळी कोणी दिला ? तुम्ही द्वेषमत्सर माजवून धर्म पायांखाली तुडवलात की मानवता आणण्यासाठी प्राण हाती घेऊन उभे

असलेले महात्माजी,– त्यांनी तुडवला ? धर्म म्हणजे हे समजतात तरी काय ? खरोखर हे आंधळे, संकुचित, द्वेषमत्सरी लोक म्हणजे समाजाला, राष्ट्राला नि जगाला धोक्याचे आहेत, शापरूप आहेत.

सुधामाई, ज्या पार्वतीचे व्रत तुम्ही करता ती शंकराची निंदा सहन करीत नव्हती. जगाच्या कल्याणासाठी हलाहल पिणारा तो महादेव ! त्याच्या दरिद्रतेत ती अनंत वैभव मानीत होती. शिवशंकराप्रमाणे द्वेषमत्सराचे विष पिऊन हिंदभूमीत शान्ती यावी, जगात शान्ती यावी म्हणून प्राणपणाने झटणारा महात्मा, त्याच्याबद्दल मनात भक्तिभाव बाळगा. तू मागे लिहिलेस की, समितीच्या काही बायका गांधीजींबद्दल वाटेल ते बोलतात. 'एवढा काय गांधीजींबद्दल पुळका येतो तुम्हांला' असे एक बाई म्हणाल्या. ते ऐकून तुला वाईट वाटले, तू उठून गेलीस वगैरे. चांगले केलेस. त्यांना पाप करू दे. तू दूर रहा. तू, तुझ्या मैत्रिणी,– तुम्ही तुमचा मानवता संघ काढा.

गणपतीचा उत्सव सर्वत्र सुरू आहे. नाना प्रकारचे, नाना आकारांचे गणपती, नेहरूरूपधारी, गांधीरूपधारी,– असे नमुने. गणपती शेत नांगरीत आहे असेही देखावे आहेत म्हणे. त्या त्या वेळच्या गरजांना अनुरूप असा आपला देव बनतो. प्रभू अनन्तगुणसागर. तो सकलशक्तिमान. त्या त्या परि-स्थित्यनुरूप आपण विशिष्ट रूपात त्याला ओळखतो.

गणपतीचे मस्तक मोठे आहे. पोट मोठे आहे. सर्वांचे अपराध तो पोटात घालील, आणि थोर विचार डोक्यात खेळवील. तो उंदरावर बसला आहे. उंदीर चिरफाड करतो. समाजात काही लोक असे असतात की, जे पृथक्करण करतात. त्यांच्याजवळ समन्वयबुद्धी नसते. गणपती म्हणतो की ही चिरफाड करणारी बुद्धी, पृथक्करणाची बुद्धी फाजील नाही वाढता कामा. तिच्यावर काबू हवा. म्हणून तो उंदरावर स्वार आहे. तो सिद्धिविनायक आहे. सिद्धी मिळेल अशाच रीतीने विशेष नेतृत्व तो करील. गणपतीचे स्वरूप म्हणजे महान नेत्याचे स्वरूप. गांधीजी सर्वांचे अपराध पोटात घालीत. डोक्यात महान विचार खेळवीत. केवळ चिरफाड करणारे ते नव्हते, तर समन्वय करणारे होते. सारे जग हिंसेकडे जात असता जगाला जर खरी शांती हवी असेल, तर या विशेष मार्गाने जा असे ते सांगणारे होते. ते साधे नायक नव्हते तर

विनायक म्हणजे विशेष रीतीने नेतृत्व करणारे होते. मारा–ठोका पद्धतीचे नेतृत्व करणारे अनादी काळापासून झाले. परंतु नवे अभिनव नेतृत्व तेच करू पहात होते. असे अनेक विचार माझ्या मनात आले. परंतु ते कोठवर सांगू ?

तुम्ही ऋषिपंचमी केली असेल. त्या दिवशी बैलांच्या श्रमाचे खायचे नाही. स्वतःच्या श्रमाने पिकवलेले खायचे. ऋषी स्वतः खपत, शेती करीत. वेदातील ऋषी म्हणतो :

" अक्षैः मा दिव्यः कृषिमित् कृषस्व । – द्यूत नका खेळू, शेतीच करा. "

ऋषिपंचमी म्हणजे श्रमाचा महिमा. ते अन्न सर्वांत पवित्र की जे स्वतःच्या श्रमाने आपण पिकविले. परंतु आपण बैलांच्या श्रमाचे न घेता इतर माणसांच्या श्रमाचे घेतो. गोविंदाकडून मिरच्या, भोपळा आणायचा. रामा नस्याकडून ऋषींच्या वऱ्या आणायच्या. यात काय अर्थ ? ऋषिपंचमीला एकमेकांकडे आपण भाज्या फळे पाठवतो. हातच्या श्रमाचे सारे. ऋषिपंचमीला बायका एकत्र जमतात. खूप भाज्या करतात. जणू शाका–संमेलन. लहानपणी आपल्याकडे अळू खूप असे. तुझे आजोबा साऱ्या गावाला द्यायचे.

गौरीगणपतीचे दिवस कुणबी मंडळीत फार आनंदाचे. मुली माहेरी येतात. नवीन लुगडी, नवीन कपडे. आणि त्यांचे ते नाच. किती तरी दिवस आधीपासून गौरीच्या नाचाची तयारी होत असते. मुंबईचे रामा लोक नाचाची तालीम घेतात. मला तो नाच फार आवडतो. पायांत घुंगर, हातांत निरनिराळ्या रंगांचे रुमाल. एकदम बसतात, उठतात. गिरकी घेतात. रुमाल नाचवतात. वाद्ये वाजत असतात. आनंद असतो. शेतीची कामे संपलेली असल्यामुळे हे पंधरा दिवस ते मजेत दवडतात. परंतु पाऊस नीट पडलेला असला तर हा आनंद. नाही तर चिंताच असते.

घरी आणलेल्या गणपतीच्याभोवती आरास केलेली आहे लोकांनी. वरती ती माळी. माळीला कवंडले, कांगण्या, तसेच दोडके, सहस्रफळ वगैरे भाजी-फळे. कवंडल दिसते किती सुंदर ! परंतु ते कडूकडू असते. त्यात एक अमृताची बी असते. ती कावळा खातो अशी दंतकथा आहे. कांगण्यासुद्धा दिसतात


छान. जणू बारीक सुपाऱ्यांचे घंदे ! मला गणपतीच्या डोक्यावर पावसाळ्यातील फळे टांगायची कल्पना फार आवडते. जे आपण पावसाळ्यात निर्मिले त्याचीच सजावट. उपयुक्त तेच सुंदर !

असे दिवस जात आहेत. गावात दूधदुभते आहे, चारा भरपूर आहे. मोठ्या पहाटे गुरांना चरायला नेतातच. त्याला 'पसारा' म्हणतात. पुष्कळ वर्षांपूर्वी पसाऱ्याला गुरे घेऊन गेला असता बाळू सबनिसाचा पाय अकस्माशावर पडला. तो साप पाठोपाठ आला. घरातील भिंतीला भोक होते, तिच्यात शिरला. भिंत पाडून पहारीने त्या सापाला मारले ! कधी कधी चरताना गुरांना पान लागते. लहानपणी आजोळी मोठी गाय होती. चरताना जिभेला साप चावला. त्याला 'पान लागले' म्हणतात. ती गाय मेली. परंतु कधी असे प्रसंग येतात म्हणून पसारा थोडाच थांबतो ! पहाटेच्या वेळेस गुरे चरत असतात. गुराखी पावा वाजवीत असतो. किती प्रसन्न वाटते त्या वेळेस.

हे पत्र लांबले. तुला कंटाळा नाही ना येणार ? तूही मागच्याप्रमाणे पत्र पाठव. परवाचे तुझे पत्र मला फार आवडले. तुझ्या ठिकाणी लेखनाचे गुण आहेत. सवय कर. तुझ्या चारू, प्रभा, आशा, शालू, कुंदा वगैरे मैत्रिणींस माझे स. आ. पपी नि अरुणा भांडतात ना ? गंमत करतात दोघी. सर्वांना स. प्र.

तुझा

साधना, सप्टेंबर १९४९. अण्णा



चि. प्रिय सुधास
सप्रेम आशीर्वाद

तुझे पत्र आले ते मिळाले. तू ड्रॉइंगच्या परीक्षेला बसणार आहेस, हे वाचून आनंद झाला. तुला चित्रकलेची, गाण्याची आणि नृत्याची आवड. दादा म्हणायचे : "सुधाला गाणे म्हणत नाचायला फार आवडते." परंतु तुमच्या लहान गावात या सोयी कोठून होणार! निदान चित्रकला तरी शिकून घे. या वेळेस जेवढे शिकता येईल तितके शिकून घे. प्राचीन काळी हिंदुस्थानात चित्रकला शिगेला पोचली होती. स्त्रियाही चित्रकला अभ्यासीत. तुला अनिरुद्ध आणि उषा यांची गोष्ट माहीत आहे का? बायकांचे उदाहरण म्हणून एक सुंदर गाणे आहे. बायका 'ष'चा 'ख' करतात. विषाला विख म्हणतील. आषाढाला आखाडाचा महिना म्हणतील. म्हणून उषाहरणाचे त्यांनी उखाहरण केले. उषा ही बाणासुराची मुलगी. ती शंकर-पार्वतीची अनुरूप वर मिळावा म्हणून मनापासून पूजा करते. शंकर-पार्वती तिला म्हणतात : "आज तुला स्वप्नात दिसेल तो तुझा वर." तिच्या स्वप्नात कृष्णाचा नातू अनिरुद्ध हा येतो. त्याचे रूप तिला आवडते. ती जागी होते. हा पती कोठे असेल, कोठे भेटेल, अशी तिला हुरहूर लागते. तिची चित्रलेखा म्हणून एक मैत्रीण असते.

ती म्हणते : " स्वर्ग, पृथ्वी, पाताळातील सर्वांची तुला चित्रे काढून दाखविते. कोठे तरी तो तुझा प्रियकर आढळेल. " आणि चित्रलेखा चित्रे काढते. स्वर्गातील, पाताळातील थोरा-मोठ्यांची चित्रे काढल्यावर भूलोकावरील थोरामोठ्यांची ती चित्रे काढू लागली. शेवटी यादवांची चित्रे काढते. कृष्ण-बळरामांची चित्रे काढते. ती शेकडो चित्रे उषा बघत असते. परंतु स्वप्नातील प्रियकराची प्रतिमा तिला त्यात दिसत नाही. चित्रलेखेने आता अनिरुद्धाचे चित्र काढले! ते चित्र पाहताच उषेची गाळण उडते. ती उचंबळते.

" अनिरुद्धाचे चित्र पाहता
उषा सरसावी पदर
म्हणे हाचि आवडे वर ॥ "

असे सुंदर वर्णन बायकांच्या त्या गाण्यात आहे. ते गाणे केव्हा तरी तुला सांगेन. परंतु ती प्राचीन चित्रलेखा चित्रकलेत अशी निष्णात होती. आणि इतिहास-भूगोलातही ती चांगलीच हुशार दिसते. सुधा, चित्रकलेत तू प्रवीण हो.

आपल्या गावचे गणपती गेले. काही गणपती दुसऱ्याच दिवशी गेले. काही गौरीच्याबरोबर गेले. मोठे गणपती अनंत चतुर्दशीला गेले. गणपती घरातून गेला म्हणजे जरा सुनेसुने होते. ते मखर, ती सजावट, ती पूजा, त्या आरत्या, तो मंत्रजागर, ते मेळे, ते नाटक, ती प्रवचने, ती गाणी– किती तरी गंमती असतात. देवासमोर सर्व कला दाखवायच्या, प्रभूसमोर निष्पाप आनंद अनुभवायचे. तुला ती एक गोष्ट माहीत आहे ? फ्रेंच भाषेतील नोबल प्राइझ मिळवणारा अनातोल फ्रान्स याने ती छोटी गोष्ट लिहिली आहे. ख्रिस्ती धर्मातील रोमन कॅथॉलिक पंथ मूर्तिपूजक, त्यांच्या चर्चमध्ये मेरीची मूर्ती असते. त्यांच्या चर्चमध्ये आरास असते. गाणे असते. सुंदर चित्रे असतात. एक मनुष्य असतो. त्याला ना कला ना विद्या. तो मनात म्हणाला : " या मेरीमातेसमोर मी माझ्याजवळचे काय मांडू ? आईला काय दाखवू ? मला गाता येत नाही. चित्र काढता येत नाही, काव्य करता येत नाही. मी काय बरे दाखवू परंतु मला एक गोष्ट येते. मला डोक्यावर उभे राहता येते. मेरीमातेसमोर मी माझी ही कला दाखवीन. " आणि तो उजाडत चर्चमध्ये गेला. मेरीच्या मूर्तीसमोर तो डोक्यावर उभा राहिला! इतक्यात पाद्री येतो.

तो संतापतो. “ मेरीचा अपमान करतोस;-तिच्यासमोर तंगड्या उंच करून दाखवतोस ? लाज नाही वाटत ? ” असे म्हणून तो मारू लागतो, तो काय आश्चर्य ! ती मेरीमाता, ती मूर्ती हालल्यासारखी वाटते. तो पाद्री बघत राहतो. मेरीच्या डोळ्यांत करुणा असते, प्रेम असते. ती आसनावरून खाली येते. त्या मनुष्या-जवळ जी काय कला होती ती भक्तिभावाने दाखवणाऱ्या त्या भक्ताला ती हृदयाशी धरते. अशी ती गोष्ट. गणपतीच्या दहा दिवसांत आपण असेच नाही का करीत ? ‘ मुले-बाळे ’, स्त्री-पुरुष आपापली हजेरी देवासमोर लावतात. गंमत असते, आनंद असतो. गणपतीला बुडवायला नेतो, तेव्हा जरा वाईट वाटते. जणू घरातलेच कोणी जात आहे असे वाटते. आम्ही त्या दिवशी दहा दिवसांचे मोठेमोठे गणपती घेऊन वाजत गाजत कोंढीवर गेलो. आपल्या नदीतील बाजाराकडच्या रस्त्याजवळील डोहाला कोंढी म्हणतात. तेथे खूप पाणी असते. तेथे पाणी कमी असले तर काठावरील विहिरीत गणपती बुडवतात. परंतु यंदा पाणी भरपूर होते. मागच्या पत्रात मी तुला लिहिले की पाऊस हवा आहे. परंतु तो पडला. पुन्हा विहिरी भरल्या. शेतातून पाणी झाले. आता शेतात उंबळ सुरू झाली आहे. शेतातील हे तात्पुरते झरे वाहत राहतील.

कोंढीवर ‘ गणपतिबाप्पा मोरया ’ करीत आम्ही आलो. तेथे सामुदायिक आरती झाली. आणि ते पहा, गणपतीच्या मूर्ती बुडवणारे तयार झाले. चौरंग डोक्यावर घेऊन ते तरुण पाण्यात शिरले. ‘ गणपतिबाप्पा मोरया ’ जयघोष होत होता. पाणी गळ्याएवढे झाले. गेले, आणखी पुढे गेले. बुडविले गणपती. मूर्ती तळाशी गेल्या. फुले, दूर्वा पाण्यावर सर्वत्र तरंगत होत्या. गुलालामुळे पाणी लाल झाले होते. दहीपोहे, नारळाची खिरापत, वाटलेली डाळ, यांचा प्रसाद दिला जात आहे. नदीमध्ये तरुण पोहत आहेत. आणि येताना चौरंगावर वाळू घेऊन येत आहेत. ही वाळू घरी गेल्यावर सर्वत्र फेकायची. ती वाळू सर्वत्र माङ्गल्य आणील, विघ्ने दूर ठेवील अशी कल्पना.

सुधामाई, गणेशचतुर्थी आली म्हणजे मला शेकडो आठवणी येतात. आईच्या माहेरी व इकडे आपल्या घरी, दोहीकडे गणपती हेच दैवत. एकदा आपल्या गावात भातामध्ये कीड पडली. भाताचे भूस होऊ लागले. गणपतीच्या

देवळात अभिषेक सुरू झाला. मी तेव्हा लहान, दहा वर्षांचा असेन. गणपतीवर जे म्हणून अभिषेक करतात, ते गणपतिअथर्वशीर्ष मला येत नव्हते. वडील म्हणाले : " तू शिकतास तर तूही देवळात येऊन म्हणतास. घरोबरचे भात फुकट जात आहे. " आणि आजोबांजवळ बसून मी त्या अथर्वशीर्षाची संथा घेतली. रात्रंदिवस बसून, घोकून पाठ केले. आणि मीही देवळात जाऊन आवर्तने म्हणू लागलो. मला गणपतिअथर्वशीर्ष अति आवडते. मुंबईस १९४० मध्ये ब्राह्मण सभेच्या गणपतीच्या उत्सवात मला व्याख्यानासाठी बोलावले होते. तेथे माझ्या व्याख्यानात विघ्न करण्यासाठी पुष्कळ आले होते. त्यांनी हस्तपत्रके वाटली होती. नाशिकच्या रामाच्या रथाला हरिजनाचे हात लावू देत नसाल तर ती रामाची प्रेतयात्रा होईल, तिरडी होईल, असे मी कोठे तरी लिहिले होते. हे शब्द मागे घ्या, न् मग बोला, असे हस्तपत्रकात होते. ते हस्तपत्रक हातात घेऊनच मी बोलायला उभा राहिलो नि म्हटले : " मी लहानपणी गणपतीचे जे अथर्वशीर्ष शिकलो त्यात ' सर्व जगदिदं त्वत्तो जायते ' हे सारे जग तुझ्यापासून जन्मले असे आहे. आम्ही ब्राह्मणच त्याच्यापासून जन्मलो असे नाही. आपण सारी प्रभूची लेकरे. त्याच्याजवळ सर्वांना जाता येत नसेल तर तो देव कसा ? " ती सभा शान्तपणे पार पडली. विरोधक शान्त राहिले. मी दोन तास बोललो. सुधामाई, १९३० मध्ये तुरुंगात असताना माझ्याजवळ आजोबांच्या गणपतीची लहान सुंदर पितळी मूर्ती होती. मी जेव्हा नोकरी सोडून सत्याग्रहात शिरलो तेव्हा ही मूर्ती नेहमी माझ्या खिशात असे. तुरुंगात मला आता ती न्यायला परवानगी मिळाली. मी तिची पूजा करी. चतुर्थीचा माझा उपवास असे. गणेशचतुर्थीचाही निराहार उपवास करीत असे. एका मित्राने ती मूर्ती मजजवळ मागितली. त्याला वाटले की ती मूर्ती यशोदायिनी आहे. मला क्षणभर मोह पडला. परंतु मी ती मूर्ती त्याला दिली. अत्यंत आवडती वस्तूही मी कधी कधी मुद्दाम देऊन टाकली आहे. १९३२ मध्ये पू. विनोबाजींनी मला सुंदर वेष्टणातील गीताईची प्रत स्वहस्ताक्षरे भेट दिली होती. परंतु रोह्याचे मित्र श्री. गजाननराव भावे यांना ती प्रत मी दिली. लहानपणी मला खोलीत देवादिकांच्या, देशभक्तांच्या तसबिरी लावण्याचा नाद. परंतु अलीकडे नाही. मनुष्य हळूहळू प्रत्यक्षापेक्षा, मूर्तीपेक्षा तत्त्वाकडे अधिक वळतो हा का याचा अर्थ ? कोणाला

माहीत ! लहानपणी मी देवळात जायचा, उपवास करायचा, खूप फुले आणून पूजा करायचा. अलीकडे मी असे काही करीत नाही. एखादे वेळेस देवाची आठवण येते आणि मी जेथे असतो तेथे क्षणभर डोळे मिटून डोके टेकतो. तेवढ्याने समाधान वाटते. बाहेरचे सोपस्कार, पसारे आज आवडत नाहीत.

अनंतचतुर्दशीच्या दिवशी मी बाळकूदादांकडे जेवायला जायचा. दरसाल त्यांच्याकडचे बोलावणे असायचे. सांज्याच्या पोळ्या असायच्या. बाळकूदादा मुलांजवळ प्रेमाने वागत. माझ्यावर त्यांचा लोभ होता. मी पुढेही कधी मोठेपणी गावी आलो तर त्यांना भेटून त्यांचा आशीर्वाद घेत असे. आपल्या भाऊंबरोबर स्वदेशीच्या बाबतीत त्यांनाही १९१०-११ साली शिक्षा झाली होती. त्यांची मुलगी सुंदराताई. तिला ते म्हणायचे : "पंढरीला आणखी वाढ एक पोळी." सुधा, कित्येक वर्षांनी मुंबईला सुंदराताईला मी पाहिले. कोणाच्या तरी लग्नाला आली होती. मी माझ्या मित्राला भेटायला जात होतो. तो जिन्यातून बऱ्याच बायका येत होत्या. मी बाजूला झालो. तो "पंढरी" म्हणून आश्चर्याने सुंदराताईने हाक मारली. आम्ही तीस वर्षांत भेटलो नव्हतो. परंतु लहानपणच्या आठवणी कशा अमर असतात !

अनंताची पूजा कोणाकोणाच्याच घरात असते. रस्त्यात जर गोंड्याचा गोफ पडलेला सापडला तर तो अनंत समजतात. तो घरी आणून देवात ठेवतात. त्याची पूजा करतात. अनंत हे शेषाचे नाव. जणू शेष भगवानाचे ते रूप. पुढे जरीने विणलेले ते जाडसर टोक म्हणजे जणू शेषाचा फणा. आपल्याकडे नाना व्रते, नाना वैकल्ये.

आपल्या अंगणापासुन कवाडीपर्यंत दोन्ही बाजूंना झेंडूचे माडे मी लावले आहेत. भाऊंना फुलांचा नाद. सुंदर गेंदेबाज गोंड्याची फुले ज्यांना येतील असे माडे ते लावायचे. पायरे शेतात भाऊ वांगी लावायचे. मधून मधून झेंडूही असत. झेंडूच्या माड्यांना कोणी मखमलीची झाडेही म्हणतात. गोंड्यांना मखमलीची फुले म्हणतात. खरोखरच गेंदेदार गोंडे मखमलीसारखे नाजूक दिसतात. ते पिवळे- लाल गोंडे किती सुंदर दिसतात ! एकेरी फुले तितकी सुंदर दिसत नाहीत. परंतु गेंद फारच छान दिसतो. लहानपणी त्यांच्या पाकळ्या काढून खालच्या खोबऱ्याची वाटी आम्ही खात असू.

हे झेंडूचे माडे नवरात्रात बहराला येतील. जोगवा मागायला येणाऱ्या मुली-मुले झेंडू तोडून नेतील. लहानपणी मी त्यांना तोडू नका म्हणायचा, तर भाऊ म्हणायचे : “ अरे, नेऊ दे. हजारो फुललेले आहेत. ”

पावसात त्या लहान लहान छत्र्या सर्वत्र उगवतात. त्याला कुत्र्याचे मूत म्हणतात. का म्हणतात कोणाला ठाऊक! युरोपात त्याची सुंदर भाजी करतात. आणि कुंपणाजवळ बिरमोळे उगवलेले दिसतात, त्यांच्या त्या शेंगा चवळीच्या शेंगांसारख्या लागतात, नाही! कोकणात हे रानचे मेवे नाना प्रकारचे असतात, नाही?

पारिजातकाचा बहर कमी झाला आहे. अनंत, मोगरे, तेही उलगले. त्यांना फारशी फुले येत नाहीत. आता महिनाभराने पिवळी शेवंती फुलू लागेल. मला पिवळ्या शेवंतीचे फूल फार आवडते. ते किती तरी दिवस झाले तरी सुंदर दिसते. दत्ताच्या तसबिरीला शेवंतीचा हार घातला तर पुढच्या गुरुवार-पर्यंत सुरेख राहतो.

पाऊस पडल्यामुळे गवत उंच वाढत आहे. आश्विन महिन्यात ते फारच उंच वाढेल. त्यातून चालत जाण्यात एक प्रकारची मौज असते. परंतु अजून त्याला अवकाश आहे.

सुधामाई, मी परवा एक पुस्तक वाचीत होतो. अमेरिकेचे स्वर्गीय अध्यक्ष रूझवेल्ट यांच्या पत्नीवरचा तो निबंध होता. त्या खूप काम करतात. संयुक्त राष्ट्रसंघात अमेरिकेच्या त्या प्रतिनिधी आहेत. ‘ आजचा दिवस, माझा दिवस ’ या नावाने त्या अमेरिकन वृत्तपत्रांना लेख पुरवीत असतात. त्या त्या दिवशी काय केले, त्या दिवसाच्या गंमती जमती, महनीय, स्मरणीय,– सारे त्यात असते. त्या स्वतःचे अंथरूण घालतात. गुंडाळतात. या लहानसहान कामांनी थोडा व्यायाम होतो, खोटी आढ्यताही दूर राहते; असे त्या म्हणतात. संयुक्त राष्ट्रसंघाची बैठक असली आणि रशियाच्या वर्तुळातील एखाद्या राष्ट्राचा प्रतिनिधी बोलत असला तर त्या पाच मिनिटे तेथेच बसल्या बसल्या झोप घेतात. त्या म्हणाल्या : “ एकदा रशियाच्या प्रतिनिधीचे म्हणणे ऐकले की त्या त्या ग्रहमालेत फिरणाऱ्या बाकीच्या राष्ट्रांचे म्हणणे ऐकण्याची जरूर

नसते. कारण डिट्टो जसेच्या तसे तेच असते. रशिया जी प्लेट लावील तीच त्याच्याभोवती नाचणारी राष्ट्रे लावणार !" रूझवेल्ट यांच्या या थोर पत्नीचे नाव इलीनार. त्यांना फ्रेंच, जर्मन, इटॅलियन, नाना भाषा येतात. त्या मध्यंतरी जर्मनीतील डॉक्टरांच्या संमेलनास गेल्या होत्या. तेथे अहंकाराने इंग्रजीत नाही त्या बोलल्या. त्या जर्मन भाषेत बोलल्या. जर्मन लोकांना त्यामुळे किती आनंद झाला. या लहानलहान गोष्टी. परंतु त्यामुळे हृदये जोडली जातात.

तू वर्तमानपत्रे वाचतेस की नाही ? पाकिस्तानात हिंदुस्थानातील कापडांच्या होळ्या चालल्या आहेत. हिंदी भांडवलदार केवळ स्वार्थी, नालायक आहेत. ते स्वतःबरोबर साऱ्या देशाला विनाशाकडे नेत आहेत. कापडाच्या कारखानदारांनी कापडाच्या किंमती भरमसाठ वाढवल्या. त्यांना वाटे, पाकिस्तानात कापड पाठवू. आज हिंदी गिरण्यांतून कोट्यवधी रुपयांचे कापड पडून आहे. पाकिस्तानचा बहिष्कार. ज्यूट पाठविणे त्यांनी बंद केले. कलकत्त्याच्या तागाच्या गिरण्यांना पूर्व बंगालमधून ज्यूट मिळे. पाकिस्तान हा ज्यूट विलायतेत पाठवीत आहे, हिंदला द्यायला तयार नाही. हिंदी साखरेच्या कारखानदारांनी साखरेच्या किंमती वाढविल्या. पाकिस्तान आज मॉरिशसची मोरस साखर घेत आहे. जपान देश परदेशात माल खपावा म्हणून नुकसान सोसूनही स्वतः विकी. परंतु हिंदी भांडवलदार केवळ लोभी. अती तेथे माती ! बिर्लाशेठ फाळणी झाल्यावर म्हणाले : "पाकिस्तान आर्थिक दृष्ट्या दिवाळखोर ठरेल." आज हिंदी भांडवलदारच आपल्या नालायकीने दिवाळखोर ठरत आहेत. कधी अक्कल येणार या द्रव्यान्ध लोकांना ? आणि आमचे सरकार या नालायकांच्या नादाने नाचत आहे. या देशाच्या नशिबी काय आहे कळत नाही. समाजवादी सरकार न येईल तर हे भांडवलदार हिंदुस्थानची सर्व बाजूंनी हानी केल्याशिवाय राहणार नाहीत.

तू वर्तमानपत्रे वाचीत जा. सारे समजून घेत जा. आजकालच्या जगात चौकस झाल्याशिवाय तरणोपाय नाही.

तुम्हांला पारशी वर्षारंभाची, पटेटीची सुट्टी होती. 'नवरोज' म्हणजे नवीन दिवस. हा गंगाजमनी समास आहे. नवे हा संस्कृत शब्द. रोज हा

उर्दू, फारशी शब्द,– म्हणजे दिवस. दररोज आपण म्हणतो. दर म्हणजे प्रत्येक. नवरोजच्या दिवशी पारशी लोक मोठ्या पहाटे उठतात. फोनो लावतात. गाणी म्हणतात. फुलांची तोरणे लावतात. रांगोळी घालतात. रांगोळीचे, फुलांचे त्यांना फार वेड. पहाटेपासून फकीर, भिकारी त्यांच्या दारावरून जातील. पारशी लोक जवळ दिडक्या ठेवतात. एकेक दिडकी देत जातील. रोज एक तरी आणा धर्मादायात दवडायचा असा नेम असलेले किती तरी पारशी असतात. एक दिडकी का होईना, गरिबाचे स्मरण ठेवले, हा याचा अर्थ.

तुला एक पारशी भगिनी शिकवायला असे. पारशी शिक्षकही तुमच्या शाळेत आहेत. तू पत्रात लिहिले होतेस की, ग्यारा मास्तरांच्या घरावर एके दिवशी रात्री दगडांचा सारखा वर्षाव चोर करीत असे. खिडक्यांच्या काचा खळखळ फुटून पडत होत्या. दोघेजण घरात. लहान मुले, परंतु चोर निघून गेले. केवढा प्रसंग ! त्या वेळेस मरण डोळ्यांसमोर असते. नाना भीषण चित्रे क्षणात मनासमोर येतात. एका क्षणात युगे सामावतात. तू तुझ्या होमायाजवळ किंवा ग्यारा मास्तरांना पटेटीच्या सणाचा इतिहास विचार. सर्वांचे आपण समजून घ्यावे. कित्येक वर्षांपूर्वी मी एक पारशी प्रार्थना वाचली होती–

" देवा, जे बोलू नये ते बोललो, करू नये ते केले, मनात आणू नये ते आणले. आता कृपा कर. तुला आवडेल असे मला बोलू दे. तुला आवडणारे काम हाताने होऊ दे. तुला आवडणारे विचार मनात येऊ देत. "

छान आहे नाही प्रार्थना ! सर्व धर्मांचा आत्मा एकच आहे.


पुरे करतो आता. तू लिहिलेस, भेंडे खूप लागतात. माझी आठवण काढून खा. भेंड्याचे पूल फुकट नाही जात. फुलाला भेंडा लागायचाच. आणि आपला भुईमूग मस्त आहे ना ? माझ्या लहानपणी कोकणातही भुईमूग लोक करू लागले होते. परंतु पुढे प्रथा बंद पडली. शेंग लहान असायची. आणि मावशीने लावलेले बटाटेही सुंदर झाले आहेत म्हणून लिहिलेस. त्यांना उंदीर लागतो बरे का. जपा. मी लहानपणी कोकणात बटाटे लावले. खाली बाधले, परंतु उंदरांनी खाल्लेले.

अप्पाला पत्र पाठवायला सांग. चि. प्रिय अरुणा काय करते ?

उंबरगावास डॉ. भाऊंकडे गेला होता का ? अरुणा मग मोटरीतून हिंडली असेल. भाऊ, मोटर, पंपं, पकडे– एकेक शब्द म्हणजे तिचे वाक्य. पकडे म्हणजे कपडे, होय ना ? ताईची अर्धशिशी कशी आहे ? म्हणावे पेढे खा. नाही तर थोडा शिळा भात ठेवून त्यावर गोड दही घालून उजाडत जेव. सर्वांस प्रणाम. पपी आजारी होती. आता कशी आहे ? तिला मटार नि मक्याची कणसे मिळाली का ?

तुझा
अण्णा

साधना, १० सप्टेंबर १९४९



चि. प्रिय सुमतीस
सप्रेम आशीर्वाद

सुमती, तू वेडी आहेस. अग सुधाला लिहिलेली पत्रे तुम्हा सर्वांसाठीच होती. ती का तुला दाखवीत नव्हती ? तुम्ही एकत्र जमून ना वाचीत असा ? पुष्पा, उषा वगैरे सगळ्याजणी तुम्ही मैत्रिणी. खरे ना ? परंतु आपल्या नावे यावे असे मुलांना वाटते. नेहमी सुधाच्याच नावे काय म्हणून ? खरे आहे तुझे म्हणणे. सर्वांचे कौतुक करायला हवे. आपले नाव आले म्हणजे आनंद होतो. अग लहान अरुणा, पत्रात जर तिचे नाव असले आणि अप्पाने ते तिला वाचून दाखविले तर तीसुद्धा खुदकन हसते. दोन वर्षांची ती चिमणी मुलगी परंतु 'अरुणाला बेबे द्या' (म्हणजे बेदाणा) असे पत्रात तिला वाचून दाखवताच नाचते. हे पत्र तुझ्या नावे आहे म्हणून तूही नाचशील. आले की नाही पत्र, आले की नाही, असे म्हणून दुसऱ्या मैत्रिणींना चिडवशील. एक दिवस आम्हांलाही येईल असे त्या म्हणतील. जरा गंमत होईल.

तू सहामाही परीक्षेत पहिली आलीस, वाचून आनंद झाला. परंतु प्रकृती दणकट केलीस का ? शरीर निरोगी, कणखर हवे. लोखंडाची जशी कांब तसे हवे. सुमती, अभ्यास चांगला असावाच, परंतु इतरही गोष्टींकडे

लक्ष असावे. लोकमान्य टिळक एकदा म्हणाले : " शिष्यवृत्त्या मिळवण्यासाठी आमचा जन्म नाही." परवा माझा मित्र म्हणाला : " परीक्षेत कधी पहिल्या वर्गात मी पास झालो नाही. वडिलांना तो आनंद मी देऊ शकलो नाही." मी म्हटले : " तू परीक्षेत पहिल्या वर्गात पास नसशील झालास, परंतु जीवनाच्या परीक्षेत तू उत्तम रीतीने उत्तीर्ण झाला आहेस. त्यामुळे तुझ्या वडिलांना समाधान आहे. तुझी वृत्ती उदार आहे. तुम्ही सारे भाऊ प्रेमाने वागता. हे पाहून का वडिलांना आनंद नसेल होत ?" पुष्कळ वेळा अभ्यासाचे आपण फारच प्रस्थ माजवतो. मी अशी एक मुलगी पाहिली आहे. एरव्ही ती प्रेमळ, खेळकर, मनाची हळुवार. परंतु तिची परीक्षा आली होती जवळ. तिची वडील बहीण आपली मुले घेऊन माहेरी आलेली होती. मुले रडायची. या अभ्यासात रमणाऱ्या मुलीला ध्यायला लागायची. ती रागाने मोठ्या बहिणीस म्हणाली : " आता कशाला आलीस ? तू जा सासरी लौकर. सुट्टीत ये. मग तुझ्या मुलांना खूप खेळवीन." मी त्या मुलीला म्हटले : " कुमू, असे का म्हणावे बहिणीला ? तिला जमले तेव्हा चार दिवस ती माहेरी आली. मुले रडली तर तू त्यांना घे, उगी कर. पहाटे उठून अभ्यास कर. बहिणीच्या मनाला वाईट नाही का वाटणार ?" ती मुलगी म्हणाली : " चुकले माझे. मी ताईची क्षमा मागेन." अभ्यास, परीक्षा, यांना महत्त्व आहे. परंतु सर्वत्र मेळ हवा. प्रमाण हवे. ' प्रमाणबद्धतेत कलेचा आत्मा ' अशी एक इंग्रजी म्हण आहे. सुमती, तू हे लक्षात ठेव. सारे सांभाळून पहिली आलीस तर त्यात गोडी आहे. आईचे काम करून, सेवा दलात जाऊन, भावंडांना खेळवून पहिली आली असशील तर केवढी कृतार्थता !

तू हिंदीच्या परीक्षा दिल्यास. तुला हिंदीत बोलता येते का ? कित्येक वर्षांपूर्वी मी हिंदीच्या परीक्षा दिल्या. परंतु मला अजून बोलता येत नाही. परवा माझी फजिती झाली. एके ठिकाणी व्याख्यान द्यायला गेलो होतो. व्याख्यान झाले. परंतु तेथे जवळच राष्ट्रभाषेचे केन्द्र चालते. चालक आले व म्हणाले : " तेथे चला, दोन शब्द सांगा." पुष्कळ आढेवेढे घेऊन पाहिले, परंतु अखेर जावे लागले. पाच मिनिटे बोलो परंतु त्रेधा नि तिरपीट. एका सुफी कवीचा चरण मला आठवला. त्याच्या आधारे बोललो नि वेळ मारून नेली.

“ दिल किसीका मत दुखाव
यह तो खुदाकी मस्जीद है ”

कोणाचे हृदय दुखवू नको. हृदय ही प्रभूची मशीद. बाहेरच्या दगडी मशिदी, दगडी मंदिरे, यांना कोणी धक्का लावला तर आम्ही मारामारी करायला धावू, परंतु ही हृदयरूपी मशीद, तिला कितीदा नुकसान पोचवतो. सुरेख आहे चरण, नाही का? राष्ट्रभाषा शिकायची कशासाठी? सर्वांच्या हृदयांचे ऐक्य व्हावे म्हणून. परंतु हिंदी भाषा ज्या प्रान्तांतून चालते, तेथील लोकांना आपली भाषा सर्वत्र होणार म्हणून नसता अहंकार आज वाटत आहे. खरे म्हणजे केवढी नम्रता त्यांच्याजवळ हवी? दक्षिणेकडील द्राविडी भाषा बोलणाऱ्यांना किती जड जाणार आहे! परंतु उत्तरेकडच्या हिंदी भाषेच्या अभिमान्यांना त्याची जाणीवही नाही. अभिमान म्हणजे नाश, मरण; परंतु मोठमोठ्यांच्याही ही गोष्ट लक्षात येत नाही.

भाद्रपद महिन्याचा शुक्लपक्ष संपला. वामनद्वादशी, अनंतचतुर्दशी हे दिवस गेले. तिकडे केरळ प्रान्तात वामनद्वादशीचा मोठा सण असतो. त्याला ते ‘ओनम’ सण म्हणतात. त्या दिवशी पाताळातील बळीराजा पुन्हा पृथ्वीवर येऊन सर्वत्र ठीक आहे ना पाहून जातो, अशी तिकडे समजूत आहे. ओनमच्या दिवशी बहीण भावाला भेट पाठवते. मागे आम्ही तुरुंगात होतो. तेथे के. के. मेनन म्हणून माझे मित्र होते. त्यांच्या बहिणीने त्यांना ओनमसाठी खादीची वस्त्रे पाठविली होती. मीही खादी भांडारातून हात-रुमाल मागवून त्यांना दिला होता. निरनिराळ्या प्रान्तांत निरनिराळे सण, निरनिराळे उत्सव. भारतात विविधतेचे विपुल वैभव आहे.

आता भाद्रपद कृष्णपक्ष सुरू झाला. याला ‘पितृपक्ष’ म्हणतात. पूर्वजांचे स्मरण करायचे. या महिन्यातील अमावास्येला सर्वपित्री अमावास्या आपण म्हणतो. सर्वच पितरांचे स्मरण. मी लहान होतो तेव्हाच्या गोष्टी आठवतात. सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी वडील पहाटे उठत. अंगण सारवीत. रस्त्यापर्यंत सडा घालीत. दूर जाऊन तळ्यातील कमळे घेऊन यायचे. अगस्त्याच्या झाडाची फुले आणायचे. अगस्त्याचे फूल श्राद्धपक्षाला

मुद्दाम हवे म्हणतात. वडिलांची त्या दिवशीची कृतज्ञतेची भावना आठवून आजही मला पुण्यपावन वाटते. सुमती, कृतज्ञतेसारखी सुंदर वस्तू जगात नाही.

या कृष्णपक्षातच रेंटिया बारस. भाद्रपद वद्य द्वादशीस महात्माजींचा जन्म. गांधीजी एकदा म्हणाले : "गांधीजयंती नका म्हणू. व्यक्तीला काय महत्त्व ? तत्त्वाला महत्त्व आहे. चरकाजयंती म्हणा." रेंटिया म्हणजे चरखा. बारस म्हणजे द्वादशी. बार्शी शहर हा शब्द 'बारसा'पासूनच बनला आहे. अंबरीष राजा एकादशी व्रत करी. द्वादशीस पारणे करी. अंबरीष राजा बार्शीचा. त्याच्या भक्तीसाठी तेथे भगवान आला. तू भगवानाचे मंदिर पाहिले असशीलच.

महात्माजींचे स्मरण ठेवणे म्हणजे चरख्याचे स्मरण ठेवणे. परंतु चरखा म्हणजे तरी कशाची खूण ? चरखा ही दरिद्रनारायणाची खूण. चरख्याचे स्मरण गरिबांचे स्मरण. परंतु तेच तर आपल्या देशात दुर्मिळ आहे. ज्या समाजात गरिबांचे स्मरण नाही, तेथे मरण ओढवणार ! महाभारतात भीष्माचार्य धर्मराजाला सांगतात : "धर्मा, गरीब लोकांची आधी काळजी घे. – दरिद्रान् भर कौन्तेय." परंतु आज आपल्या देशात श्रीमंतांची, धनिकांचीच भर चालली आहे. काळाबाजार धर्म झाला. अगतिक मनुष्य अपार पैसे देतो. परवा एक मित्र म्हणाला : "मुंबईस शेंगा फोडायचे यंत्र घ्यायला गेलो. त्याची किंमत १८९० रुपये असते. परंतु दलाल म्हणाला, २८०० देत असाल तर आता देतो; नाही तर ठेवा नंबर लावून. दोन वर्षांनी मिळेल." लाकूड कापायचे यंत्र हवे होते. तेथे हीच तऱ्हा. एक डॉक्टर परवा म्हणाले : "मुदतीच्या तापावर– टायफॉइडवर रामबाण औषध निघाले आहे. तीन दिवसांत ताप हटतो. परंतु मुंबईत औषध आले नि काळ्या बाजारात गेले. ज्या बाटलीची किंमत ४६ रुपये, तिची किंमत ४०० झाली !" श्रीमंत घेतात. गरीब कोठून घेणार ? हे श्रीमंतांचे राज्य आहे. गरिबांची दैना आहे. गरिबांचा अंत पाहतील तर आगडोंब भडकल्याशिवाय राहणार नाही.

जगात आगडोंब केव्हा भडकेल नेम नाही. अमेरिकेजवळ किती अणुबॉंब आहेत त्याची मोजदाद होत आहे. सुमती, अमेरिकेत अणुबॉंब तयार करण्यासाठी जे शहर वसले आहे तेथे मध्ये स्फोट होईल वाटले, परंतु आता सावधगिरी

आहे. असा स्फोट झाला असता तर सारी अमेरिका भस्म झाली असती! अटलांटिक व पॅसिफिक महासागर एक झाले असते. अणुबॉंब जेथे पडतो, त्याच्या आसपासची जमीन जणू वितळते, जळजळीत रसमय होते. इतकी ती आग असते. लाटा आकाशाला भिडू पाहतात. जेथे अणुबॉंब तयार करतात तेथे एक अर्धा फर्लांग लांबीचा प्रचंड लोहचुंबक असतो. कित्येक टन त्याचे वजन असते. त्याच्याभोवती विद्युत तारांची भेंडोळी असतात. तेथे काम करणाऱ्यांची काय स्थिती असेल! तेथले कामगार ज्या घरांत राहतात त्यांच्या भिंती अर्धा फूट जाड शिश्याच्या पत्र्याच्या असतात. कामगारांच्या अंगावरचे कपडे वगैरे समुद्राच्या तळाशी बुडवतात. आजचे सारे विज्ञान तेथे मरणाची आयुधे तयार करीत आहेत. जर्मनीही हा शोध लावीत होता. नॉर्वे वगैरे देशांतील धबधब्याच्या पाण्यातील विद्युन्मय हैड्रोजन परमाणू त्यांना हवा होता. त्या अणूंतून ते बॉंब तयार करणार होते. जर्मनीत थोरियम, युरेनियम वगैरेंच्या खाणी नाहीत. ज्या अणुगर्भाच्या आधारावर हा बॉंब तयार करायचा, तो अणुगर्भ अत्यंत चंचल हवा. थोरियम वगैरेंचा अणू तसा असतो. एकमेकांनी एकमेकांस धक्के द्यावेत त्याप्रमाणे हा चंचल अणुगर्भ फोडला की तो दुसऱ्यास, दुसरा तिसऱ्यास अशा प्रकारे ते कोटयवधी अणू प्रचंड स्फोट निर्माण करतात. अनंत शक्ती जन्मते, जी त्रिभुवन भस्म करील. एका अणुबॉंबसाठी सहा औंस तरी युरेनियम लागतो म्हणतात. कोणी म्हणतात १२ औंस. रशियाजवळ अणुबॉंब आहे की नाही? रशियातील उरल पर्वतात युरेनियम वगैरेंच्या भरपूर खाणी आहेत. रशिया गप्प आहे. त्यानेही अणुबॉंब केले असतील. उद्या महायुद्ध आलेच तर पुराणातील दोन ब्रह्मास्त्रे सुटल्यावर पृथ्वी जळू लागली वर्णन आहे तसे व्हायचे. सारी प्रचंड शहरे जातील. संस्कृतीचा पुन्हा 'श्रीगणेशा' सुरू होईल. संस्कृतीची अशी का सदैव चाकोरी ( Eternal Circle ) सुरू राहायची?

आपण या मोठ्या प्रश्नात कशाला शिरायचे असे म्हटले तरी हे प्रश्न समोर येतात. आपले हिंदुस्थान सरकार जुनी क्रुझरे, जुन्या पाणबुड्या खरेदी करीत असते. जगातील तिसऱ्या महायुद्धात आमच्या या बाहुलीच्या खेळातील विनाशिका हास्यास्पद ठरतील! परंतु हिंदच्या प्रतिष्ठेसाठी हाही खेळ थोडा हवा. पाकिस्तानापेक्षा थोडी लष्करी तयारी अधिक ठेवावी लागेल.

जाऊ दे या मारणमरणाच्या गोष्टी. मी फुलात रमणारा. तुला माहीतच आहे. पावसाळी फुलांचा हंगाम संपत आला. आता कमळाचे दिवस. झेंडूचे दिवस. कोरांटाच्या आता फुलू लागतील. आमच्या गावातील तळ्यातून निरनिराळी कमळे आहेत. लाल कमळे आहेत, आणि शुभ्र कमळे आहेत, आणि निळसर पाकळ्या असणारी ती लहान कमळे आहेत. सकाळच्या वेळी ही कमळे सूर्याला प्रणाम करीत असतात. पाण्यातून माना वर काढून बघत असतात. कमळ हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे; ते पाण्यात चिखलात पाय रोवून तपश्चर्या करते, प्रकाशासाठी तहानलेले असते. हृदय मधाने भरलेले. भुंगे गूं गूं त्याच्याभोवती करतात. मागच्या वर्षी अक्का कोरांटाकीच्या फुलांचा लक्ष वाहात होती. आम्ही पहाटे जात असू. थंडी पडू लागते हळूहळू. फुले नीट फुललेली नसतात. काढताना तुटायची. जणू आईच्या उबेपासून दूर व्हायला ती तयार नसत. कोरांटाकीचेही किती प्रकार! निळ्या कोरांटाकीला अधिक काटे असतात. कोरांटाकीचे काटे अणकुचीदार असतात. अंगणातील भेंडीच्या झाडालाही पिवळी डेरेदार फुले किती येत. आता त्यांची चकतीसारखी टपोरी फळे होतील. त्या फळांचा लहानपणी आम्ही पिवळा रंग करीत असू. सृष्टीत मौज आहे, आनंद आहे, रंग, गंध आहे, प्रकाश आहे. तिकडेच दृष्टी द्यावी नि आनंदात राहावे.

सुमती, परवा कोठे वाचले ते आठवत नाही. मुलांची गंमत होती. एक मुलगा आपल्या वडिलांना म्हणाला : " सारे मोठे लोक नेमके सुटीच्या दिवशी कसे मेले? ते निराळ्या दिवशी मरते तर आणखी सुट्या मिळाल्या असत्या. सुटीच्या दिवशी मरून यांनी आमच्या सुट्या बुडविल्या." यातील विनोद आला का तुझ्या लक्षात?

पुरे आता हे पत्र. शेजारी मांजरीची पिले गडबड करीत आहेत येथील दौतीवर. पत्र पुरे करून त्यांचीच गंमत बघतो जरा. सर्वांना स. प्र. लहानांस स. आ.

तुझा

साधना, १७ सप्टेंबर १९४९ अण्णा



चि. प्रिय सुमतीस
सप्रेम आशीर्वाद

तुझे पत्र पोचले. तुझ्या डोळ्याला एकाएकी काय झाले? वेळीच जप. थंड पाण्याने रोज चारपाचदा धूत जा. डोळे नाहीत म्हणजे काही नाही. मनुष्याला डोळा सर्वांत अधिक महत्त्वाचा वाटतो. त्याच्या अंगावर एकदम धावून गेलो तर तो आधी डोळा मिटतो, खरे ना? माझे पत्र वाचून तर डोळा नाही ना बिघडला!

आता तुमच्याकडे नवरात्राची गर्दी असेल. अनेक ठिकाणी शारदोत्सव सुरू झाले आहेत. तुझ्या शाळेत असा उत्सव वगैरे आहे का? आश्विनाचा पहिला दिवस. त्या दिवशी मातामहश्राद्ध करायचे असते. आजोळचा ओढा मला तरी लहानपणी फार होता. आईची आई माझ्यासाठी नैवेद्याची लोणीसाखर ठेवून द्यायची. दुधाणीची खरवड शिंपीत माझ्यासाठी ठेवायची. आजोबांचाही मी आवडता होतो. आजी, आजोबा, आई गेल्यावरही होती. आश्विनाचा पहिला दिवस आला म्हणजे मला त्यांची आठवण येते. डोळ्यांतील कृतज्ञतेच्या अश्रूंनी मी त्यांचे श्राद्ध करतो.

नवरात्रात अंबा घटी बसते. गावातील देवीच्या देवळात गहू पेरतात. दहा दिवस ते पेरलेले धान्य वाढते. दहाव्या दिवशी, दसऱ्याच्या दिवशी ते अंकुर पागोट्यात, रुमालात लोक खोवतात. नवीन अंकुर पवित्र आहे.

दररोज फुलांची माळ देवीवर बांधायची. नऊ दिवसांच्या नऊ माळा. आम्ही लहानपणी रात्री अंबाबाईच्या नऊ दिवसांच्या वर्णनाची ती आरती म्हणायचे. आमच्या शेजारी भिमाताई राहत असे. तिचे वामन, भास्कर मुलगे माझे मित्र. त्यांचे वडील गोविंद भटजी. त्यांची मला आठवण येते. जवळच्या वाडीवरच्या मुलांना ते शिकवायचे. कोणाकडे सत्यनारायणाची पूजा सांगायला जायचे. रानातल्या नाना प्रकारच्या भाज्या आणायचे. झाडावरून पडल्यामुळे त्यांचा पाय अधू झाला होता. तरी डोंगर चढत. त्यांना भीती माहीत नव्हती, आणि किती साधे. घरी गरीबी. ओल्या मिरचीबरोबर जेवायचे. परंतु सदैव समाधान तोंडावर. त्यांना औषधाची किती माहिती! एकदा लहानपणी माझ्या डोळ्यांत आगपेण झाली होती. गोविंदकाकांनी एक मुळी आणून दिली. ती उगाळून मी लावीत असे. आगपेण बरी झाली. मला त्या समाधानी सज्जनाची मधून मधून आठवण येते.

सुमती, आता जोगवा मागायला मुलेमुली येतील. हातात लहान वाटी. तांदूळ मागायचे. काखेतील झोळीत ते ओतायचे. झेंडूची फुले ही मुले तोडतील. मुली केसांत घालतील, मुले कानांत ठेवतील. जोगव्याच्या वाटीतही फुले ठेवतात. निरनिराळ्या देवींची नावे घेऊन जोगवा मागायचा. ती एक मौज असते.

आश्विनातील हे जे नवरात्र, त्याचा इतिहास आहे. देवी राक्षसांबरोबर नऊ दिवस लढत होती. महिषासुरमर्दिनी लढत होती. ती सर्वांचा निःपात करते. शुंभ, निशुंभ इत्यादी दैत्यांना ठार करते. नऊ दिवस युद्ध करून दहाव्या दिवशी ती विजयी होते, म्हणून दशमीला आपण विजयादशमी म्हणतो.

पुण्याला जोगेश्वरीला, अष्टभुजा देवीला नवरात्र रोज निरनिराळ्या वाहनांवर बसवतात. आज सिंहावर तर उद्या वाघावर, कधी मोरावर, तर कधी हत्तीवर. कधी केळीच्या आतील पांढऱ्या सोपांचे सुंदर मखर करतात. दुरून जणू ते हस्तिदंती दिसते. लहानपणी पुण्यास असताना रात्रीच्या वेळी

मी ती वाहने बघायला जायचा. मनस्वी गर्दी असायची. बंगालमध्ये या दिवसांना पूजा-दिवस म्हणतात. बंगाली लोकांचा हा सर्वांत मोठा सण. या वेळेस ते एकमेकांना भेटी देतात, मुंबईचे बंगाली लोक एकत्र जमतात, देवी बसवतात. तेथे खेळ करतात. बंगालमध्ये या दिवसांत देवीला लाखो कोकरांचे बळी देण्यात येतात. कालीमातेच्या पूजेचे हे दिवस. कालीच्या हातात माणसाचे मुंडके आहे. भयानक रूप. परंतु विवेकानंदांनी ‘ कालीमाता ’ म्हणून सुरेख पुस्तक लिहिले आहे. जीवन देणारा परमेश्वरच, मरण देणारा परमेश्वरच. ईश्वराची दोन्ही रूपांत पूजा करायला शिकले पाहिजे. खाऊ देणारी आई नि छडी मारणारी आई – दोन्ही रूपे त्या एकाच प्रेममयीची.

देवदेवतांसमोर पशुपक्ष्यांना बळी देणे बंद व्हायला हवे. दसऱ्याच्या दिवशी कोठे कोठे रेड्याला ठार करतात. त्याचे हाल बघवत नाहीत. देव का रक्ताला तहानलेला आहे ? परंतु मनुष्य जोवर मांसमच्छर खात आहे तोवर देवाला तो त्याचाच नैवेद्य दाखवणार ! नाशिकच्या सतशृंगी देवासाठी कड्यावरून बकरी खाली फेकतात. खरोखरच ही निर्दयता आहे. कलकत्त्यास काली-मातेच्या देवळात निष्पाप कोकरांची या पूजादिवसांत इतकी हत्या होते की रक्ताचे पाट वाहतात. मला या प्रकाराची कल्पनाच सहन होत नाही.

दसऱ्याच्या दिवशी गंमत. नाही का ? रामाने रावणाला याच दिवशी मारले असे म्हणतात. मनावर विजय मिळविणाऱ्या भगवान बुद्धांचा याच दिवशी जन्म, आणि आपले जयप्रकाश. त्यांचाही जन्म विजयादशमीच्याच दिवशी, म्हणून तर जयप्रकाश त्यांचे नाव. आणि किती अन्वर्थक नाव ! समाजवादाचा जयजयकार करीत दीनदरिद्री जीवनात ते प्रकाश आणीत आहेत, खरे ना ? तुझ्याजवळ जयप्रकाशांची ती सुंदर तसबीर आहे ना ?

दसऱ्याच्या दिवशी आपण सोने लुटतो. दंतकथा अशी आहे की, वरतंतू नावाचे एक ऋषी होते. त्यांचा कौत्स नावाचा शिष्य होता. विद्या संपल्यावर तो गुरूला म्हणाला : “ दक्षिणा काय देऊ ? ” गुरू म्हणाले : “ काही नको. शिकलेल्या विद्येचा नीट उपयोग कर म्हणजे झाले ! ” परंतु कौत्स म्हणाला : “ काही तरी मागाच. ” गुरू रागावून म्हणाले : “ चौदा कोटी सोन्याची नाणी दे. ” तेव्हा कौत्स रघु राजाकडे जातो व पैसे दे म्हणतो. रघु राजाने

नुकताच विश्वजित यज्ञ केलेला होता. त्याने सारी संपत्ती देऊन टाकली होती. जवळ फक्त मातीचे एक भांडे होते. परंतु अतिथीला विमुख कसे दवडायचे ! तो कुबेराचा खजिना लुटण्याचे योजतो. परंतु आकाशातून सोन्याचा पाऊस पडतो. रघु कौत्साला म्हणतो : "हवे असेल तेवढे ने." जो तो एकमेकास सोने देऊ लागला. ती प्रथा आपण या विजयादशमीस पाळतो. आज सोने तर नाही. आपण आपट्याच्या पानाला सोने म्हणतो. त्या झाडाच्या शेंगेला सोन्याची लगड म्हणतो. ती लगड मिळावी म्हणून लहानपणी आम्ही झोंबाझोंबी करीत असू.

सुमती, आमच्या गावी एक सुंदर प्रथा आहे. ज्यांच्या घरचे वर्षात कोणी मेले असेल त्यांच्या घरी गावातील वडील मंडळी या दिवशी जातात. त्याला बरोबर घेऊन शिलंगणास– सीमोल्लंघनास– जायचे. त्यांच्या घरचे मेले असेल तरी आम्ही सर्व तुझेच आहोत असे जणू सांगायचे. गावाबाहेर आपट्याच्या झाडाचे सोने रचून ठेवलेले असते. किंवा सीमेवर आपट्याचे झाड असले तर तेथे कोणी वर चढतो नि तोडतो. खाली मग झोंबाझोंबी होते. सोने हातात घेऊन गावभर जायचे. वडील मंडळीला द्यायचे. गुरुजनांना द्यायचे. देवळात जाऊन देवाला वाहायचे. घरी आल्यावर बहीण पायांवर कढत पाणी घालते. ओवाळते. ती सोन्याची लगड ताम्हनात टाकायची. विजयादशमीस लहानांनी वडिलांना सोने द्यायचे आणि संक्रान्तीस मोठ्यांनी मुलांना तिळगूळ द्यायचा.

दसऱ्याच्या दिवशी लहान मुलांना शाळेत घालतात. त्याला पाटीवर बसविणे म्हणतात. पाटीपुस्तकांची पूजा करायची. विजयादशमीला ज्याने त्याने आपुल्या कर्मसाधनांची पूजा करायची. क्षत्रिय आयुधांची पूजा करील. पंडित पुस्तकांची पूजा करील. शेतकरी नांगराची, वाणी तराजूची, चांभार आरीची करील. न्हावीदादा धोगटीची करील. मोटर ड्रायव्हर मोटर झेंडूच्या फुलांनी सजवील. सायकलचा दुकानदार सायकलींना माळ घालील. भावार्थ इतकाच की, तुमच्या सेवेचो ती ती साधने पवित्र आहेत. ती स्वच्छ ठेवा. त्यांची काळजी घ्या. ती सेवासाधने म्हणजे जणू ईश्वराचे रूप. अर्जुन आपल्या गांडीव धनुष्याची निंदा सहन करीत नसे. कारण त्याच्या सेवेचे ते साधन होते.

आपण सेवासाधनांना पाय नाही लावीत. पाटीपुस्तकाला पाय लागला तर आपण नमस्कार करतो. चूल, केरसुणी, जांते यांना पाय लागला तर आपण नमस्कार करतो. यातील भावना हीच.

विजयादशमीच्या दिवशी आम्ही मुले फिटुक नळी करीत असू. बारीक बांबूची पोकळ नळी आणि त्रिसळीच्या झाडांची ती बोराएवढाली बारीक फळे. ती या नळीतून उडवायची. एक दांडा करायचा. त्याने ती फळे नळीतून उडवायची. केवढा आवाज होतो! जणू खेळातील बंदूक. त्रिसळीच्या झाडाला त्रिसळांचे घडच्या घड असतात. ते पाडून आम्ही खिसे भरून घेत असू. या फळांचा मिरमिर लागतो. एखादे वेळेस आम्ही मुले लुटूपुटीची लढाईही खेळायचे. माझ्या वर्गात माधव बामणे होता. त्याने मला त्रिसळ मारले. मी कळवळलो होतो.

आश्विन महिना म्हणजे शरद ऋतूचा आरंभ. पाऊस संपतो. नद्यांचे पाणी स्वच्छ होते. धनधान्यसंपन्न दिसते. यंदा पाऊस बरा पडल्यामुळे शेते इकडे तरी बरी आहेत. भाते पसवत आहेत. पसवण्याआधी भाते वाऱ्यावर डोलतात तेव्हा जणू हिरव्या लाटा उसळत आहेत असे वाटते. एका बंगाली कवीने वर्णिले : " मी शेतात गेलो. तेथे लाटांचा नाच पाहिला ! " लोक खरेच बघायला गेले. त्यांना लाटा दिसत ना. तो कवी म्हणाला : " पाण्याच्या लाटा नव्हेत. या हिरव्यागार भाताच्या लाटा ! " असे हे भात आता पसवते. त्या कोंवळ्या लोंबी बाहेर पडतात. भराभरा, भराभरा पिकू लागतात. वरीच्या त्या लोंबी किती सुंदर दिसतात ! आणि नाचणी तर तयारही झाली. नागाच्या फणीसारखी नाचणीची कणसे. कोकणात नाचणीचा हुरडा करतात. नाचणीची कणसे भाजून चोळून खातात. आणि ती तिळाची शेते, पिवळी पिवळी ती फुले. आता त्यांच्यातही दाणा भरतो. वाऱ्यावर तिळाची शेते नाचतात. खुळखुळा वाजवावा तसा आवाज होतो.

कोवळ्या काकड्या आता संपतात. आता मोठमोठ्या जून काकड्या. कोकणात त्यांना तंवसे म्हणतात. सुमती, परवा रात्री कोल्हे आले आणि कडल्यातील काकड्या, चिबूड त्यांनी खाल्ले. सकाळी पाहतो तो काकड्या फोडलेल्या ! कोल्हा काकडीला राजी ही म्हणच आहे. बराबाहेर भोपळे लागले आहेत.

भोपळीचे वेल घरावर जातात. तेथे भोपळे धरतात. घरात काढून ठेवू आता. शिमग्यापर्यंत ते टिकतील. शिमग्याचा ढोल वाजला म्हणजे मग ते टिकत नाहीत.

आता शेजारचे बाळतात्या लौकरच अळू खणतील. त्यांचे कांदे काढून विहिरीजवळ, किंवा टोपलीत माती घालून त्यात ते लावतील. अळवाच्या कांद्याला खाली अळकुंड्या लागतात. निखाऱ्यात भाजून सोलून खायच्या किंवा उकडून दही घालून भाजी करतात. अळकुंड्या म्हणजे माझा जणू प्राण! कोकणातील जणू हे बटाटे !

आता शारदीय फुलांचा बहर. पारिजातक संपुष्टात आले. आता शेवंतीचा – त्या पिवळ्या राणीचा – गाजावाजा. आमच्या शेजारी दत्तोपंत खरे आहेत. त्यांच्या अंगणातील कमानीवर चित्रंगीचे वेल आहेत. चित्रंगीचे ते जाईच्या फुलासारखे नाजूक फूल! मला ती फुले फार आवडतात. आणि रानात गेल्यावर रानभेंडी जिकडे तिकडे फुललेल्या दिसतात. शेतात बांधावरून कुरडू दिसतील. कुरडूचे फूल सुकले तरी सुंदर दिसते. आश्विनी पौर्णिमेला कोकणात घरोघर 'नवे' बांधतात. घरातील दारांच्या कडीकोयंड्यांनासुद्धा आंब्याच्या पानात नाचणी, वरी, भात याच्या लोंबी बांधून बांधतात. तो धान्याचा महिना आहे. ओटीवरच्या मुख्य दारावर जे 'नवे' बांधतात ते काही काही लोक किती कलात्मक रीतीने करतात. धान्याच्या लोंबी, झेंडू, कुरडू एकत्र गुंफून ते करतात. मधून बेगड, रंगीत कागद कातरून लावतात. ते 'नवे' बघत राहावे असे वाटते.

रानात शेकडो प्रकारची फुले दिसतात. रानशेवंतीची पिवळी एकेरी फुले ठायी ठायी दिसून डोळ्यांना आल्हाद होतो. सृष्टिदेवता हळदकुंकू लुटीत आहे असे वाटते. आणि छोटी छोटी निळी कृष्णवर्णाची फुले बांधावर दिसतात. पुढे भाते कापल्यावर ही फुले शेतात अनेक ठिकाणी दिसतात. पृथ्वीवरचे दुःख पाहून तारे रडतात. त्या अश्रूंची फुले होतात, असे आजी आम्हांस सांगायची. तरवडाची छोटी छोटी झाडे पिवळ्या फुलांचे गुच्छ हातात घेऊन आम्हांस सांगायची. तरवडाची छोटी छोटी झाडे पिवळ्या फुलांचे गुच्छ हातात घेऊन डोलत डोलत असतात. त्यांच्या काडीने दात स्वच्छ करतात. पाला सुजलेल्या

अवयवांवर बांधतात. सृष्टीतील अनंत वनस्पतींचे ज्ञान करून घेण्यात केवढी कृतार्थता आहे !

चिंचा आता जून झाल्या आहेत. लहान विळ्यांप्रमाणे झाडावर डोलत आहेत. तुळशीच्या लग्नाच्या आधी चिंचा, आवळे खायचे नाहीत. परंतु आम्ही लहानपणी भाद्रपद महिन्यापासूनच आरंभ करीत असू कोवळ्या चिंचा खायला. चिंचेला इंग्रजीत टॅमरिन्ड शब्द आहे. हा अरबी शब्द आहे. तमर - इ - हिंद म्हणजे हिंदुस्थानातला खजूर. तमर म्हणजे खजूर. या चिंचा त्यांना खजूर वाटल्या. शब्दांचे हे असे अर्थ बघणे मोठे गंमतीचे असते.

सुमती, आमच्या गावातील काही काही आवळीच्या झाडांवर केवढाले आवळे असतात ! मोठ्या रोठ्या सुपारीएवढाले आवळे. मुरावळा त्यांचाच घालतात. ठेचा वाळवून बरणीत भरून ठेवतात. हवा लागली नाही तर तो चुरचुरीत लागतो. माझा भाऊ त्याला चुरचुरी म्हणायचा. तोंडाला रुची नसली तर चिमटी तोंडात टाकावी. थोडे तिखटमीठ लावून आवळ्याच्या वड्या करतात. बोटीतून प्रवास करताना या बरोबर घ्यावयाच्या. बोट लागेल, वान्ती येईल असे वाटले तर वडीचा तुकडा खायचा. आवळा म्हणजे निम्मे अमृत असे म्हणतात.

शरद् ऋतू म्हणजे प्रसन्नतेचा काळ. शेते-भाते पिकत असतात. नद्या शान्त वहात असतात. आकाश निरभ्र होते. रात्री स्वच्छ चांदणे पडते. अशा या रमणीय काळातच कृष्ण वेणू वाजवी. सर्व गोकुळाला वेड लावी. शरद् ऋतूतच कमळे. शरद् ऋतूतच फुलपाखरे. हजारो- लाखो सर्वत्र बागडताना दिसतील. देवावरचे जणू रंगीबेरंगी लखोटे. ही फुलपाखरे त्या त्या फुलांना का संदेश पोचवीत असतात ? आणि फुलांवर ती हळूच बसतात. प्रथम ती चिमणे पंख जरा हालवतात. परंतु पुढे अगदी मिटून घेतात. जणू त्यांची समाधी लागते. अशाच वेळेस मुले त्यांना पकडतात. आणि ते चतुर ! जणू परींची छोटी विमानेच ! त्यांचे पंख कसे पारदर्शक असतात. लहान मुले चतुरांना पकडतात, त्यांना दोरा बांधतात नि सोडून देतात. परंतु या लहान प्राण्यांना, सृष्टीतील या मुक्या सजीव खेळण्यांना त्रास देणे बरे नाही.


परवा सकाळी झाडावर दूर बगळे बसलेले पाहिले. हिरव्या हिरव्या झाडांवर ते पांढरे जणू गुच्छ ! किती सुंदर दिसत होते ते दृश्य ! एखादे वेळेस सायंकाळी निळ्या आकाशातून हे बगळे रांगेने जात असतात. जणू आकाशात कोणी रांगोळी काढीत आहे, आकाशाच्या निळ्या फळ्यावर पांढरी रेघ ओढीत आहे, असे वाटते. बगळा दिसतो ढवळा, परंतु आत काळा ! ध्यानस्थ बसेल नि पटकन मासा मटकावील. पंपा सरोवरावर रामलक्ष्मण येतात. राम म्हणतो : " लक्ष्मणा, ते बघ धर्मनिष्ठ बगळे ! "

" पश्य लक्ष्मण पंपायाम्
बकाः परमधार्मिकाः " ॥

पुरे. आता पत्र फार लांबले. तू डोळ्यांना जप. आनंदी असा. तुझ्या सर्व मैत्रिणींना नमस्ते.

तुझा
अण्णा

साधना, १ ऑक्टोबर १९४९



चि. प्रिय पुष्पास
सप्रेम आशीर्वाद

पुष्पा, सुमतीला दोन पत्रे लिहिली. आजचे तुला. तुमची सुधा फुरंगटून बसेल ना, असे सुमतीने लिहिले. परंतु सुधा सर्वांच्या आनंदात आनंद मानणारी आहे. फुलांवर प्रेम करणारी सुधा फुलांप्रमाणे कोमल नि प्रेमळ हृदयाची आहे. आणि कोणाच्या नावाने पत्र लिहिले तरी सर्वांना वाचायला मिळते ही मुख्य गोष्ट ती जाणते.

सहामाही परीक्षा जवळ आली असे तू लिहिलेस. नेहमी नियमित अभ्यास करणाऱ्याला परीक्षा कधीही जड वाटत नाही. परीक्षेचा कधीही बाऊ वाटता कामा नये, परीक्षेची नेहमी तयारी हवी.

मी मागच्या पत्रात पिके बरी आहेत म्हणून लिहिले. परंतु परवाचा अपरंपार पाऊस. त्यामुळे इकडे तरी नुकसान झाले आहे. भातावर कीडही पडली आहे. खानदेशाच्या बाजूलाही हातातोंडा आलेले बरेचसे पीक गेले म्हणतात. काही ठिकाणी पिकांना फायदा झाला. पर्जन्यवृष्टी अप्रत्यक्षपणे आशीर्वादरूप ठरली. गुजरातमध्ये पाऊस फायदेशीर झाला असे म्हणतात. सातारा–कोल्हापूरकडेही लोक खूष आहेत म्हणतात. कोठे तरी धान्य पिको.

अधिक धान्य पिकवायच्या वेळेस निदान कमी तरी न पिको. परंतु या गोष्टी आपल्या हातात नाहीत. येईल त्या परिस्थितीतूनही फायदा करून घ्यायला शिकले पाहिजे. शेतांना ओल अधिक राहील. वाल वगैरे कडधान्ये पेरावीत, विहिरींना पाणीही बरेच दिवस पुरेल.

पाऊस ओसरला. मी परवा बाहेर पडलो. सृष्टी धुतल्यासारखी दिसत होती. नद्यानाले पुन्हा खळखळ वहात होते. पाणी पुन्हा स्वच्छ झाले होते. आणि चरायला नेलेल्या म्हशी पाण्यात बसल्या होत्या. तोंडे तेवढी वर ठेवून रवंथ करीत होत्या. एकमेकींच्या अंगावर माना ठेवीत होत्या. जणू त्या सुखावल्या होत्या. म्हशींना पाऊसपाणी फार प्रिय. लठ्ठ प्राण्यांना पाण्याशिवाय जगवत नाही. हत्तींनाही जलक्रीडा फार आवडते. वरून पाऊस पडत असावा, म्हशी सुखाने चरत असतात. त्यांच्या त्या तुळतुळीत काळसर पाठी आकाशातील काळ्या ढगांसारख्याच दिसतात. मृच्छकटिक नाटकात ' हा मेघ आर्द्रमहिषोदर-तुल्य काळा ' असे सुंदर वर्णन आहे. मृच्छकटिक नाटकाचा कर्ता पावसाचा भक्त असावा ! चारुदत्त व वसंतसेना पावसातून जातात. मोठा सुंदर प्रसंग. वरून देवाघरची वृष्टी. हृदयाकाशातून प्रेमाची वृष्टी !

मी काल पहाटे फिरायला गेलो होतो. कृत्तिकांचा, द्राक्षांच्या घडासारखा सुंदर पुंजका दिसत होता. कार्तिक स्नान करणारे हे नक्षत्र दिसत आहे तोच थंड पाण्याने आंघोळ करतात. आश्विनाच्या वद्य प्रतिपदेपासून कार्तिक स्नानास आरंभ करतात. लहानपणी आई मला उठवी. मी विहिरीवर जाऊन स्नान करायचा. ते सारे आठवले.

अपार धुके पडले होते. उंच गवतामधून मी जात होतो. अंगावरचे सारे कपडे ओले होते. दवाने भिजलेले गवत मलाही आर्द्र करीत होते. समोरचे दिसत नव्हते काही. दव पडू लागले म्हणजे पाऊस गेला असे म्हणतात. कोळी गवतातून किंवा कुंपणातून जाळी विणतात. सूर्यप्रकाशात ही जाळी हिऱ्या-माणकांप्रमाणे चमकतात. जणू परींची सोनेरी रुपेरी मंदिरे. आणि या जाळ्यात अनेक जीवजंतू अडकतात. कोळी मेजवानी करतो !

सुरवंटाचेही हेच दिवस. कोणी कोणी त्यांना घुले म्हणतात. जणू आकाशा-तून दोरीच्या साहाय्याने ते येतात. छत्रीच्या साहाय्याने विमानातून उडी

टाकणारे जणू सैनिक ! हे घुले किती प्रकारचे. ते पांढरे, लांब घुले. ते काळे, जाडसर. मधून मधून केसाच्या आतील लालसर अंग चमकत असते. घुला अंगाला लागला तर अपार कंड सुटते.

अग, परवा शेजारचा मधू लहान भावंडांसाठी त्या भिंगऱ्या काढायला गेला. तेथे कुयले होते. खाजकुयल्याची आग असह्य असते. मधूच्या अंगाला ते कुयले लागले. तो रडकुंडीस आला. कुठल्या भिंगऱ्या नि काय ?

मला भाऊंची आज सकाळी आठवण झाली. ते असेच लौकर उठून फिरायला जायचे, शेतावर जायचे. येताना फुले, भाजी घेऊन यायचे. थंडी पडली होती. गवतातून ते जात होते. त्यांना वाटले, आपला कशावर तरी पाय पडला. सापबीप तर नव्हता ना, त्यांच्या मनात आले. ते मागे वळले. तो वेटोळे करून साप पडलेला होता. तोही जणू गारठून गेला होता. आपल्यावर पाय पडला हेही त्याला कळले नाही की पाय पडल्यामुळे त्याला जरा ऊब मिळाली ! वडील वेगाने पुढे निघून गेले.

मी एकदा गोष्ट वाचली होती. अमेरिकेत कधी पडली नव्हती अशी थंडी पडली होती. घराबाहेर कोणी फिरकू शकत नव्हता. बिचारी पाखरे, ती लाखो मरण पावली. त्या एका गावात एक पक्षी उरला नाही. थंडी गेली. पुन्हा सूर्य उगवला. लोक नाचत आनंदाने बाहेर आले. मुले उड्या मारू लागली. परंतु पाखरे कोठे दिसेनात. इतक्यात एका घराच्या पाख्याखालून दोन पक्षी हळूच बाहेर पडले. एका मोठ्या पक्ष्याच्या पंखात लहान पक्षी बसला होता. दोघांना ऊब होती. दोघे जगले. ती दोन पाखरे बाहेर सूर्यकिरणात पंख फडफडवीत येताच हजारो लोकांनी आनंदाने टाळ्या पिटल्या. तो प्रेमधर्माचा विजय होता.

पुष्पा, पशुपक्षीही जीवनात प्रेम दाखवतात. परंतु माणसात ते का बरे दिसू नये ? तूच पत्रात लिहिलेस की, बाजारात साखर नाही म्हणून. अकस्मात साखर कोठे गेली ? मी एका गावी गेलो. तेथे दोन रुपये शेर विकीत होते. दसरादिवाळीचे हे दिवस. अपरंपार फायदा व्यापारी मिळवणार. यांना का बंधुभाव नाही ! गरीब जनतेचा गोड घासही यांना बघवत नाही. पंडित जवाहरलाल नेहरूंनी पुन्हा पुन्हा सांगितले की, व्यापाऱ्यांनी किंमती

वाढवू नये. अमेरिकेतून जी औषधे आधीच आलेली आहेत, त्यांच्या किंमती वाढवू नका. परंतु महात्माजींना दिलेला शब्दही ज्यांनी पाळला नाही, ते का पंडितजींचा पाळणार ? काही काही दुकानदार रुपया घेऊन तेरा आण्याचा माल हातात ठेवतात. म्हणतात, रुपयाचा भाव घटला ! म्हणजे का येथेही घटला ? जनतेची पिळवणूक करणे हाच यांचा धर्म झाला आहे ! शंभराची नोट घेतात नि ७० रुपये चक्क हातावर ठेवतात. अशा हकीगती कानांवर येत आहेत. हिंदी व्यापारी मानवतेचा कायदा पाळणार नसतील, तर या देशाच्या नशिबी काय वाढून ठेवले असेल सांगता येत नाही.

उद्या कोजागिरी ! तुम्ही रात्री खेळाल, मिळाले तर थोडे दूध प्याल. साखर नाहीच मिळणार. तरीही आनंद माना. शरद ऋतूतील स्वच्छ पिठासारखे चांदणे. शंकर पार्वतीनाही खेळत बसावे असे वाटले. मग तुम्हांआम्हांला, किती वाटेल ! लहानपणी आमच्या गावात गंगूअप्पांकडे बैठक असायची. तेथे गावातील लोक सोंगट्या खेळायचे. तीन फाश्यांचे दान, ते आम्हा मुलांना कळत नसे. मुले नुसते फासे टाकीत. पोबारा तेरा, बाकडे चौदा— नाना प्रकार. आणि नरसूअण्णा एकदम 'बंद' म्हणून ओरडत. विरुद्ध बाजूला दान पडू नये म्हणून. आम्हांला गंमत वाटे. बैठ्या खेळाचा कंटाळा येऊन आम्ही मुले चांदण्यात धावऱ्याने, छप्पा पाणी वगैरे खेळ खेळायला जात असू. आम्हा मुलांना दूध प्यायला बोलावीत.

कोजागिरीच्या दिवशी भाग्यदेवता "कोण जागा आहे, कोण जागा आहे" असे बवत बरोबर हिंडते. जो जागा असतो त्यालाच भाग्य मिळते.

"जो जागत है वो पावत है"

गीताईत म्हटले आहे : "दक्ष तो मोक्ष मेळवी." आपण आहोत का जागरूक ? सारे सत्याच्या नि सहकार्याच्या मार्गाने जात आहेत ना ?

किती विचार मनात येतात. परंतु शेवटी स्वतःच्या जीवनाशी येऊन आपण थडकतो. तुझे जीवन हे तुझे शेत. तेथे सद्‌गुणांचे, सत्कर्मांचे सोने पिकव. तू तुझ्या जीवनाची पणती लहानशी असली तरी मंगल प्रकाशाने तेवत ठेव.

शेवंतीला बहर आला आहे. आणि सोनटक्क्यांची पांढरी व पिवळी फुले फुलत आहेत, त्यांचा वास किती गोड असतो! पांढऱ्यापेक्षा पिवळ्याला अधिक वास असतो. फार नाजुक फूल. जरा हातात धरले तर हाताच्या उष्णतेने कोमेजू लागते. बायकांच्या ओव्यांत लहान मुलाला सोनटक्क्याच्या फुलाची उपमा दिलेली आहे :

कोणे दृष्टी केली तान्हुल्या सोनटक्क्या।
सैल झाल्या बिंदूली मनगट्या ॥

गुलाब आता नव्याने फुटू लागले आहेत. थंडीत त्यांना बहर येईल. थंडीत कसे हळूहळू गुलाबाचे फूल फुलत असते! कोरांटाक्यांना आता हळूहळू बहर येईल. देवळात काकडआरती आता सुरू होईल. मी लहानपणी रोज जायचा. विठोबाच्या देवळात ते म्हातारे त्रिंबकअण्णा भल्या पहाटे यायचे. त्यांची ढोलकी वाजली की आजी उठे, मला उठवी आणि करमरकरांची आजी विठोबाच्या पूजेला यायची. किती फुले, किती माळा! किती मनापासून ती आरती ओवाळायची. आम्हा मुलांना अनारसे, दहीपोहे प्रसाद मिळायचा. आज आता ते काही उरले नाही. लहानपणच्या त्या भक्तिभावाचा माझ्या जीवनावर काहीच का परिणाम झाला नसेल? लहानपणी देवळात म्हटलेले अभंग अजून आठवतात :

येई गा तू येई गा तू
पंढरीच्या राया

हा चरण कानांत घुमत आहे. परंपरेचे स्वरूप बदलेल. व्रते बदलतील. परंतु त्यातून राष्ट्रीय चारित्र्य सतत बढत राहिले पाहिजे. आज देशाला सोन्यापेक्षा, डॉलरांपेक्षा चारित्र्याची जरूर आहे. शेक्सपिअर कवीने म्हटले आहे : “जो माझे पैसे चोरतो तो कचरा नेतो; परंतु माझे चारित्र्य कोणी चोरले तर त्याने सारे काही नेले असे होईल.” ज्या देशात लोकमान्य, महात्माजी, रवीन्द्रनाथ, मदन मोहन मालवीय अशी नररत्ने झाली त्या देशात आज काळाबाजार का? लाचलुचपती का? सत्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या भारतात सत्याचा अस्त का

व्हावा ? सद्‌गुण असतील तर वैभव. लक्ष्मी चंचल नाही, मनुष्य चंचल आहे. जेथे गुण असतील तेथे भाग्य येईल. आपल्या देशात सामाजिक जीवनाची आज जाणीव नाही. म्हणजेच धर्म नाही. सर्वांच्या धारणेचा जेथे विचार होतो, तेथे धर्म आहे असे म्हणावे.

पुष्पा, परवा कणगरे खणली. काही काही कणगरे मनगटाएवढाली आहेत. हळदही मस्त आहे. हळदीच्या पानांवर दसऱ्याला पातोळे केले होते. हळद खणायला अवकाश आहे. पोहे कुटताना हळदीची पाने त्यात कुटतात. सुंदर वास लागतो पोह्यांना. हळदीची पाने कर्दळीच्या पानांसारखी दिसतात. सातारा, कोल्हापूरकडे हळदीची शेते असतात. मधून केळी लागतात.

खरेच, अग लहान सोनी परवा त्या बारीक पोकळी नळीवर कर्दळीचे मणी उडवीत होती. बारीक नळी घ्यायची, वर मणी ठेवायचा, फुंकर घालून नाचवायचा. गुलबक्षीचा मणीही नाचवता येतो. भाद्रपदात गुलबक्षीला बहर होता. आता जरा कमी झाली फुले. लाल, पीतांबरी, पांढरी, पिवळी, नाना रंग. ही फुले किती सुंदर दिसतात ! तुळशीच्या अंगणात बसून आई त्यांच्या संध्याकाळच्या धूपारतीला माळा करायची. गुलबक्षीच्या फुलांचे ते काळेभोर मणी होतात. गुलबक्षीच्या कंदात हळद, पिंजर वगैरे भरून तो लावला तर फुलांवर पिवळे लाल ठिपके उठतात ! गंमत, नाही ? गोकर्णीचीही निळी, पांढरी फुले फुलत आहेत. गाईच्या कानां-सारखी दिसतात, नाही ? केळीजवळ त्यांचे वेल आहेत. काल मी किती फुले काढली ?


बाबू काल साबणाचे फुगे उडवीत होता. नळीला थोडा साबण लावून ओला करून फुंकी. आणि हवेतून फुगे उडत. सूर्यप्रकाशात ते चमकत. ती आरशीची झाडे तुला माहीत आहेत ? निवडुंगाचाच तो प्रकार. परंतु काटे नाहीत. त्याची पाने मध्ये मोडून मुले दोन भाग हळूच थोडे अलग करतात. चिकाचा पडदा मध्ये दिसतो. जणू हिरव्या फ्रेमचा चष्मा. लहानपणी आमच्या घराजवळ एक आरशीणकाकू राहात असे. गावात त्या वेळेस चष्मे कमी. परंतु ही आजीबाई लावायची आरशी, म्हणून आरशीकाकू. तिच्या घराजवळ ही बिनकाटेरी निवडुंगे असत. त्या पानांची आरशी करून आम्ही आरशीणकाकूला म्हणायचे, " आजी– ही बघ तुझी आरशी !" आरशीकाकू एकटी होती. तिच्या

तोंडावर एक मोठा चामखीळ होता. ती म्हातारी होती. आम्हांला म्हणायची : " विहिरीवरून जो कळशी भरून आणील त्याला चार शेंगा देईन." आम्ही पाणी द्यायचे. आरशीणकाकूची आम्हांला आठवण येते. मुलांनी चिडवले तरी हसायची. कधी हातात धरण्याची काठी खोट्या रागाने जोराने वाजवायची. परंतु शेवटी खाऊ द्यायची.

पुरे हे पत्र. तू अभ्यास न करता नास हो. सर्वांना प्रणाम व आशीर्वाद.

तुझा

साधना, ८ ऑक्टोबर १९४९ **अण्णा**



**चि. प्रिय सुधास**

सप्रेम आशीर्वाद

तू म्हणे जरा रुसली आहेस. मुलांना रागावणे, रुसणे शोभून दिसते. जी रागवत नाहीत, रुसत नाहीत, रडत नाहीत, हसत नाहीत ती मुले कसली? ज्यांचे मन निर्मळ त्यांचा रागही सुंदर असतो. परंतु आता हस बघू. तुला ती पत्रीतील कविता माहीत आहे ना? "हंस माझ्या मुला" असे त्या कवितेचे नाव आहे. चिमणी येते नि म्हणते: "तुझ्या अंगणात येईन, चिवचिव करीन, हंस रे मुला." झाड म्हणते: "छाया देईन, फूल फळ देईन, हंस रे." आकाश म्हणते: "सूर्यचंद्र दाखवीन, अगणित नक्षत्रे दाखवीन, प्रकाश देईन, हंस रे." फूल म्हणते: "रंग दाखवीन, सुगंध देईन, हंस रे." सारी सृष्टी "आनंदी रहा, हंसा." असे जणू सांगते. तुझे गाल हसू दाबून ठेवू बघत असल्यामुळे फुलू पाहणाऱ्या टपोऱ्या कळीप्रमाणे फुगीर झालेले मला येथून दिसत आहेत! हसली रे हसली. सुधा, हसत राहा. या जगात हास्यासारखे सुंदर काही नाही. हसावे नि हसवावे. हास्य. अकपट निर्मळ हास्य म्हणजे प्रसन्न आत्म्याचा प्रकाश. महात्माजींचे हास्य विश्वविख्यात आहे. जीवनातील सारी सरलता, मधुरता, निष्पापता, परमप्रेमता जणू त्या हास्यातून उचंबळून प्रकट

होई. निर्मळ जीवनसिंधूवरचा फेस म्हणजे ते हास्य. लहान मुलाच्या तोंडावरचे गोड हसू बघून आपण सारे दुःख विसरतो. जेथे जाल तेथे हे असे हास्य बरोबर घेऊन जा. सूर्य जाईल तेथे प्रकाश नेईल, त्याप्रमाणे तुम्ही जाल तेथे हास्य, आनंद यांचा प्रकाश घेऊन जा.

सुधा, तू म्हणे ड्रॉइंगच्या दुसऱ्या परीक्षेला बसलीस. अप्पाने लिहिले होते. छान. आता कधी समुद्रावर बसून तेथील देखावेही तू सुटीत रंगवशील. तुझ्याजवळ चित्रकला आहे. जर वाढवता आली तर बघ. रामदासस्वामींनी म्हटले आहे :

> " काही तरी धरावी सोये
> आगंतुक गुणाची "

काळा मनुष्य अभ्यास करूनही काही गोरा होणार नाही. परंतु आपणांस बुद्धीचे व हृदयाचे अनेक गुण अंगी आणता येतील. तू रांगोळ्याही पुष्कळ शिकली आहेस ना! आता दिवाळी येईल. जो तो घरासमोर सुंदर रांगोळ्या घालील. सुंदर गालीचे काढतील. नाना रंग भरतील. मौज असते. आमच्या लहानपणी वडील ओटीवरून भिंतीवर दोरीला खडू फासून त्या रेघा आखायचे. निरनिराळ्या आकृती व्हायच्या. तिकडे माजघरात गणपती बसावयाच्या भिंतीवर रांगोळ्या काढायच्या. करवंटीत रंग भरून ठिपके भिंतीवर मांडायचे. ठिपक्यांचे गोपूर केवढे असे! ते सर्व रांगोळ्यांच्या वर असे. आता रांगोळीची पुस्तके आहेत. पूर्वी एकमेकींपासून मुली शिकत. बायका सडा घालतात त्यावर कमळ, चंद्र सूर्य, तारे रेखाटतात. जणू माझ्या दारात स्वर्ग आहे ही भावना. मी गरीब असेन, परंतु माझ्या दारात सारे त्रिभुवन मी आणले. लहानसा आहे,- मनुष्य विश्वाचा विचार करू शकतो, हा यात भाव आहे.

आश्विनाचा कृष्णपक्ष सुरू झाला. दसरा झाला म्हणजे दिवाळीचा वेध लागतो. दसरा दिवाळी असा जोडशब्दच तोंडात येतो.

> दसऱ्यापासून दिवाळी विसां दिशी।
> मज माहेरा कधी नेशी, भाईराया ॥

ही ओवी. दसरा संपताच बहीण मनात म्हणत असेल. आज आश्विनातील

संकष्टी चतुर्थी, आज माझ्या आईचा श्राद्धदिन. आईची आज आठवण होत आहे. पहाटे अंथरुणात तिची आठवण केली. तिच्या पांघरुणात लहानपणी मी गुरंगुटी करून निजायचा. ती ताक करायला उठायची. आम्हांला आमची आई त्या मानाने बरीच वर्षे लाभली. मी पंधरा-सोळा वर्षांचा होतो तेव्हा आई गेली. तुझी आई तू पाचसहा वर्षांची असतानाच गेली. तुला आठवत नसेल, आईबापांचे पवित्र स्मरण पावन असते. ती कृतज्ञता असते. आणि या जगात कृतज्ञतेसारखे सुंदर दुसरे काय आहे ?

आता गुरुद्वादशी येईल. त्या दिवशी नरसोबाच्या वाडीला केवढा उत्सव असतो. ते दत्ताचे स्थान. कृष्णा आणि पंचगंगा यांचा संगम. मी ३५ वर्षांपूर्वी तेथे गेलो होतो. मी लहान होतो. परंतु सारे दृश्य डोळ्यांसमोर आहे. या गुरुद्वादशीलाच कोणी वसुबारस किंवा गाय-गोऱ्ह्याची बारस म्हणतात. गाय व तिचे वासरू यांची पूजा करायचा हा दिवस. ज्या स्त्रीला मूल नसते ती गाय-गोऱ्ह्याची पूजा करते. गोठ्यात वासरू आहे, याप्रमाणे घरात बाळ खेळावे अशी तिला उत्कंठा असते. तू ती सोपानदेवांची "पहा ही पवळी मज हिणविते" ही कविता त्यांच्याच तोंडून ऐकली असशील. गाय वासराला चाटीत असते. आणि स्त्रीला वाटते, ही गाय मला हिणवीत आहे. अंगणात काढलेल्या रांगोळीवरून बाळ केव्हा रांगत येईल वगैरे विचार तिच्या मनात येतात. सुंदर कविता !

आणि मग पुढे दिवाळीचे चार दिवस. खरोखर दसरा, कोजागिरी, दिवाळी हे सण सारे योग्य वेळी आहेत. पाऊस संपत आलेला. सोन्यासारखी पिके तयार झालेली असतात. अशा वेळेस जीवनात आनंद नि प्रकाश नाही आणायचा तर कधी ? दिवाळीच्या पहिल्या दिवसाला आपण नरकचतुर्दशी म्हणतो. नरकासुराला सत्यभामेने मारले. नरकासुर म्हणजे घाणीचा राक्षस. पाऊस संपून ऊन पडू लागलेले असते. आपणही घरबीर झाडून स्वच्छ करायचे. घरांना रंग द्यायचा. घाण दूर करणे हा बायकांचा स्वधर्म. परंतु या स्वधर्मात व्यापकता हवी. मुंबईतील सुशिक्षित बायकाही घाण खाली टाकतात. केरकचरा घाण बादलीत, टोपलीत नाही ठेवणार. स्वच्छतेचा सामाजिक धर्म आमच्या जीवनात यायला हवा, हा नरकचतुर्दशीचा अर्थ आहे.

सुधामाई, लहानपणी पहाटे आपल्या घरी गोविंदा न्हावी यायचा. पूर्वी खेड्यातून एक प्रकारचे सहकारी जीवन असे. त्यांना 'बलुती' म्हणत. नावाडी असला, तर त्याला सर्वांनी धान्य द्यायचे. त्याने नावेतून गावचे लोक न्यायचे. न्हावीदादाला ठराविक धान्य द्यायचे. त्याने डोई करायची. मोठ्या माणसाच्या अंगाला तेल लावायला तो यायचा. परंतु आम्हा लहान मुलांच्या अंगाला बहिणी लावायच्या. अक्का, अंबू–कोणी तरी लावीत. मला अंगाला तेल लावणे मुळीच आवडत नसे. तोंडाला तर नाहीच नाही. आई म्हणायची : "तोंडावरून तेलाचा हात फिरव. नाही तर माकड होशील!" मुलांना अमूक होशील, तमूक होशील, असे गंमतीने म्हणतात. शनिवारी चणे खाल्ले तर घोडा व्हावे लागेल अशा अनेक कल्पना.

दिवाळीच्या आधीपासून करंज्या, अनरसे, कडबोळी, चकल्या, सांजोऱ्या, बोरे-नाना प्रकार तयार होत असतात. आम्हा लहान मुलांना आजी कडबोळी तयार करायला बोलवायची. कडबोळे हा शब्द कानडी आहे. कट्टवलय हा त्यांचा शब्द. कट्ट म्हणजे शिंग. शिंगात घालायचे वलय. वलय म्हणजे वाटोळी वस्तू. देशावर सांजोऱ्यांचा फार प्रघात. कोकणात अनरसे करताना खसखस खाली घालून तिच्यावर नाही ते थापीत. तुपाचे बोट लावून त्यावर थापतात. मला मऊ अनरसे आवडायचे. अनरशांच्या डब्यात केळीचे पान ठेवले की ते मऊ होतात. मामांना अनरसे आवडायचे. म्हणून आजी त्यांच्यासाठी मुद्दाम पाठवायची. आणि बोरे! बोरांची भाजणी सगळ्यांना नाही साधत. मावशी अक्काला नेहमी म्हणते : "ती बोरे करतात त्यांच्या भाजणीत काय काय ग घालतात?" खुसखुशीत, गुळमट गुळमट, कशी छान लागतात! येता जाता खावीत. केशवसुतांची दिवाळी कविता किती छान आहे? ते म्हणतात : "इतरांना या वेळेस भार नाही, परंतु शिंक्यांना मात्र फराळाच्या डब्यांचे भार!" आणि फटाके, चंद्रज्योती, तारा,–आनंद असतो. आणि उडालेले फटाके गोळा करायचे. ते मोडून एकत्र रास करून काडी लावायची. केवढा जाळ होतो. काही लहान मुले धीट असतात. काही भित्री. हातात बांबूचा चिमटा घेऊन त्यात फटाका धरून वाजवतात. कधी फटाका मागून पेटत येतो व हात भाजतो. डामरी फटाके डब्यात पेटवतात. केवढा ठो आवाज होतो. आपले दादा लवंगी फटाक्यांची माळ हातात धरून वाजवायचे. तू चिमट्यात

धरून वाजवीत असस. आठवते का ? आणि सकाळच्या स्नानाच्या वेळेस अंबू व दादा यांनी दोनच चंद्रज्योती लावल्या. मी रागावलो. आई म्हणाली : "आज तरी बाबा रुसू नकोस, फुगू नकोस." मी रागाने आंघोळ झाल्यावर पायाखाली कारिंटे जोराने चिरडली. नरकासूर रागारागाने मारीत होतो. आंघोळ झाल्यावर ती कारिंटांची घाण पायाला लागणे मला मुळीच आवडत नसे.

सुधा, आपले रामकृष्णकाका आरास करायचे. बांबूंच्या कमानी उभारायचे. त्यांच्यावर शेण थापून कारिंटाच्या पणत्या लावायचे. प्रत्येक कारिंट मध्ये कापून आतील गर दूर करून दोन पणत्या करायच्या. रात्री त्या हारीने लावलेल्या पणत्या किती सुंदर दिसत !

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी झेंडूंची सर्वत्र तोरणे नि माळा. दुकानदार, सावकार यांच्याकडे आरास असायची. लहानपणी मामांनी एकदा आईला व आम्हांला मुंबईचा 'लाइट' बघायला नेले होते. इमारती लाखो विजेच्या दिव्यांनी झगझगीत दिसत. नाना रंगांचे दिवे. आणि आपल्याकडे ते रंगीत कंदील तयार करायचे. पायलीचा कंदील. कातरलेली चित्रे असायची. ती फिरायची. अग, आम्ही तो कागदी कंदील उंच बांबूवर कप्पीने चढवायचे. परंतु रात्री काढून ठेवला नाही तर दव पडून सारे कागद ओलेचिंब व्हायचे. कंदील फुकट जायचा. अलीकडची लहान मुले विमाने, बोटी कागदांच्या करून टांगतात. नवीन काळात नवीन खेळ, नवीन खेळणी.

आपल्या गावात दिवाळीच्या दिवसांत चेंडू-लगोऱ्यांचा खेळ असतो. गणपतीच्या देवळाजवळ जागा. गावातील सारी मोठमोठी मंडळी यायची. जड जड दगडांची डिंगोरी रचायचे. सुट्टीत मुंबईहून चाकरमान्ये यायचे. तेही खेळायला यायचे. म्हातारे लोकही दोन चेंडू मारायचे, डिंगोरी फोडू पहायचे. आणि चेंडू फेकणाऱ्याला कोणी तरी अडवायचे. त्याचा नेम नीट लागू नये म्हणून. चेंडू टणक असे. जेव्हा लपालपी पळापळी व्हायची तेव्हा तो चेंडू मारायचा. काय सप्कन बसे. अग, तुरुंगात आम्ही हा खेळ खेळत असू. आपले मंत्री श्री. मुरारजीभाई, बाळासाहेब खेर हेही खेळ बघायचे. काकासाहेब गाडगीळ तर खेळायला यायचे. एकदा तर पळताना काका पडले. परंतु ते खरे

खेळाडू. रावसाहेब पटवर्धनही पावसात खेळायचे. मौज. बग्या, घाटे आणि किर्लोस्करवाडीजवळचे जाधव फार छान नेम मारीत. जाधवांना आम्ही वडीरी म्हणायचे. ते माझ्याजवळ लिहावाचायला शिकले. घरी स्वतःच्या अक्षरात त्यांनी पत्र लिहिले. मला त्यांची आठवण येते. ते तिकडे शेतीत वा कारखान्यात काम करीत असतील. मी इकडे दूर जणू आज बिळात बसून आहे. आठवणी येतात.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आमच्या आजोळी आजोबा सारी जुनी नाणी काढायचे. त्यांची पूजा करायचे. व्यापारी लोक कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून नवीन वर्ष सुरू करतात. आदल्या दिवशी लक्ष्मीपूजन झालेले असते. जमाखर्च होऊन नवा आरंभ करायचा. व्यापारी एकमेकांकडे त्या दिवशी ठेव पाठवतात. कोणी वीस, कोणी पन्नास. व्यवहार चालू होतो. आणि दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीजेचा. त्याच्यासारखा गोड दिवस नाही. बहीण-भावाच्या प्रेमासारखी मंगल पुण्यपावन गोष्ट जगात दुसरी कोणती आहे ? मी अक्काकडे गेलो व तिचा निरोप घेऊन निघालो तर अजून तिचे डोळे भरून येतात. ती चुलीतील काजळ आणून अजून माझ्या कपाळाला दृष्ट पडू नये म्हणून लावते. पहाटे उठून पुरण वाटून पुरणपोळी करून ठेवील. अक्का अशक्त. परंतु भाऊ घरी आले म्हणजे तिला कोठून शक्ती येते कोणाला ठाऊक ? ते भावनेचे बळ असते. तुमच्या भावाबहिणींच्या प्रेमाच्या ओव्या किती सहृदय आहेत. आणि मुसल्मानांनाही भाऊ मानल्याच्या ओव्या आहेत—

“ मानीयला भाऊ जातीचा मुसल्मान
दिवाळीचा खण त्याचा कागदी सलाम ।। ”

अशी सुंदर ओवी जेव्हा मला मिळाली तेव्हा मी उचंबळून गेलो होतो. परंतु ही सुंदर भावना, हा मानवतामधुर अनुभव आज कोणाला हवा आहे ? ती ओवीही कोणाला खरी वाटत नाही. आज राष्ट्रात सर्वत्र बंधुभाव पसरू तरच खरी दिवाळी. नाही तर कोठली दिवाळी ?

बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयातील घाण दूर करून, द्वेषमत्सर, सूड, स्वार्थलोभ दूर करून तेथे प्रेमाच्या पणत्या लावणार का ? तेथे उदार भावनांच्या अमर ज्योती पाजळणार का ? गांधीजींनी प्रेमाचा

अमर नंदादीप पेटवून ठेवला आहे. त्या दिव्यावर आपणही लहानमोठ्या पणत्या लावून घेऊ या. आपापल्या जीवनात प्रकाश आणू या. सुधामाई, ही खरी दिवाळी.

तुम्ही म्हणे यंदा कदाचित दिवाळीला इकडेच येणार असे कळते. या, खरेच या. अप्पा किती तरी दिवसांत इकडे आला नाही. वैनीही नाही. आपले लहानपणचे घर, ते तुळशीचे अंगण, ते वेहेळ्याचे गगनचुंबी झाड, तो केळांबा, तो काळांबा, ते आईच्या हातचे चंदनाचे झाड आणि आजोबांच्या हातची लिंबी,– सारे वैनीला दाखवू. प्रत्येक ठिकाणच्या शेकडो आठवणी. पायरे शेतात जाऊ. दूर्वोची आजी तेथे झोपडीत एकटी राखण राहायची. आम्ही शनिवारी रविवारी तेथे लहानपणी जात असू. वांग्याचे भरीत व पोहे खात असू. ती जवळच नदी, व तुझ्या पूर्वजांनी विहिरीला नदीच्या पाण्याचे झरे असावेत म्हणून तेथे बांधलेले धरण आहे. पलीकडे ग्रामदेवता झोळाई सोमजाई व तो झाडीतला सोमेश्वर, आणि ते सुपीक देवशेत व तेथला तो ढेरांबा. केवढा आंबा त्याला यायचा. आता फळ जरा लहान झाले आहे. तुम्ही या. अरुणाला झोळाई आईच्या पायांवर घालू. पूर्वी आपल्या गावात माहेरवाशीण सासुरवाशीण नव्या मुलाला घेऊन आली तर आधी ग्रामदेवतांच्या दर्शनाला जायचे. गावचे रक्षण करणारी देवता गावाजवळच. त्या झोळाईच्या देवळाबाहेर एक सुंदर मूर्ती ठेवली आहे. ती तेथे का? तिच्यावर अस्पृश्यांची सावली पडली म्हणून ती मूर्ती बाहेर असे आम्हांला सांगत! देवही का बाटतो, विटाळतो? मग जगात पावन करणारे तरी कोण? किती ही अनुदारता! ती बाहेरची मूर्ती पाहून माझे हृदय दुभंग होत असते. आता तरी ती मूर्ती सर्वांनी आत न्यायला हवी. हरिजनांना आता कोठे मज्जाव नाही. परंतु कायदे झाले तरी हृदय थोडेच उदार झाले आहे!

तुम्ही या. घर झाडून ठेवू, अंगणी करून ठेवू. तुळशीचे लग्न थाटात करू. तुम्ही तुळशीचे वृंदावन पुन्हा नीट करा. मग ते ठिपक्यांनी रंगवा. तुळशीच्या लग्नाला घोरिवड्यातून चिंचा आणू. किल्ल्याकडून आवळे आणू. विठोबाराव नाही तर देतील आणून. त्यांनाही खूप आनंद होईल. दादांवर त्यांचे फार प्रेम. आपण म्हाताऱ्या मथीकडे जाऊ. अप्पा तिला रुपया देईल.

मथी, तिची मुलगी चंद्री, तो शिवराम– सर्वांना अप्पा भेटेल. पूर्वी आपला गोविंदमामा, गोपूचे वडील कोकणात आले म्हणजे जुने सदरे कोट आणायचा. लक्ष्मण सोनाराला, रावजीला द्यायचे. ती प्रेमाची खूण असे; परंतु अलीकडे आपलेपणा नाही आणि घेण्यातही कमीपणा वाटत असेल; परंतु मला ते गोड संबंध आठवतात. त्यात कीव करण्याची भावना नसे तर प्रेमळपणा असे. म्हणून ते देणे-घेणे मधुर वाटत असे.

मी तुम्हांला सारा गाव दाखवीन. चौदा वाड्या, चार कोंड. आपल्या गावाचा केवढा तेगार. तेगार म्हणजे पसारा. भाऊंच्या तोंडी हा शब्द असे. माझे लहानपणचे मित्र सर्वत्र आहेत. बाजारातला काशीनाथ सोनार, गवळ-वाडचा मिलिटरीतून जाऊन आलेला कान्ह्या, परीटवाडचा रामा, म्हारवड्यातील रामजी, सोमेश्वरचा भिकू गुरव– सारे तुम्हांला भेटवीन. आणि ते नारायणराव जाधव! आमच्या लहानपणी त्यांच्या अंगात देव यायचा. ते वेल्वाडीत राहात. परंतु फो फो करून तांदूळ फेकीत तेव्हाचा त्यांचा आवाज गावभर घुमे. आपल्या गावापासून चार कोसांवर पाचवली गाव. तेथेही कोणाच्या अंगात देव यायचा. कोणाच्या अंगावर विषार उठला तर तो तेथे जायचा. साप चावलेल्या माणसाला तेथे नेत. ते तांदूळ अंगावर पडले की गुण यायचा. एकदा अक्का, मी, आमच्याबरोबरची लक्ष्मी बायतीण– अशी तिथे पायी गेलो होतो. आईने दशमी व घट्ट पिठले दिले होते. झाडांच्या सावलीत ओढ्याखाली आम्ही फराळ केला. तो सुंदर फराळ अजून आठवतो. अक्का भेटली, जुन्या आठवणी निघाल्या की हे सारे आम्ही आवडीने बोलतो. सुधामाई, तुम्ही सारी या. मी वाट पाहतो. बामनभटजींच्या गायीचे अरुणाला दूध होईल. मी सांगून ठेवीन. अरुणाच्या आजोबांनी दिलेल्या गायीची ही गाय म्हणजे पणती!

तुम्ही येणार म्हणून मी आनंदलो आहे. मावशी, गोपू–सारी या. बाबू व त्याची सारी मंडळी, शंकर, नानू, त्यांची मंडळी, बाळतात्यांची मुले, आपण सारीच जमलो कधी तर किती मौज! रामकृष्ण काका व त्यांची सारी इथेच आहेत. पूर्वजांची भाऊबंदकी विसरून नवीन पिढीतील आपण मुलांनी

प्रेम वाढवायला हवे, बंधुभाव वाढवायला हवा. जुन्या प्रेमळ स्मृतीच तेवढ्या घेऊन पुढे जायला हवे. नाही का ?

अरुणाला मोटरीतून जपून आणा. तिला बेबे लागतो. बरोबर घेऊन या. मी तुमच्यासाठी अळकुडया, करिंदे, कणगरे वगैरे कोकणचे मेवे जमा करून ठेवतो. चिबूड मिळाला तर ठेवतो. जून काकडया आहेत. कोवळी शेवटची शिसे वेलावर दिसली तर पाहू.

पुरे पत्र. तू सहामाहीत पास होशीलच. ड्रॉइंगचे पेपर कसे गेले कळव. अप्पा, ताई वगैरेस स. प्र. चि. प्रिय अरुणास व तिच्या बरोबर खेळणाऱ्या पपी, आशा वगैरेस सप्रेम आशीर्वाद. गोदावरीसही विचारले म्हणून सांग. तिच्याकडची रायआवळी भरली असेल. येताना रायआवळे आणा. आपल्या गावात नाहीत.

तुझा
अण्णा

साधना, १७ ऑक्टोबर १९४९

★★★